भारतीय स्वातंत्र्य • साधना साप्ताहिक
६०
हीरकमहोत्सव

# साधना

संस्थापक :
साने गुरुजी

शनिवार
९ फेब्रुवारी २००८
मूल्य रु. १०/-



**कैफियत** राजन गवस

# आणि सगळे गाव शांताबाईच्या गुडघ्यावर डोके ठेवून दाढीडोई करून लागले!...

**गावगाडा बदलतोय. 'तशी टाकावूच होती गावगाड्याची व्यवस्था' अशा आशयाची विधाने आपण सतत ऐकत असतो. 'शिक्षणामुळे नवी जीवनदृष्टी येते', हे खरे; पण या नव्या जीवनदृष्टीतच सारे सत्व आहे, असे ठाम मानून खेड्यातल्या सर्वव्यापी जीवनाला हद्दपार करण्याचा चंग भारतातील नवसाक्षरांनी बांधला आहे. मेकॅलेप्रणित शिक्षणातील पिलावळ यात अग्रेसर आहे. यातूनच खेड्याविषयी, खेड्यातील जीवन व्यवहाराविषयी तुच्छतादर्शक शब्दांची उधळण सर्वत्र होत आहे.**

'श्रीमती शांताबाई यादव : वय वर्षे ६०. मुक्काम पोस्ट हासूर सासगिरी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.' या पत्त्याची शांताबाईला काहीच गरज नाही. कारण तिला कोणी पत्र पाठवणार नाही की, शासनाचा कुठला भ्रष्टाचारात गुंतलेला अधिकारी मदत पाठविणार नाही. अर्थात अशा भिकेची तिला गरजही नाही. 'काम न करता मिळालेली दिडकीही हरामाची असते' ही तिची मूल्य धारणा. मनगटावर तिचा पुरेपूर विश्वास, त्यामुळेच पंचक्रोशीतील लोकांसमोर शांताबाई हे एक महत्त्वाचे उदाहरण. खेड्यापाड्यातल्या आया-बायांच्या ओठावरचे नाव.

कोण ही शांताबाई? असे कुतूहल कोणासही वाटावे इतके तिचे जगणे वेगळे आणि आत्मविश्वासपूर्ण आहे. शांताबाई परकरी वयात लग्न होऊन हासूर सासगिरीत यादवांच्या घरात आली. यादवाचे घर बलुतेदाराचे. नाभीकाचा पिढीजात व्यवसाय. हे नाभीक यादवाचे घर हासुरात आले, तेही दोन पिढ्यांपूर्वी.

सामनगडच्या पायथ्याशी असणारे हासूर सासगिरी हे दोन अडीचशे उंबऱ्याचे गाव. गावातील नाभीकाचे एकमेव घर निर्वंश झाले. गावात नाभीक उरला नाही. त्यामुळे गावकऱ्यात चिंता. मग गावच्या पाटलाने शेजारच्या गावातील नाभीकाला आवातनं दिलं आणि सन्मानानं गावात आणलं. त्याच्या कुटुंबकबिल्याची जबाबदारी घेतली. त्या घरात आलेल्या शांताबाईसमोर नशीबाचे वेगळेच भोग वाढून ठेवलेले होते. सुखात चाललेला तिचा संसार अचानक दृष्ट लागावी तसा कोलमडला. तिच्या पतीचे निधन झाले. वैधव्याच्या घाल्याने अख्खा संसार लोंबकळणीस लागला.




पदरात चार कच्चीबच्ची घेऊन जगणाऱ्या शांताबाईला आपल्या मुलाबाळांचे भवितव्य अंधकारमय वाटू लागले. जगायचे असेल तर कोणाच्या बळावर आणि भरवशावर? जमिनीचा तुकडा नाही, मोलमजुरीस जावे तर दोन हात राबणार आणि दहा हात बसून खाणार. अशा विचित्र परिस्थितीत हाय खाल्लेल्या शांताबाईला धीर दिला तो गावातील प्रतिष्ठित व जाणत्या हरिभाऊ कडुकर यांनी.

हरिभाऊ कडुकर शेती संस्कृतीतला, भक्कम पोशिंदा पुरुष. कधीकाळी ते गडहिंग्लज तालुक्याच्या पंचायत समितीचे सभापती होते. त्यांनी शांताबाईच्या हतबलतेवर मार्ग शोधला. गल्लीतले आठ दहाजण गोळा करून शांताबाईच्या दारात आणले. दुःखाचा डोंगर कोसळलेल्या घरात स्मशानशांतता. कडुकर साहेबांनी शांताबाईला उंबऱ्याला बोलावले. पांढऱ्या फटफटीत कपाळाची शांताबाई डोळ्यातील पाणी आवरत त्यांच्या समोर उभी राहिली. त्यांनी तिला नवऱ्याचे केशकर्तनालयासाठी लागणारे साहित्य धोपटीतून बाहेर काढायला लावले. बसायला पाट घेऊन, डोक्यावरची टोपी काढून स्वत: तिच्यासमोर

(पृष्ठ ३१ वर

# मद्यमुक्त महाराष्ट्र : लोकशक्तीची पहाट व प्रश्न

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात स्पिरीट प्याल्याने २५ आदिवासींना मागील आठवड्यात प्राण गमवावे लागले. यापूर्वीही बनावट गावठी दारुमुळे शेकडोजणांना मृत्यू आला आहे. २००४ मध्ये विक्रोळी आणि सात रस्ता येथे विषारी गावठी दारू पिऊन झालेल्या दुर्घटनेत अनुक्रमे ८५ व २१ जण मृत्युमुखी पडले होते. त्यानंतर अशा अपप्रकारांना रोखण्यासाठी गृहखात्याने कठोर उपाय योजना केली. त्याला काही काळ यश आले. परंतु गाडे पुन्हा मूळ पदावर आले आहे, हे सुधागडच्या घटनेने स्पष्ट होते. मात्र अशा घटना रोखण्यासाठी एक अजब उपाय राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी सुचवत आहेत. (राज्य उत्पादन शुल्कमंत्री गणेश नाईक यांनी यापूर्वीच ही भूमिका अनेकदा मांडली आहे.) ती सूचना अशी आहे की देशी दारू स्वस्त करावी. 'सरकारने १९७३ पासून देशी दारूविक्रीचे परवाने दिलेले नाहीत, त्यात वाढ करावी; देशी दारूविक्रीच्या विस्ताराबाबत आणि ती स्वस्त करण्याबाबत शासनाची जी अनास्था आहे तीच सुधागडसारख्या दारूकांडाचे एकमेव कारण आहे', असे सुचविण्यात आले आहे. मनाची नाही पण जनाची लाज (वा भिती) वाटत असल्यानेच, ही सूचना अजून अंमलात आणली गेली नाही.

याचे दुसरे टोक गेली सहा महिने सातारा जिल्ह्यात चालू असलेल्या जनलढ्यातच साकार होत आहे. महिलांच्या मतदानाद्वारे 'दारूची उभी बाटली आडवी करता येईल' असा शासकीय निर्णय २१ सप्टेंबर २००२ रोजी झाला. परंतु गेल्या सहा वर्षांत या आदेशाला झंझावाती चळवळीचे स्वरूप महाराष्ट्रात प्राप्त झाले नाही. अपवाद गेल्या सहा महिन्यांत सातारा जिल्ह्यात चालू असलेल्या लढ्याचा. शासकीय आदेश असे सांगतो की, गावातील अथवा नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील एका वॉर्डातील २५ टक्के महिला मतदारांनी स्वतःच्या सहीने जिल्हाधिकाऱ्यांच्याकडे गावातील मद्यविक्रीचे परवाने बंद करण्याचे लेखी निवेदन द्यावे; त्यानंतर एका महिन्याच्या आत, (सात दिवसांच्या पूर्वसूचनेने) संबंधित ठिकाणी गुप्त मतदान घेण्यात येईल. गावातील एकूण महिला मतदारांपैकी निम्म्याहून अधिक महिलांनी 'आडवी बाटली' या चिन्हावर शिक्का मारल्यास त्या गावातील मद्यविक्रीचे परवाने रद्द होतील आणि तेथील दुकाने बंद होतील. हा लोकशाही हक्क बजावून सातारा जिल्ह्यातील विविध गावांतील महिला, दारुची दुकाने धडाधड बंद पाडण्याचे काम करत आहेत. दारुमुळे होणाऱ्या संसाराच्या बरबादीने, त्यांच्या वेदनेचा जणू स्फोट झाला आहे. गेल्या सहा महिन्यांत सातारा जिल्ह्यातील प्रसारमाध्यमे या विषयावरील बातम्यांनी व्यापलेली दिसतील. परंपरागत पुरुषप्रधान व्यवस्था, त्याची मानसिकता सर्वच ग्रामीण भागांत (सातारा जिल्ह्यातही) आहे. अशा वेळी घरातल्या पुरुषांनी पाठिंबा दिला नाही तरी रणरागिणी रस्त्यावर उतरत आहेत, प्रचारफेऱ्या काढत आहेत, निदर्शने करीत आहेत. मतदानाची मागणी करत आहेत. त्यांना रूढ अर्थाचे नेतृत्व नाही; तरीही संयमाने, स्वयंशिस्तीने पण प्रखर निर्धाराने त्यांची अभिव्यक्ती होते आहे. या वातावरणाच्या प्रभावामुळे काही गावांतील दारू विक्रेत्यांनी स्वतःहूनच हा 'पापी'धंदा बंद करण्याचा निर्णय घेतला, हे तर अभूतपूर्व आहे. तालुक्याचे गाव बऱ्यापैकी मोठे असते, मद्यविक्रीची किमान अर्धा डझन दुकाने त्या गावी असतात; अशा गावी देखील ही मोहीम यशस्वीपणे पोचली आहे.

केवळ 'दारुबंदी चळवळ' म्हणून याकडे पाहिले जाऊ नये. या उत्स्फूर्त आंदोलनाचे महत्त्व त्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. कोणत्याही शासकीय मदतीशिवाय सबलीकरणाचा हा वस्तुपाठ महिला गिरवीत आहेत. बचतगटाद्वारे होणारी 'अर्थ'पूर्ण रचना महत्त्वाची आहेच, पण ती बचत 'अर्थ'शून्य करणाऱ्या व्यसनाच्या विरोधातील संघर्षही स्त्रीला शक्ती प्राप्त करून देतो आहे. दारूचे व्यसन हा गंभीर मानसिक आजार असल्याचे जागतिक आरोग्य संघटना सांगते. स्वतःच्या कुटुंबाच्या एका महत्त्वाच्या आरोग्याबाबतच्या प्रश्नात थेट हस्तक्षेप


स्थापण्या
समता शांती
टेवुनी शुद्ध
साधनां ।
करिती साधना
त्यांना टेवो
उत्स्फूर्त
साधना



९ फेब्रुवारी २००८
वर्ष ६० / अंक २५

- संपादक : नरेंद्र दाभोलकर
- युवा संपादक : विनोद शिरसाट

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०**, येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स – २४४३२४०२.
  E-mail : ssadhana@vsnl.net साधना मीडिया सेंटर – २४४५९६३५ / ४१.
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ३००/-, संस्थांसाठी रु. ४००/-
- [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]
- मुखपृष्ठ : शेखर गोडबोले, Mob. 9822503398

असेही या लढ्याकडे पहाता येईल. 'मला हवे ते मी कायदेशीरपणे नेटाने उभे राहून मिळवीनच' हा लोकशाहीला उपकारक सत्याग्रही राजकीय पैलू देखील या जनचळवळीस आहे. जिल्ह्यात प्रभावी असलेल्या सर्व राजकीय पक्षांचे या घडामोडींबाबतचे संपूर्ण मौन देखील, आजच्या राजकीय पक्षांच्या पोकळपणावर विदारक भाष्य करते. दारुबंदी होणे आणि त्यासाठी बाईने रस्त्यावर येणे, हे दोन्ही प्रकार पुरुषांना रुचणारे, पचणारे नाहीत; पण आंदोलनाच्या आवेगाने या पुरुषप्रधान मानसिकतेवर कधीच मात केली आहे. सातारा जिल्ह्याला ४२च्या चळवळीतील प्रतिसरकारचा इतिहास आहे. तो स्मरून मद्यबंदीबाबत तरी या महिलांनी 'आमच्या गावी आम्हीच सरकार' असा दरारा काही काळ निर्माण केला आहे. तो जिल्ह्यातील अन्य गावांना प्रेरणादायी ठरत आहे.

मात्र यामुळेच हे आव्हान बिकटही होत चालले आहे. दारुची विक्री कायदेशीर वा बेकायदेशीरपणे करणे यासाठी दारुविक्रेते, पोलीस, सर्वपक्षीय पुढारी याची छुपी युती असते. या व्यवहारातील उलाढाल कोट्यवधी रुपयांची असते. अलीकडे तो निवडणुकांचा-मतदानाचा अपरिहार्य भागही बनला आहे. त्यामुळे झालेली दारुबंदी कायम टिकवणे हे भलतेच दमछाक करणारे ठरत आहे. गावातील अधिकृत दारुविक्री बंद झाली की गावात बेकायदा दारुविक्री चालू होते. ती देशी, विदेशी, हातभट्टी अशी कोणत्याही स्वरूपाची असते, ती दुप्पट दराने विकली जाते. यामुळे दारुड्यांचे व्यसन चालू रहातेच, पण दारू महागही बनते. या सर्व छुप्या व्यवहारांमागे प्रच्छन्न दहशतवादही असतो. धोका पत्करून त्याबाबत आवाज उठवला तर संबंधित लोक 'जागेत अनधिकृत प्रवेश केला, जातीय शिवीगाळ केली' अशा खोट्या तक्रारी करून खटले दाखल करतात. पोलिसांचे बहुदा अवैध धंद्याला संरक्षण असते. त्या विरोधातील चळवळीबद्दल नाखुशी असते. अवैध विक्रीला छुपा राजकीय पाठिंबाही असतो. या सर्वांमुळे चळवळीचा तेजोभंग होतो. तरीही काही फायदे होतात. सहज उपलब्धतेमुळे पिण्याकडे वळलेल्या वा वळणाऱ्यांची संख्या रोडावते, रस्त्यावर लोळणारे कमी होतात. व्यसन सोडविण्याचे व्यक्तिगत प्रयत्नही काही ठिकाणी चालू होतात. मात्र 'मद्यमुक्त महाराष्ट्र' या वाटचालीविषयी साशंकता वा अशक्यता निर्माण होते.

गेल्या पंधरा वर्षांत महाराष्ट्र सरकारला प्रतिवर्षी दारुविक्रीपासून मिळणारा महसूल वार्षिक रु. २५० कोटींपासून रु. ३,५०० कोटींपर्यंत वाढला आहे. 'मद्यसेवन हा सुखी जीवन जगण्याचा मार्ग आहे. मद्यपी न होण्याची काळजी घेतली की पुरे' हा भ्रामक युक्तिवाद रुजला आहे. आंदोलनात उत्स्फूर्तपणे उतरलेल्या सातारा जिल्ह्यातील हजारो महिलांचे (त्यांच्या संसाराला चटके देणाऱ्या दारुचे) दाहक अनुभव ऐकले की रस्त्यावर उतरण्यामागचा त्यांचा तळतळाट समजू शकतो. महाराष्ट्राच्या निम्म्या लोकसंख्येला भिडणारा बहुआयामी प्रश्न म्हणून दारु बाटली आडवी करण्याच्या आंदोलनाकडे बघावयास हवे आणि त्याच्या यशस्वितेसाठी काही भूमिका घ्यावयास हवी.

गावातील बेकायदा दारू धडक कारवाईने रोखणे ही त्यातील अग्रक्रमाची बाब आहे. सध्या ग्रामसुरक्षादलाची कायदेशीर तरतूद आहे. पण त्यांना बेकायदा दारू रोखण्याची परवानगी नाही. गावात हे दल स्थापन करावे. त्या दलात निम्म्या महिला घ्याव्यात आणि बेकायदा दारुवर कारवाईचे अधिकार त्यांना देण्याची गरज आहे. हे बेकायदेशीर विक्रेते सहजपणे जामीनावर मुक्त होतात. यासाठी त्यांना जरब बसेल अशा शिक्षेची तरतूद हवी. गर्दविक्रीबाबत कायदा कडक झाला आणि त्याचा फायदाही दिसला, शासनाला हे मान्य करूनही आता चार वर्षे उलटली, पण कारवाई नाही. दारुविरोधी प्रबोधन तर थंडावलेच आहे. आग्रही, आक्रमक प्रबोधन तरुणपिढीला व्यसनाधिनतेच्या भयानकतेचा घंटानाद स्पष्टपणे ऐकवू शकेल. याबरोबरच मद्याचा गैरवापर (ड्रग ॲब्यूस) करणाऱ्या व्यक्ती मद्यासक्त (ड्रग ॲडिक्ट) कशा बनतात, याच्या सात पायऱ्या जागतिक आरोग्य संघटनेने समजावून सांगितल्या ओहत. तरुणांना त्याचे मार्गदर्शन मिळाले तर अनेकांना स्वतःची पायरी ओळखून वेळीच ब्रेक लावता येईल. गावात दारू मिळत नसेल तर व्यसनाने आजारी असलेल्या व्यक्तीची तडफड होणारच. त्यातून अनेक अनर्थ उद्‌भवू शकतात. यासाठी व्यसनी व्यक्तीवर उपचाराची अल्पकालाची शिबिरे गावात आणि दीर्घकालाचे उपचार सिव्हिल हॉस्पिटलमध्ये, याचीही यंत्रणा उभी करता येणे शक्य आहे. माजी जवानांना विदेशी दारू नियमित, भरपूर व स्वस्तात मिळते. ते त्याचा सर्रास धंदा करतात. महाराष्ट्रातील ग्रामीण भाग दारुडा बनण्यात याबाबीचा मोठा वाटा आहे. म्हणून निवृत्त जवानांना दारू द्यावयाचीच कशासाठी, हा मूळ प्रश्न एकदा सर्वोच्च न्यायालयातच निकाली लावावयास हवा. हे सर्व जरी घडून आले तरी जोपर्यंत दारू मुबलक प्रमाणात आजुबाजूस उपलब्ध आहे, तो पर्यंत हा प्रयत्न पालथ्या घड्यावर पाणीच ठरणार. शासन तर 'विकासासाठी अधिक पैसा मिळवून देणारी सोन्याची कोंबडी' अशाप्रकारे दारुविक्रीकडे बघत आहे. दारुपासून मिळणारा महसूल, त्याद्वारे होणारा विकास व त्याचवेळी दारुमुळे होणाऱ्या सर्वांगीण हानीची रुपयांत होणारी किंमत यामध्ये बरबादीचे पारडे जड असल्याचे, जागतिक बँकेच्या अध्ययनात सिद्ध झाल्याचे सरकारच्या गावीही नाही. शासनाने 'मद्यमुक्त' म्हणून जाहीर केलेल्या वर्धा जिल्ह्याचा अनुभव याबाबत चांगला नाही; पण लोकउठावातून झालेल्या गडचिरोली जिल्ह्याचा अनुभव आश्वासक आहे. जिल्ह्यातील जास्तीतजास्त महिला ग्रामसभा याच प्रश्नावर घेऊन, निदान त्या दिशेने रेटा तरी तयार करावयास हवा. 'आमच्या गावी आम्हीच सरकार' या दिशेने जाणाऱ्या जागृतीची ती वाट ठरू शकेल.

सातारा जिल्ह्यात दारुमुक्तीसाठी रस्त्यावर आलेल्या हजारो रणरागिणींनी, तमाम भगिनी वर्गाला अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला प्रश्न राजकीय अजेंड्यावर आणला आहे. आंदोलनाने काहीच घडत नाही, असा निराशेचा सूर अलीकडे ऐकू येतो. पण मतदानाद्वारे महिलांनी दारुची बाटली आडवी करण्याची ठिणगी अनेक नव्या शक्यतांना जन्म देते; हे सामर्थ्य ओळखावयास हवे, जोपासावयास हवे. त्यातूनच लोकशाही बळकट करणाऱ्या शक्तीचा हुंकार अधिक समर्थपणे उमटेल.

■

# निकाराग्वा : सँडिनिस्टा राजवटीची वर्षं

**अशोक राजवाडे**

निकाराग्वा हा मध्य अमेरिकेतील एक छोटेखानी देश. लोकसंख्या ५६ लाख म्हणजे मुंबईच्या निम्मी. क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या अंदाजे चाळीस टक्के. तिथली जवळजवळ निम्मी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जगते. निकाराग्वात २००६ साली निवडणुका झाल्या. या निवडणुकांमुळे आपल्या खंडात अस्थैर्य माजेल असं अमेरिकेला वाटत होतं. त्याचं नेमकं कारण काय आहे? अमेरिकेचा विरोध असूनही २००६ साली तिथे झालेल्या निवडणुकीत सँडिनिस्टांचे नेते डॅनियल ओर्तेगा अध्यक्षपदी निवडून आले. या सँडिनिस्टांचा इतिहास पाहणं उद्‌बोधक आहे. पण त्यापूर्वी निकाराग्वामधल्या घटनांची पार्श्वभूमी समजून घेणं आवश्यक आहे.

**‘सँडिनिस्टा काही सर्वगुणसंपन्न नव्हते. त्यांच्यात मग्रुरी आणि उद्धटपणा भरपूर होता. त्यांच्या राजकीय विचारात पुष्कळ विसंगती होत्या. पण ते विवेकी आणि सुसंस्कृत होते. एका स्थिर, सभ्य आणि विचारवैविध्य मानणाऱ्या समाजाच्या निर्मितीचा कार्यक्रम त्यांनी हातात घेतला होता. त्यांच्या राजवटीत फाशीची शिक्षा रद्द करण्यात आली. एक लाख शेतकऱ्यांना त्यांनी मरणाच्या दाढेतून ओढून बाहेर काढलं होतं. अभिनव साक्षरता प्रसार मोहीम राबवून निरक्षरतेचे प्रमाण त्यांनी १५ टक्क्यांपर्यंत खाली आणलं होतं. मोफत शिक्षण जारी केलं; मोफत आरोग्यसेवा सुरू केली. बालमृत्यूंचं प्रमाण तीस-पस्तीस टक्क्यांनी खाली आणलं. पोलिओचं तर समूळ उच्चाटन झालं.’**

स्पॅनिश लोकांनी १५२२ साली आताच्या निकाराग्वावर आक्रमण केलं. आक्रमणाच्या वेळी तिथल्या एका प्रमुख रेड इंडियन टोळीप्रमुखाच्या नावावरून निकाराग्वाचं नाव पडलं आहे. १८३८ साली या देशाला स्वातंत्र्य मिळालं. तिथल्या राजकारणात दोन गट होते. एक उदारमतवादी तर दुसरा परंपरावादी. त्यातल्या परंपरावादी गटाला अमेरिकेचा पाठिंबा होता. या गटाला साहाय्य करण्यासाठी अमेरिकेने १९१२ ते १९२५ या काळात आपले सैनिक पाठवले होते. १९२४ मध्ये झालेल्या निवडणुकांनंतर काही राजकीय अस्थैर्य तिथे निर्माण झालं. निकाराग्वात १९२६ साली एक मोठा उठाव झाला होता. पुन्हा एकदा अमेरिकेचं सैन्य निकाराग्वामध्ये आलं. अमेरिकन सैनिक तिथल्या प्रतिगामी हुकूमशाही राजवटीला मदत करायला निकाराग्वात आले होते. १९२७ ते १९३३ या काळात सेझार ऑगस्टो सँडिनो (१८९५-१९३४) या नावाचा जनरल तिथे अमेरिकेच्या सैन्याबरोबर गनिमी पद्धतीचा लढा देत होता. सँडिनोच्या नेतृत्वाखाली डाव्या गनिमी सैनिकांनी तिथल्या हुकूमशाहीला आव्हान दिलं. गनिमी सैनिकांनी अनेक अमेरिकन सैनिकांना कंठस्नान घातलं. १९३३ साली अमेरिकेने आपलं सैन्य तिथून हटवलं होतं. हे युद्ध १९३४ सालपर्यंत चाललं.



नंतर ‘नॅशनल गार्ड’ या संघटनेचे नेते जनरल ॲनास्तेसिओ सोमोझा यांनी बोलणी करण्यासाठी सँडिनोला बोलावलं. सँडिनो बोलणी करायला आला असता त्याला कपटाने ठार मारण्यात आलं. ही हत्या १९३४ साली झाली. सोमोझाच्या नॅशनल गार्ड या नावाच्या पोलीस दलाने ही हत्या केली. हे पोलीस दल अमेरिकेने स्थापन केलं होतं. जनरल सोमोझाची सत्ता मजबूत व्हावी यासाठी हे दल स्थापन करण्यात आलं होतं. ऑगस्टो सँडिनोचं नाव घेऊन पुढे क्रांतिकारक स्वत:ला सँडिनिस्टा म्हणवून घेऊ लागले. १९३७ साली ॲनास्तेसिओ सोमोझाने निकाराग्वाची सत्ता आपल्या हातात एकवटली आणि तो तिथला सर्वेसर्वा झाला. सोमोझाच्या दोन पिढ्या पुढे निकाराग्वावर १९३७ ते १९७९ अशी बेचाळीस वर्षं सत्ता गाजवत होत्या. ही वर्षं राजकीय दडपशाही आणि संपत्तीची गडपशाही या दोन्ही

अर्थांनी गाजली. या काळात, विशेषत: सुरुवातीच्या काळात अमेरिकेबरोबर निकाराग्वाचे संबंध मैत्रीचे होते. १९५६ मध्ये ॲनास्तेसिओ सोमोझाची हत्या झाली. त्यानंतर त्याचा मुलगा लुईस सत्तेवर आला. १९६७ साली त्याचा मृत्यू होईपर्यंत तो सत्तेवर होता. त्याच्यानंतर त्याचा भाऊ मेजर जनरल अनास्तासिओ सोमोझा डेबायल हा सत्तेवर आला. सोमोझा घराण्याने निकाराग्वावर निर्घृणपणे सत्ता चालवली. या काळात सोमोझाच्या अनेक विरोधकांना परागंदा व्हावं लागलं आणि या घराण्याच्या नावावर अमाप संपत्ती जमा झाली. निकाराग्वाला अमेरिका आर्थिक मदत करत होती; आणि अमेरिकेची निकाराग्वातली गुंतवणूक वाढत होती. मात्र सोमोझा कुटुंबीयांची जनतेतली प्रतिमा दिवसेंदिवस खराब होत होती. पुढे ती इतकी बिघडली की अमेरिकेलासुद्धा सोमोझाबद्दल विश्वास वाटेनासा झाला. १९७२ साली तिथे मोठा भूकंप झाला. त्यासाठी मोठ्या प्रमाणात अमेरिकेकडून मदत आली. पण ती सारी जनतेपर्यंत पोचण्याऐवजी सोमोझा कुटुंबीयांच्या खिशात गेली. १९७७ साली जिमी कार्टर अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यांनी सोमोझाना आपली प्रतिमा सुधारायला सांगितलं. पण सोमोझा कुटुंबीय 'नॅशनल गार्ड' या संघटनेच्या साहाय्याने हिंसा घडवून आणत होते आणि मानवाधिकारांची सर्रास पायमल्ली सुरू होती.

जनरल सँडिनो हे तिथल्या गनिमी हल्लेखोरांचं स्फूर्तिस्थान होतं. त्यापासून सँडिनिस्टा हे नाव आलं. १९६१ साली सँडिनिस्टांच्या राष्ट्रीय मुक्ती-आघाडीची स्थापना झाली. १९७०च्या दरम्यान सँडिनिस्टांची ही आघाडी जनतेत लोकप्रिय होऊ लागली होती. सँडिनिस्टांना सोव्हिएत किंवा चिनी पद्धतीच्या एकपक्षीय राजवटीऐवजी निवडणुकांच्या मार्गाने सत्ता हवी होती आणि जनतेचा सक्रिय सहभाग असलेली लोकशाही हवी होती. त्याचबरोबर त्यांना संपत्तीचं समान वाटपही हवं होतं.

स्थूलमानाने सँडिनिस्टांवर तीन प्रभाव होते. एकीकडे त्यांच्यावर मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारांचा प्रभाव होता. दुसरीकडे ऑगस्टो सँडिनोच्या विचारांपासून त्यांनी स्फूर्ती घेतली होती. तिसरा महत्त्वाचा प्रभाव होता, ख्रिश्चन धर्मातल्या लिबरेशन थिऑलॉजी या पंथाचा. या पंथाच्या लोकांनी शीतयुद्धाच्या काळात लॅटिन अमेरिकेत लोकजागृतीचं महत्त्वाचं काम केलं होतं. रोमन कॅथलिक पंथाची अमेरिकेच्या सत्ताधिशांबरोबर असलेली जवळीक या पंथाच्या लोकांना मान्य नव्हती. ख्रिस्ताला ही मंडळी क्रांतिकारक लोकनेता मानत होती. आणि धर्माने सदैव जनतेच्या बरोबर त्यांच्या लढ्यात असलं पाहिजे असं हे लोक मानत होते. लॅटिन अमेरिकेतल्या नंतरच्या पिढीतले काही नेते लिबरेशन थिऑलॉजी आणि डावे विचार अशा दुहेरी प्रभावाखाली असलेले दिसून येतात.

२२ ऑगस्ट १९७८ या दिवशी सँडिनिस्टांच्या चोवीस गनिमांनी राजधानी मॅनाग्वाच्या प्रासादावर हल्ला चढवला आणि पुढे जुलै १९७९ पर्यंत सत्ता ताब्यात घेण्याचं काम पूर्ण केलं. त्यानंतर त्यांनी पाच महत्त्वाच्या नेत्यांची नियुक्ती करून त्यांच्या हातात सत्ता दिली.

सत्तांतराच्या वेळी निकाराग्वाची अर्थव्यवस्था दैन्यावस्थेत होती. डोक्यावर १६०० कोटी डॉलरचं कर्ज होतं. सोमोझाविरोधी संघर्षात ५०००० नागरिक मारले गेले होते. एक लाख वीस हजार नागरिकांनी



**डॅनियल ओर्तेगा**
निकाराग्वाचे विद्यमान अध्यक्ष



**ऑगस्टो सँडिनो**
अमेरिकेच्या सैन्याविरुद्ध गनिमी लढा दिला.



**व्हायोलेटा शामेरो**
अमेरिकेच्या पाठिंब्याने सँडिनिस्टांविरुद्ध लढा दिला.

शेजारच्या देशात पलायन केलं होतं आणि सहा लाख लोक बेघर होते. सोमोझा राजवटीतल्या 'नॅशनल गार्ड' या कुप्रसिद्ध संघटनेच्या अनेकांनी शेजारच्या होंडुराजमध्ये पलायन केलं होतं. त्यांनी तिथून सँडिनिस्टांच्याविरुद्ध तयारी सुरू केली. या 'तयारी'ला अर्थातच अमेरिकेचा पाठिंबा होता. इकडे निकाराग्वात अन्न आणि इंधनाचे साठे नष्ट झाले होते आणि रोगराई पसरली होती. निकाराग्वातल्या कुपोषित बालकांची संख्या ७५ टक्के होती. आंतरराष्ट्रीय साहाय्य संघटना त्यावर मात करण्यासाठी झगडत होत्या. सोमोझा राजवटीबद्दल जवळजवळ सर्व जनतेत तिरस्काराची भावना होती. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक या सर्वच अर्थाने विषमतेच्या गर्तेत गेलेल्या जनतेला नव्या नेत्यांबद्दल आशा वाटत होती.

पुढे २००६ साली निवडून आलेले डॅनियल ओर्तेगा हे त्यावेळी या पाचातले महत्त्वाचे नेते होते. सत्ता ताब्यात घेतल्यावर सँडिनिस्टांनी ज्या काही महत्त्वाच्या गोष्टी केल्या, त्यात शिक्षण आणि आरोग्य यांवर भर होता आणि या कामात त्यांना क्यूबाची साथ होती. सहा महिन्यांच्या अवधीतच त्यांनी निरक्षरतेचं प्रमाण लक्षणीय प्रमाणात खाली आणलं. सुमारे ऐंशी हजार कार्यकर्ते या शिक्षण अभियानात सामील होते. या त्यांच्या कार्याची युनोस्कोने दखल घेऊन निकाराग्वाला १९८० सालचा साक्षरतासंबंधी विशेष पुरस्कार दिला. याचप्रमाणे आरोग्यविषयक अभियानं निर्माण करून त्यांनी पोलिओ, गोवर, क्षयरोग यांच्या संख्येत लक्षणीय घट केली. त्यांचा एकात्म आरोग्याचा कार्यक्रम सर्वांसाठी खुला होता. सँडिनिस्टांच्या काळात बालमृत्यूंच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली. 'विकसनशील देशांचा विचार करता ही सुधारणा नाट्यमय वाटेल इतकी (मोठी) आहे' या शब्दांत युनिसेफने या कार्यक्रमाचं कौतुक केलं आहे. 'ऑक्सफॅम' ही स्वयंसेवी संघटना ज्या चार देशात त्या काळात काम करीत होती (एल साल्वादोर, ग्वाटेमाला, होंडुराज आणि निकाराग्वा) त्यांच्यापैकी फक्त निकाराग्वामध्ये भरघोस काम सुरू होतं.

जागतिक बँकेनेही काही क्षेत्रात निकाराग्वातलं काम असाधारण यशस्वी असल्याची वाखाणणी केली होती. 'इंटर अमेरिकन बँके'नेही अशाच शब्दांत निकाराग्वाचं कौतुक केलं होतं. बाजूच्या कोस्टा रिकामधले लोकशाहीचे प्रपितामह समजले जाणारे जोस फिगरेस यांनी म्हटलं; 'निकाराग्वामध्ये पहिल्यांदाच जनतेची काळजी घेणारं शासन प्रत्यक्षात आलं आहे.'

सँडिनिस्टांचे कार्यक्रम लक्षात घेतले म्हणजे त्याच्या विचारांची दिशा स्पष्ट होते. हे कार्यक्रम असे होते...

- सोमोझा आणि त्याच्या आप्तस्वकीयांनी बळकावलेल्या जमिनीचं राष्ट्रीयीकरण.
- ग्रामीण आणि नागरी कामगारांच्या काम करण्याच्या जागी सुधारणा.
- जमीनसुधारणा कायदे.
- अन्न, वस्त्र, निवारा यांच्या उपलब्धीत सुधारणा.
- शिक्षणाची कवाडं साऱ्या जनतेसाठी खुली करणं, व्यापक साक्षरता अभियान, माध्यमिक शिक्षणापर्यंत सर्व सुविधा उपलब्ध.
- नैसर्गिक संपत्ती आणि खाणी यांचं राष्ट्रीयीकरण आणि संरक्षण.
- राजकीय छळ आणि हत्याकांड आणि मृत्युदंडाची शिक्षा नष्ट करणं.
- स्त्रियांना समान अधिकार.
- राजकीय संघटना, कामगार संघटना करायला पूर्ण मोकळीक, लोकशाही हक्कांची पुनर्स्थापना, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य.
- अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण.
- कीटकनाशकांच्या वापरावर बंधनं, पर्यायी उर्जासाधनांवर भर, नैसर्गिक संपत्तीचं आणि वन्यजीवांचं रक्षण या काळात उद्योगधंदे आणि वित्तसंस्था यांच्यापैकी जवळजवळ पन्नास टक्क्यांचं राष्ट्रीयीकरण झालं. यात सोमोझा घराण्याने बळकावलेल्या संसाधनांचा समावेश होता. सँडिनिस्टांच्या कार्यक्रमाचे परिणाम पहिल्याच चार वर्षांत दिसून आले. निकाराग्वाच्या दरडोई उत्पन्नात १९७९-८३ या काळात ७ टक्क्यांनी वाढ झाली; तर त्याच्या शेजारच्या देशात या काळात दरडोई उत्पन्न चौदा टक्क्यांनी घटलं.

या साऱ्या कार्यक्रमांमुळे रशिया आणि क्यूबा या देशांनी सँडिनिस्टांना पाठिंबा दिला. सुरुवातीच्या काळात तर अमेरिकेनेही सँडिनिस्टांच्या राजवटीला मान्यता दिली; पण नंतरच्या काळात अमेरिका आणि निकाराग्वा यांच्यातले संबंध तणावाचे होऊ लागले.

नव्या सरकारने एक प्रातिनिधिक सल्लागार मंडळ स्थापन केलं. यात सँडिनिस्टांखेरीज समाजातल्या इतर अनेक घटकांना प्रतिनिधित्व होतं. यात धर्मगुरु होते तसंच व्यापार उदीमातली मंडळीही होती. पण यांवर असणाऱ्या सँडिनिस्टांच्या वर्चस्वामुळे अंतर्गत कुरबुरी वाढल्या. १९८० मध्ये व्हायोलेटा शामेरो या महिलेने या आघाडीतून राजीनामा दिला. पुढे याच महिलेने सँडिनिस्टांविरुद्ध आघाडी उघडली. या आघाडीला अमेरिकेचा पाठिंबा होता. १९८१ साली अमेरिकेच्या सी.आय.ए.ने 'एफ.डी.एन.' या नावाची एक सेना निकाराग्वात तयार केली. याशिवाय आणखी काही सेनांना अमेरिकेचा पाठिंबा होता. या सेनांचं आपापसात जमत नसलं तरी सँडिनिस्टांच्या विरुद्ध ते एकत्र येत होते. सोमोझा राजवटीतल्या कुप्रसिद्ध 'नॅशनल गार्ड' या संघटनेचे काही लोकही या संघटनांत कार्यरत होते. या विविध संघटनांची आघाडी 'काँट्रा' या नावाने ओळखली जात असे. अमेरिकेकडून या काँट्रा बंडखोरांना शस्त्रं आणि लढाईचं प्रशिक्षण दिलं जात असे. बहुपक्षीय लोकशाही राजकारणाचं आश्वासन जरी सँडिनिस्टांनी दिलं असलं तरी त्या गोष्टी ते प्रत्यक्षात आणू शकले नाहीत किंवा असं करण्यात अनेक अडथळे येत होते. याचा अर्थातच अमेरिकेला फायदा झाला. सँडिनिस्टांच्या काळात जमीनदार जंगलात पळून गेले आणि तिथूनच त्यांनी सूत्रं हलवायला

सुरुवात केली. अमेरिका, जमीनदार आणि काँट्रा हे सारे एकत्र येऊन सँडिनिस्टांविरुद्ध आघाडी उघडत होते. १९८० ते ८४ या काळात अमेरिकेने निकाराग्वाचं आर्थिक साहाय्य बंद केलं. काँट्राजसाठी शेजारच्या होंडुराजमध्ये तळ स्थापन करून त्यांना शस्त्रसज्ज केलं जाऊ लागलं. निकाराग्वाचे पूल, तेलसाठे यांच्यावर हल्ले सुरूच होते. १९८४ साली तर निकाराग्वाच्या बंदरांत सुरुंग पेरण्यापर्यंत मजल गेली.

अमेरिका आणि काँट्राज यांच्या कारवायांमुळे १९८२ मध्ये निकाराग्वाला आणीबाणी जाहीर करावी लागली. सँडिनिस्टांना आपल्या प्रस्तावित निवडणुका पुढे ढकलाव्या लागत होत्या. निवडणुकांच्या प्रक्रियेत बंडखोरांचा सहभाग असावा अशी अमेरिकेची मागणी होती. मात्र सोमोझाच्या 'नॅशनल गार्ड' संघटनेच्या वतीने या तथाकथित बंडखोरांनी हिंसाचार केल्याने सँडिनिस्टांचा या सहभागाला विरोध होता. थोडक्यात सांगायचं तर अमेरिकेला आपली माणसं या निवडणुकीच्या रिंगणात हवी होती. काँट्राजबरोबर कोणतीही बोलणी करायला सँडिनिस्टांनी नकार दिला. या निवडणुकांसाठी निरीक्षक नेमले जावेत अशी मागणी अमेरिकेने केली. दोन प्रकारच्या आघाड्या या निवडणुकांत होत्या. एकीकडे काहीशा डाव्या आणि उदारमतवादी संघटनांची आघाडी होती, तर दुसरीकडे कोऑर्डिनेडोरा या नावाच्या आघाडीला अमेरिकेचा पाठिंबा होता. आर्टुरो क्रूझ या नावाचा एक उमेदवार या आघाडीतर्फे अध्यक्षीय उमेदवार म्हणून उभा राहिला. पण त्याने शेवटी या निवडणुकीवर बहिष्कार टाकला. काँट्राजनी मतदानाला जाऊन लोकांनी आपली मतं मुद्दामहून बाद करावी असं त्यांनी मतदारांना आवाहन केलं. चार नोव्हेंबर १९८४ रोजी निवडणुका होऊन तिच्यात डॅनियल ओर्तेगा यांना ६७ टक्के मतं मिळाली. बाद मतांची संख्या फक्त सहा टक्के भरली. आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी ही निवडणूक व्यवस्थित पार पडल्याचा निर्वाळा दिला, तर अमेरिकेने या निवडणुका गैरपद्धतीने झाल्याचं म्हटलं.

१९८५ ते १९९० या काळात काँट्रा बंडखोरांनी सीमेवर हल्ले सुरू केले होते; तर कोसळत्या अर्थव्यवस्थेने आणि वाढत्या महागाईने सँडिनिस्टांची राजवट त्रस्त झाली होती. परिणामी सँडिनिस्टांनी अधिकाधिक दडपणुकीची भूमिका घेतली होती. पुढे १९९० मध्ये निवडणुका होऊन त्यात सँडिनिस्टांचा पराभव झाला आणि विरोधी आघाडीच्या व्हायोलेटा शामोरा या महिलेच्या हातात सत्ता आली. हे सत्तांतर झाल्यावर काँट्राजनी आपली गनिमी लढाई थांबवली. काँट्राजच्या कारवाया, त्यासंबंधी अमेरिकेत उठलेलं वादळ हे एका स्वतंत्र लेखाचे विषय आहेत. त्याबद्दल वेगळेपणाने लिहावं लागेल.

हॅरॉल्ड पिंटर या ब्रिटिश नाटककाराने २००५ मध्ये साहित्याचं नोबेल पारितोषिक स्वीकारताना सँडिनिस्टांबद्दल काढलेले उद्गार प्रसिद्ध आहेत. पिंटर म्हणतात....

'सँडिनिस्टा काही सर्वगुणसंपन्न नव्हते. त्यांच्यात मग्रुरी आणि उद्धटपणा भरपूर होता. त्यांच्या राजकीय विचारात पुष्कळ विसंगती होत्या. पण ते विवेकी आणि सुसंस्कृत होते. एका स्थिर, सभ्य आणि विचारवैविध्य मानणाऱ्या समाजाच्या निर्मितीचा कार्यक्रम त्यांनी हातात घेतला होता. त्यांच्या राजवटीत फाशीची शिक्षा रद्द करण्यात आली. एक लाख शेतकऱ्यांना त्यांनी मरणाच्या दाढेतून ओढून बाहेर काढलं होतं. एक लाखाहून अधिक शेतकऱ्यांना त्यांनी कसत असलेल्या जमिनीची मालकी दिली. दोन हजार नव्या शाळा बांधल्या. एक अभिनव साक्षरता प्रसार मोहीम राबवून निरक्षरतेचे प्रमाण त्यांनी १५ टक्क्यांपर्यंत खाली आणलं होतं. मोफत शिक्षण जारी केलं; मोफत आरोग्यसेवा सुरू केली. बालमृत्यूंचं प्रमाण तीस-पस्तीस टक्क्यांनी खाली आणलं. पोलिओचं तर समूळ उच्चाटन झालं.'

पुढे पिंटर म्हणतात; 'या साऱ्या कर्तृत्वाला अमेरिकेने 'मार्क्सवादी लेनिनवादी विकृती' म्हटलं. अमेरिकेच्या दृष्टीने एक नवं धोकादायक उदाहरण समोर येत होतं. (त्यांची भीती अशी होती की) आर्थिक आणि सामाजिक न्यायाचे निकष जर निकाराग्वा स्वतंत्रपणे ठरवू लागला आणि आरोग्य, शिक्षण यांच्यात सुधारणा करून जर सामाजिक एकता आणि राष्ट्रीय सन्मान पुन:प्रस्थापित करू लागला तर आजूबाजूचे देशसुद्धा (हे आपल्याकडे का होत नाही) असे प्रश्न विचारतील आणि त्याच मार्गावर वाटचाल करू पाहतील...

...अध्यक्ष रेगन यांनी निकाराग्वाचं वर्णन 'एकाधिकारशाहीचा तुरुंग' या शब्दांत केलं आहे. हे सारं जणू काही योग्य वर्णन आहे असं माध्यमं आणि ब्रिटिश सरकार मानतं. पण सँडिनिस्टांच्या कारकिर्दीत मृत्युपथकं नव्हती. त्यांच्या कारकिर्दीत छळ झाल्याचं कुठेच प्रसिद्ध झालेलं नाही. लष्कराने वा सरकारने कुठेच हिंसात्मक कारवाया वा अतिरेक केल्याचं निष्पन्न झालेलं नाही. धर्मगुरूंचा छळ झाल्याचाही कुठेच उल्लेख नाही. उलट त्यांच्या शासनात तीन धर्मगुरु होते.... एकाधिकारशाहीचा तुरुंग हा खरेतर शेजारच्या एल साल्वाडोरमध्ये वा ग्वाटेमालामध्ये आहे. ग्वाटेमालामध्ये तर १९५४ साली अमेरिकेने तिथलं लोकशाही सरकार उलथून पाडलं होतं आणि त्यानंतर एकापाठोपाठ आलेल्या लष्करी शासनांच्या कारवायांना अंदाजे दोन लाख लोक बळी पडले होते.'

अनेक कारणांनी सँडिनिस्टांचा हा प्रयोग दीर्घकाळपर्यंत तग धरू शकला नाही. त्याची कारणं आणि अमेरिकेचं या मागचं 'योगदान' यावर स्वतंत्र भाष्य करावं लागेल. ते पुन्हा केव्हातरी. पण असं काहीतरी जगात अस्तित्वात येऊ शकतं– आणि तेही स्वत:जवळ फारशी संसाधनं नसताना आणि अमेरिकेचा प्रखर विरोध असताना, हे कळण्यासाठी एवढा लेखनप्रपंच!

**अशोक राजवाडे**

ashokrajwade@gmail.com

बी-३०२, अमिषा अपार्टमेंट, लक्ष्मण म्हात्रे मार्ग, नवागाव,

दहिसर (प.), मुंबई ४०००६८.

दूरध्वनी : ०२२-२८९५३६१२, भ्रमणध्वनी : ९२२३२४७४१२.

व्यासपीठ

संजय जोशी

१

**‘साला मै तो साहब बन गया’, वगैरे नाही झालं. पण... का नाकारा? त्याच्या बरंचसं जवळपास झालं खरं आयुष्य. हळूहळू चढत-चढत मी साहेबच झालो. कारण ज्या कॉर्पोरेट विश्वात मी शिरलो, त्या विश्वात सरतेशेवटी ‘मालक’ आणि ‘नोकर’ या दोनच जाती असतात. आणि मी नोकर होतो! पण माझ्या तळहातावरच्या रेषांत लाखात एक असणारे सामर्थ्य होते आणि माझ्या पत्रिकेतले ग्रह उच्चीचे होते. त्यामुळे मी नोकर जमातीतला वरिष्ठ नोकर व्हायचे ठरवले... आणि झालो! किती आवडतात नै असले स्तर आपल्या मनाला?**

# ज्याची स्पर्धा स्वत:शी आहे!

*“पहिल्याच वाक्यापासून लक्षात यायला लागतं, की हे पाणी जरा वेगळं आहे. साध्या तर्काने कळणारा हा माणूस नाही. कोणत्याही प्रकारच्या ठोकताळ्यात बसणारा तर अजिबात नाही. याची जातकुळी शोधणं हे सोपं काम नाही. त्यासाठी एकरेषीय विचार करून चालणार नाही. यशस्वी कॉर्पोरेट करिअर आणि सकस मराठी लेखन या दोन्हींची मोट बांधण्याचं कसब जमलेली ही लाजवाब व्यक्ती आहे.”*

समकालीन प्रकाशन या संस्थेनं नुकतेच मराठी प्रकाशनाला न शोभेलशा अत्युत्तम निर्मितिमूल्यांसहित ‘बिग बॉस’ हे पुस्तक काढलेय. कॉर्पोरेट विश्वात उच्चस्थानावर पोचलेल्या वीस मराठी माणसांबद्दल लिहिलेल्या सविस्तर लेखांचे हे पुस्तक आहे. त्यात एक लेखवजा व्यक्तिचित्र माझ्याबद्दल आहे. त्या लेखातलंच माझ्याबद्दलचं हे वरील वाक्य आहे. त्या पुस्तकाचा लेखक आहे ‘युनिक फीसर्च’चा आनंद अवधानी. त्याने २० लोकांच्या, सविस्तर मुलाखती घेऊन लिहिलेल्या लेखांचे ‘बिग बॉस’ हे सदर ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्या सदराचं दिमाखदार रूप असलेल्या, संपूर्णपणे आर्टपेपरवर छापलेल्या या पुस्तकात, दोन पानं भरून ऐसपैस छापलेला माझा फोटो पाहून माझ्या मराठी मनाला संकोचल्यासारखं झालं. इतके मोठे फोटो आपण फक्त सिनेमा-नटांचे पाहतो.

‘महाअनुभव’ मासिकाच्या २००७च्या दिवाळी अंकात छापलेल्या माझ्या ‘आणखी मोठ्या रेषेसाठी’ या लेखाला २००हून अधिक फोन्स, ईमेल्स, पत्रे वगैरेंचा प्रतिसाद मिळाला. कारण त्या लेखाचा विषय होता, माझा वयाच्या अवघ्या ४३व्या वर्षी नोकरी सोडून पूर्ण निवृत्ती घेण्याचा निर्णय. आश्चर्य वाटावा असाच तो निर्णय होता. कारण वरील वाक्यात आनंदने वर्णन केलेल्या हेवा वाटण्याजोग्या स्थानावर मी होतो. ‘आयडिया सेल्युलर लिमिटेड’ या कंपनीचा असिस्टंट व्हाइस प्रेसिडेंट. महिन्याला लाखांनी कमावणारा. वर्षाकाठी परदेशी जाणारा, सतत विमानप्रवास करणारा आणि पंचतारांकित हॉटेलात वास्तव्य करणारा – सुखासीन उच्चपदस्थ अधिकारी. आणि ते सारे सोडून, कोणतेही आर्थिक लाभ न घेता, मी अचानक मागच्या वर्षी फक्त वाचन-लेखन करण्याकरिता निवृत्ती घेतली. साहजिकच ज्याने ज्याने तो लेख वाचला, त्याला नवल आणि हेवा आलटूनपालटून वाटले. कित्येकांनी फोन करून तसे कळवले. काहीजणांना ती दीर्घकथाच वाटली. कारण मी ते सारे ऐषारामी जगणे हसत हसत सोडून नुसते पुस्तकांच्या जगात रमायचे ठरवले होते. पुढच्या १७ वर्षांत मिळू शकणाऱ्या कोट्यवधी रुपयांवर ‘इदं न मम’ म्हणून पाणी सोडून. आतापर्यंत मॅजेस्टिक प्रकाशनाने माझ्या तीन कादंबऱ्या छापल्या होत्या. पहिल्याच कादंबरीला (नचिकेताचे उपाख्यान) राज्य पुरस्कारासह इतरही पुरस्कार मिळाले होते. पण कादंबऱ्या लिहिणे वेगळे आणि त्यासाठी अशी नोकरी अचानक सोडणे वेगळे.

पण माझ्या दृष्टीने तो निर्णय केवळ साहजिकच नव्हे तर अपरिहार्य होता. कारण मनाच्या हाका टाळण्याइतका मुर्दाड मी कधीच नव्हतो. अगदी कॉर्पोरेट विश्वाच्या चक्रव्यूहाच्या मध्यभागी होतो तेव्हाही नव्हतो. माझ्या मनाची जडणघडणच तशी नव्हती. म्हटलं तर अगदी सामान्य असूनही निराळाच होत गेलो मी, पण त्याचे कारण इतकेच नव्हे की माझ्या तळहातावर (सामान्यपणे आढळतात तशा) हृदय रेषा आणि मस्तिष्क रेषा निरनिराळ्या नसून एकत्रच आहेत. पट्टीने आखावी तशी एकच रेषा आहे. ते तर एक कारण आहेच म्हणा, कारण (गंमत म्हणजे) त्या क्षेत्रातले जाणकार आमचे द.भि. कुलकर्णी सर सांगतात, की अशी रेषा असलेला माणूस प्रखर बुद्धिमान तर असणारच, पण त्याची बुद्धी आणि भावना हातांत हात घालून चालणार.

प्रचंड थोर व्हायला उपयुक्त अशी महाभयानक गरिबी काही देऊ शकले नाहीत माझ्या बालपणात माझे आईवडील. पण त्याची थोडी भरपाई म्हणून त्यांनी पुस्तकांच्या राशी उभ्या केल्या लहानपणी आम्हा भावंडांसमोर. सर्वसाधारण सुखी असणाऱ्या त्या शिक्षकांच्या मध्यमवर्गीय घरात मोठेपणी सांगायला सोयीस्कर असे गरिबीचे चटके नव्हते; पण सोन्याचांदीचा नव्हे तर जेमतेम स्टीलचा चमचा होता तोंडात. आणि ‘यया बद्धा प्रधावन्ति। मुक्तास्तिष्ठंति पंगुवत।’ अशा आईने शिकवलेल्या सुभाषितातली चिरंतन ‘आशा’ होती उरात. ती मात्र उदंड होती. त्यावेळी आमच्या आजूबाजूला सगळेच असे खाऊनपिऊन सुखी सदरातले मध्यमवर्गीय लोक आणि काही मध्यमवर्गीयांच्याच जीवनशैलीत जगणारे श्रीमंत लोक होते. कारण श्रीमंतीचे निर्लज्ज प्रदर्शन करायची फॅशनच नव्हती तेव्हा. बरे जन्म देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण घरात. हिंदी शिकवणाऱ्या

आणि राष्ट्रभाषेचे पंडित असणाऱ्या शिक्षक वडिलांनी बालपणी काही अर्वाच्य शिवीगाळ, मारहाण सुद्धा केली नाही. त्यामुळे त्यातही काही आगळेवेगळे दुःख किंवा अन्याय, अत्याचार नव्हतेच. मात्र आईवडिलांची प्रेमविवाह करायची परंपरा जिवंत ठेवून त्यातल्या त्यात गाडीबंगलावाल्या गोऱ्या कोकणस्थ मुलीशी लग्न, करून केले तेवढेच म्हणावे असे धाडस त्या तरुणवयात. बरे मध्यमवर्गीय शिक्षकाच्या मुलाने अभ्यासात हुशार असणे हे काही कर्तृत्व नव्हे. दुसरे काहीच धाडसी जमले नाही की आपोआप हुशार वगैरे होतातच अशी मुले, तळहातावरची हृदय+मस्तिष्क रेषा अशी प्रखर तेजस्वी असल्यावर! शिवाय मास्तर बापाच्या पोराने नाटके, नाट्यवाचन, वक्तृत्व, निबंधलेखन, कथाकथन वगैरे अशारीर आणि बिनधाडसी चळवळीत यश मिळवणे तर मुळीच आगळेवेगळे नव्हते. ते सारे उद्योग मी शाळा-कॉलेजात भरपूर केलेच. मेधा ओक बाईंनी वर्गात माझे निबंध वाचून दाखवणे हा सुखद उत्कटबिंदू. परीक्षांत तर यश मिळत होतेच. त्यात काही नवल नव्हे. त्यामुळे मेरिट लिस्टमध्ये बी.कॉम., एम.कॉम. वगैरे करत एके दिवशी सरळ कॉस्ट अकाउंटिंगच्या परीक्षेत भारतात नववा आलो, तेव्हा मात्र अंमळ निराळे वाटले खरे. मात्र तिथे निराळाच फाटा फुटला आयुष्याला. अगदी निर्णायक. कारण तोपर्यंत मनात असलेले घराण्याची परंपरा चालवणारे विद्यादान करायचे स्वप्न मी क्षणात विसर्जित केले आणि कॉर्पोरेट क्षेत्रात पाऊल टाकले.

त्या फाट्यावरून चालताना मात्र जगण्याची सारी गणितेच बदलून गेली. सगळंच काही फाट्यावर नाही मारलं, पण बऱ्याच गोष्टी बदलल्या. अगदी सिनेमॅटिकली 'साला मै तो साहब बन गया', वगैरे नाही झालं. पण... का नाकारा? त्याच्या बरंचसं जवळपास झालं खरं आयुष्य. हळूहळू चढतचढत मी साहेबच झालो. कारण ज्या कॉर्पोरेट विश्वात मी शिरलो, त्या विश्वात सरतेशेवटी मालक आणि नोकर या दोनच जाती असतात. आणि मी नोकर होतो! पण माझ्या तळहातावरच्या रेषांत लाखात एक असणारे सामर्थ्य होते आणि माझ्या पत्रिकेतले ग्रह उच्चीचे होते. त्यामुळे मी नोकर जमातीतला वरिष्ठ नोकर व्हायचे ठरवले... आणि झालो! किती आवडतात नै असले स्तर आपल्या मनाला?

ओह! कुठून निघालो होतो? जडणघडण नै का? काय असतं आपल्या बालपणात जे आपल्याला घडवतं? किंवा (बि)घडवतं? 'संस्कार' हा अतिवापराने अर्थ गमावलेला शब्द आहे नै? मला वाटते आपल्याला घडवणाऱ्या गोष्टी तीनच. पुस्तके, परिस्थिती आणि संकटे. या तिन्हींची भेट घडवून देणारे माझे आईबाप, माझा आदर्श थोरला भाऊ सुहास, माझ्या तिसऱ्या कादंबरीत मदत करणारा धाकटा भाऊ अविनाश, माझे सगळे शिक्षक, अद्वितीय बायको अनघा आणि मुख्य म्हणजे माझी मुले नचिकेत आणि राधिका यांचे कसे आभार मानावे? मी मुळात क्षणांवर प्रेम करणारा माणूस. क्षणांची स्मारके करत जगण्याचे उत्सव करणारा आनंदयात्री. प्रेमाच्या अफाट त्वरणात्मक शक्तीवर विश्वास असलेला चिरंतन प्रेमी. मैत्रिणीवरच काय, पण चक्क बायकोवर सुद्धा अजूनही कविता करणारा. लता-आशा वादात लता, गावस्कर-विश्वनाथ वादात गावस्कर अशा सरधोपट मार्गाने आपली मते टाकणारा. १९६३ साली माझा जन्म झाला, त्याच वर्षी 'कोसला' कादंबरी लिहिली गेली आणि त्या काळात हिंदी चित्रपटसंगीताचे गारुड तरुणाईवर राज्य करत होते. माझ्या स्वतःच्या तरुणाईपर्यंत ते गारुड टिकून होते आणि कॉलेज बुडवून ८५ पैशांत 'विजय', 'भानुविलास' वगैरे थिएटरात पाहिलेल्या मॅटिनी सिनेमात लोक गाण्यागाण्याला पडद्यावर पैसे उधळताना पहात होतो. पडद्यावर शम्मी आणि सायराने नजाकतीत 'मेरे यार शब्बा खैर' म्हटले की खिशातली नाणी पडद्यावर फेकायला जो खुळेपणा लागतो तो माझा स्थायीभाव. काही सुरेख सुंदर पाहिले, वाचले की डोळ्यांतून घळघळा आसवे येण्याइतका उत्कट आवेगी भाबडेपपणा. डोळे गाळावे असे दुखःच आले नाही कधी पदरात, म्हणून अशी आनंदाने रडायची सवय लागली खरी.

ही उत्कटता, आवेगी भावुकता आणि त्याच्या जोडीला यशानुगामी कष्टाळूपणा, इतक्याच पाथेयावर आजवरचा प्रवास मजेमजेने झाला. विजय मिळवण्याचे व्यसन हा या मार्गावरचा ठळक भाग. आवडतेच मला यशस्वी व्हायला. जगण्यातल्या प्रत्येक पैलूवर या विजिगिषेने वर्चस्व गाजवले. किरकोळ आणि अपवादात्मक पराभवांनी मात्र कधीच विशेष खचवल्याचे स्मरत नाही. मध्यमवर्गीय बालपणाचे संस्कार अशावेळी फार कौशल्याने बचावात्मक पवित्रा घ्यायला मदत करतात. कोणत्याच प्रकारच्या क्रांतीचे मार्ग जमणारे नव्हते आणि विजयाचे, यशाचे तर व्यसन जडलेले. अशा वेळी बौद्धिक, कलात्म आणि चातुर्याचे मार्ग तेवढे उपलब्ध असतात. तेच वापरत जगत राहिलो. ऑफिसात धडाधड प्रमोशन्स घेत राहिलो आणि लेखनात जमेल तसे अभिव्यक्त होत राहिलो. पण चाळिशीला आलो तेव्हा वाटले या दुभंग व्यक्तिमत्त्वाचे तुकडे होण्याआधी निर्णायक पाऊल उचलायला हवे. एकीकडे करोडो रुपये आणि सुखासीनतेच्या टोकाचे आमीष होते अन् दुसरीकडे आजवर न करता मिरवलेल्या व्यासंगाकडे जाण्याचा खराखुरा मार्ग होता. संस्कार म्हणा किंवा आत्म्याची हाक म्हणा, दुसरीकडे बेधडक उडी घेतलीय खरी. आता कोणत्याच यशाची वा विजयाची कांक्षा नसल्याने पराभवाचा धोका नाही. भीती तर किंचितही नाही. उदंड उत्साह आहे. कारण बाबा आमटे म्हणतात तसे, ज्याची स्पर्धा स्वतःशी आहे त्याला जिंकणारा कोण आहे?

**— संजय भास्कर जोशी**

स्नेहसिंधू, ई-३ गजानन सोसायटी,
कृष्णा कॉलनी, 'वनाज'जवळ, पौड रोड,
पुणे ४११०२९. मोबाईल : ९८२२००३४११.
email : swaraart_swapne@yahoo.com

[संजय जोशी यांचे आणखी दोन लेख
१६ आणि २३ फेब्रुवारीच्या अंकात.]

■

थेट...

सभागृहातून

## का. र. मित्र व्याख्यानमालेत

# 'आजची मराठी कथा' या विषयावर राजन खान यांनी केलेलं भाषण

**स्थळ : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**
**२७ डिसेंबर २००७ रोजी सायंकाळी ६ वा.**

एकूणच मराठी गद्य वाङ्मयाचा इतिहास फार दीर्घ नाही. त्यातही कथा-कादंबऱ्या या वाङ्मयप्रकारांचा तर मोजून शंभर-दीडशे वर्षांचाच इतिहास आहे. आजघडीला मराठी साहित्यसृष्टीचा पसारा ऐसपैस वाढलेला आहे शिक्षणाचा प्रसार जेवढा अधिक होतो, तेवढी लिहिणारांची संख्या वाढत जाते. मराठीत आज सर्वाधिक लिहिली जाते ती कविता. ती छापली किती जाते न् वाचली किती जाते, हा प्रश्नच असला तरी लिहिण्याची बाधा झालेली माणसं पहिल्यांदा लेखणी उचलून सरळ कविताच लिहायला सुरुवात करतात. कदाचित लिहायला तो छोटा आणि सोपा प्रकार वाटत असल्यामुळेही तसं घडत असावं. कवितेच्या खालोखाल दुसरा लिहिला जाणारा साहित्यप्रकार म्हणजे कथा. इतर कुठल्याही गद्य लेखनप्रकारापेक्षा मराठीत कथाच जास्त लिहिली जाते. 'दिवाळी अंक' नावानं वार्षिकांक प्रकाशित करणारी 'मराठी' ही जगातली एकमेव भाषा आहे. मराठीत दरवर्षी साधारणपणे पाचशेच्या आसपास दिवाळी अंक छापले जातात. त्यांचा मुख्य आधार कथा-साहित्य हाच असतो. माझ्या अंदाजानुसार एका दिवाळी अंकाच्या हंगामातच तीनचार हजार कथा मराठीत प्रसिद्ध होतात. त्याशिवाय वर्षभर विविध नियतकालिकांसाठी लिहिल्या जाणाऱ्या कथा आणि नुसत्या पुस्तकांसाठी लिहिल्या जाणाऱ्या कथा यांचा मिळून अंदाज केला तर मराठीत दरवर्षी आठदहा हजार कथा लिहिल्या जात असाव्यात.

पंचतंत्रातील गोष्टी, जातककथा हे खरं भारतीय गद्य वाङ्मय. पण ते मूळ मराठी भाषेतलं नव्हे. मराठी गद्य वाङ्मय खऱ्या अर्थानं उदयाला आलं आणि त्यानं आकार घेतला तो इंग्रजांच्या अमदानीत. इंग्रजांच्या काळात जगाची अनेक दारं मराठी माणसांसाठी उघडली गेली, त्यातलं एक दार वाङ्मयाचं. त्यानं मराठी कवितेला नवी रचना दिली, तर कथा, कादंबरी हे नवे प्रकार रुजवले, मराठी नाटकही त्यामुळं बदललं. जास्त करून इंग्रजी भाषेमुळेच आपल्याला जगभरच्या वाङ्मयाचा परिचय होऊ लागला. इंग्रजीच्या तंत्र, मंत्र, शैली आणि मांडणीसारख्याच कथा आपण मराठीत लिहू लागलो आणि त्यात आजही फारसा बदल नाहीच. कथांचे अनेक प्रकारही आपण इंग्रजांकडूनच उचलले आणि अजूनही आपला असा स्वतंत्र मराठी कथाप्रकार जन्माला घालण्याची हिंमत आपण दाखवू शकलेलो नाही.

कथा किंवा कोणताही साहित्यप्रकार लिहिण्याचे दोन प्रकार आहेत, असं मला वाटतं. जेवढं स्वत:च्या जगण्यात येतं, तेवढंच लिहायचं, हा एक प्रकार आणि आपल्या जगण्याबाहेर उतरून, मुद्दाम लेखक म्हणून दुसऱ्या, परक्या जगण्याचा अनुभव घ्यायचा आणि मग लिहायचं, हा दुसरा प्रकार. बहुतेक सर्व मराठी लेखक पहिल्या प्रकारात असतात. त्या दुसऱ्या प्रकारात स्वत:चं जगणं सोडून, तात्कालिक कारणांसाठी आणि काळासाठी दुसऱ्या जगण्यात शिरण्याची तयारी लागते, त्यासाठी संशोधक वृत्ती व अभ्यासक वृत्ती लागते, ती मराठी लेखकांनी आजवर दाखवलेली नाही आणि त्यामुळंही एकूणच मराठी वाङ्मयात किंवा कथावाङ्मयात जगावेगळं किंवा जगावर प्रभाव टाकणारं काही घडलेलं नसावं असं वाटतं.

मराठी कथेच्या मागासलेपणाला अनेक कारणं आहेत. खरा आणि श्रेष्ठ लेखक कसा असावा याची जी व्याख्या आपण इथं करतो आहोत, त्या व्याख्येत बहुतेक मराठी लेखक बसतच नाहीत. लेखक माणूस म्हणून कसाही असला तरी तो लिहिण्याच्या आशयविषयापासून लिहिताना पूर्ण अलिप्त, तटस्थ असला पाहिजे.

> **स्त्रीवादी साहित्य म्हणे स्त्री-पुरुष समतेची मागणी करतं. मला वाटतं, इतर ललित साहित्यातही ती मागणी आवर्जून नोंदवलेली असते. मग स्वतंत्र असा स्त्रीवादी साहित्यप्रकार काय आहे? ते फक्त स्त्रियांनीच लिहावं लागतं का? आणि जगण्याची उच्छृंखल रूपं म्हणजेच स्त्रीवादी साहित्य का? स्त्रीवाद, पुरुषवाद असं करत राहिलो, तर मला नाही वाटत कधी 'समता' येईल म्हणून.**

त्याच्या व्यक्तिगत आचारविचारांचा आणि जगण्याचा प्रभाव लेखनविषयावर पडता कामा नये आणि त्यानं स्वत:शी प्रामाणिक राहून नव्हे, तर विषयाशी प्रामाणिक राहून लिहिलं पाहिजे ही ती व्याख्या आहे. यालाच मी स्वत:च्या जगण्यातून बाहेर येऊन लिहिणं म्हणतो. तसं मराठी लेखकांचं होताना दिसत नाही. कोणत्याही विषयाला आपल्याला वाटणारी, दिसणारी एक बाजू असते, पण त्याही पल्याड जाऊन आपल्याला न दिसणारी दुसरीही एक बाजू असते. ती दुसरी बाजू शोधून, दोन्ही बाजूंचा सारासार विचार करून, त्यांचा मध्य काढून, सम्यक् बुद्धीने लिहिलं पाहिजे. तसं लिहिताना हृदय विशाल असलं पाहिजे. कुणा एका बाजूची तळी उचलून धरतोय आणि दुसऱ्या बाजूवर अन्याय करतोय असं घडलं नाही पाहिजे, तरच ते लिखाण कसदार आणि काळाच्या ओघात कायम टिकून राहणारं होईल, याचं भान मराठी लेखकांकडं फारसं दिसत नाही. मराठी लिखाण काही हेतू घेऊन गाजतं, गाजवलं जातं, पण ते आपल्या देशप्रदेशाच्या सीमा ओलांडून आणि काळाच्या मर्यादा ओलांडून पोहोचत राहतं असं होत नाही.

याचं (मला वाटणारं) मुख्य कारण असं की, मराठी लेखक आणि त्यांनी लिहायला निवडलेले विषय या दोघांनाही मराठी समाजात मौजूद असलेल्या तमाम भेदांची बाधा झालेली असते.

मराठी समाजात मौजूद असलेल्या सर्व भेदाभेदांची यादी सगळ्या बारकाव्यांनिशी करायला बसलं तर एखाद्या व्यक्तीची संपूर्ण हयात अपुरी पडेल. (आपल्याकडं निरनिराळ्या विषयांचे कोश तयार केले जातात. मला वाटतं, एकदा मराठी समाजातल्या भेदाभेदांच्या विषयावरसुद्धा कोश तयार करावा. अनेक खंडाचा महाकोश तयार होईल.) मराठी समाज कोणताही एक नवा मुद्दा सापडला की, त्यात लगेच भेदाभेदांचे प्रकार सुरू करतो. धर्म, जाती, पंथ, विचार, संप्रदाय, पक्ष, लिंग, वंश, वर्ण, रंग, रूप, भाषा, प्रदेश, अन्न, वर्ग, कर्म, उद्योग, शिक्षण, वय असं माणसाच्या जगण्यात जे जे काही असतं, त्यात मराठी माणूस भरपूर भेद पाडतोच आणि ते फार नेकीनं आणि नेमस्तपणानं पाळतो.

ज्या समाजात भेदांचा तुफान बुजबुजाट असतो, तो समाज कमालीचा अस्वस्थ, अशांत, बेचैन, गोंधळलेला, भरकटलेला, विविध अनाचार आणि अत्याचारांना ऊत आलेला, भोंदू, ढोंगी, हरामी आणि बेनवाड असतो. अशा समाजातली माणसामाणसांतली सर्वच पातळ्यांवरची स्पर्धा, ईर्षा, असूया तीव्र वाढते. सर्वच स्तरांवर माणसं एकमेकांशी टकरत, लढत, संघर्ष करीत असतात. एकमेकांच्या उरावर बसत असतात. खरं तर समाजाची ही बिकट आणि बेकार स्थिती म्हणजे त्या समाजातल्या तमाम लेखकांना लिहायचं भांडवल किंवा मालमसाला म्हणून अतिशय पूरक आणि फायदेशीर असते. समाज जेवढा अनागोंदीचा, तेवढा लेखकांसाठी विषयांचा, आशयांचा पुरवठा मुबलक. जगात नुसत्या सुखाच्या गोष्टी लिहिता येत नाहीत. रोचक, वाचनीय, दर्जेदार गोष्टी होतात त्या नेहमी दु:ख, दारिद्रय, दैन्य, समस्या, संकटं, अडचणी यांच्याच. त्या अर्थानं मराठी समाज आजच्या मराठी लेखकांना विषय पुरवण्याच्या दृष्टीनं अत्युच्च टोकावर आहे. मराठी समाज सर्वच बाबींत एवढ्या प्रमाणात भंगलेला आहे की, मराठी लेखकांना लिहिण्याच्या दृष्टीनं हा काळ अतिशय आव्हानात्मक आणि आवाहनात्मक आहे. इतके विषय सभोवताली आहेत की, लेखक म्हणून जगायला त्यांना दहा-बारा लाख वर्षांचं आयुष्य कमी पडेल.

मराठी लेखक माहीत करून घेऊन लिहीत नाहीत, तर फक्त माहीत असलेलं तेवढंच लिहितात, ही गोष्ट खरीच असली तरी माहीत असलेलं तरी खऱ्या अर्थानं लिहिताना दिसतात का? असा एक आरोप मराठी साहित्यावर सातत्यानं केला जातो की, एवढी मोठी भारत-पाक फाळणी झाली, तिचं साधं दर्शनसुद्धा मराठीत होताना दिसत नाही. त्या एवढ्या मोठ्या फाळणीचं जाऊ द्या हो, ती फार दूर घडली; पण जे काही मराठी प्रांतात घडत असतं, त्याचं तरी दर्शन मराठी साहित्यात कुठं घडतं? उदाहरणार्थ, मराठी प्रांतभर सतत धार्मिक, जातीय, सांप्रदायिक दंगली होतात, त्यावर तरी कुठं लिहिलं जातं? मराठवाड्यात एवढं मोठं विद्यापीठ नामांतर आंदोलन झालं, त्यावर तरी दलित सोडून इतर जातीधर्माच्या लेखकांनी कुठं लिहिलंय? गुजर-मारवाड्यांची एवढी मोठी स्थलांतरं झाली, त्यावर मराठी साहित्यात काय आहे? आदिवासी आणि भटक्या-विमुक्तांची एवढी परवड झाली, तिच्यावर त्यांच्यातल्या सोडून इतरांनी काय लिहिलंय? ब्राह्मण सोडून ब्राह्मणांच्या हालअपेष्टांवर कुणी काय लिहिलंय? पक्षीय राजकारणांनी मराठी प्रांतात जी वाताहतखोर उलथापालथ चालवलीय, तिच्यावर कुणी काय लिहिलंय?

**‘कथा हा साहित्यप्रकार नाही’ असं म्हणणारांपैकी काहीजण कविता आणि कादंबरी हे प्रकार मात्र हाताळत राहिले. त्यांच्यावर टीका करायची मला इच्छा नाही, पण त्या अनुषंगानं इथं एक गोष्ट सांगायची आहे ती अशी की, कथा काय, कविता काय किंवा कादंबरी काय, (किंवा नाटक, चित्रपट, नृत्य, चित्र इत्यादी कला काय) यातून माणसाला अंतिमत: कथाच सांगायची असते. मांडणीचा प्रकार फक्त वेगळा.**

असे कित्येक विषय आहेत जे भोवती दिसत असूनही, अनुभवत असूनही मराठी लेखक त्यावर लिहीत नाहीत.

मराठी लेखकांत भेद असतात, हे एकवेळ आपण मान्य करू, पण त्यांनी लिहिलेल्या कथेचेसुद्धा भेद पाडण्याची प्रथा जोरात प्रचलित आहे, ती मात्र माझ्या पचनी पडत नाही.

मी असं मानतो की, कथा ही फक्त कथाच असते. कथा म्हणजे सांगण्याची गोष्ट. किंवा ‘सांगणं’ म्हणजेही कथा. सांगणं हे नुसतं सांगणं असतं, त्याची वर्गवारी होऊ शकत नाही. आदिम काळात

माणसात जेव्हा संवेदना निर्माण झाल्या, तेव्हापासून माणूस सांगतो आहे. माणसांचा समूह टिकवून धरणं, माणसाचा काळ पुढच्या पिढ्यांना धडा मिळावा म्हणून नोंदवून ठेवणं, एकमेकांशी व्यवहार सुरळीत होणं आणि त्यातून जगणं सुसह्य, सुरक्षित, शांत, सुखी होणं असे माणसाच्या सांगण्यामागं हेतू असतात. या सांगण्याच्याच आदिम परंपरेचाच एक आविष्कार म्हणजे गोष्टी किंवा कथा. त्या आविष्कारात काल-परवा माणसांनी आपल्या भेदनीतीनुसार वर्गवारी सुरू केली आहे. जगभर लिहिल्या जाणाऱ्या कथांमध्ये फारसे भेदप्रकार असल्याचं आढळत नाही, पण मराठी कथेमध्ये मात्र बेसुमार भेद आहेत. ग्रामीण, दलित, ललित, ब्राह्मणी, अब्राह्मणी, शहरी, महानगरी, स्त्रीवादी, सामाजिक, कौटुंबिक, कलात्मक, मुस्लिम, जैन, इत्यादी इत्यादी... अशी विभागणी म्हणे अभ्यासकांना कथांचा अभ्यास करताना उपयुक्त ठरते. मुळात समाजात अभ्यासक असतात किती? मूठभरसुद्धा नसतात आणि अभ्यासक नावाची तरी वेगळी जात कशाला करायची? बाकीचे वाचक काय अभ्यासक नसतात? तमाम बिनचेहऱ्याचे वाचकच कुठली कथा वाचायची, काळाच्या ओघात टिकवून धरायची हे ठरवतात. कथेची उपयुक्तता, निरुपयोग हे वाचकच ठरवतात. (या वाचकांमधल्याच काही वाचकांना स्वत:ला चेहरा मिळावा असं वाटतं, नं ते अभ्यासक होतात.) अभ्यासकांना समजा कथेबद्दल बोलायचं असेल तर ते अमक्या कथेत अमका विषय आणि तमका आशय मांडलेला आहे असं बोलू शकतात की. त्यासाठी कथेला कुठल्या तरी एका वर्गवारीच्या कप्प्यात कशाला घालायचं? त्यामुळं, मला वाटतं, त्या कथेचा, त्या कथेतल्या सांगण्याचा संकोच होतो. त्या कथेला समाजाचा, जगाचा विस्तृत आणि असीम अवकाश मिळू दिला जात नाही, ती कथा एका तात्कालिक कोंडवाड्यात कोंडली जाते. ती प्रचारकी पत्रकाप्रमाणे होते नं तिच्यातला 'सांगणं' या आदिम परंपरेचा दिलखुलासपणा निघून जातो. समजा, अजून हजार वर्षांनी मराठी समाजात एकही जात नसेल, किंवा काही जाती नष्ट झालेल्या असतील, तेव्हा आजच्या जातीय वर्गवारीनं पाहिल्या किंवा लिहिल्या गेलेल्या कथांचं मोल कसं आणि काय असेल?

**मराठीत अशा भेसळ भाषेत लिहिणारे तमाम लेखक, त्यांचं छापणारे संपादक व प्रकाशक आणि त्यांना डोक्यावर घेणारे वाचक, हे सर्वच मराठी भाषा व मराठी साहित्य आणि त्यातून घडू पाहणाऱ्या मराठी संस्कृतीचे मारेकरी आहेत असं मला वाटतं. या अशा लेखकांना आताच रोखणं आणि मराठीतच लिहायला बाध्य करणं हे मराठी साहित्य-संस्कृतीच्या भवितव्याच्या दृष्टीनं आवश्यक आहे.**

पुन्हा आज ज्या वर्गवाऱ्या असतात त्याही विकृतच असतात. दलितांशिवाय ज्यांनी कुणी दलितांबद्दल कथा लिहिल्या आहेत, त्यांना दलित कथाकार आणि त्यांच्या कथेला दलित कथा म्हटलं जात नाही. ब्राह्मणांशिवाय ज्यांनी ब्राह्मणविषयक कथा लिहिल्यात त्यांना ब्राह्मण कथाकार आणि त्यांच्या कथेला ब्राह्मणी कथा म्हटलं जात नाही. ग्रामीण कथा म्हणजे पुन्हा शेतकऱ्यांभोवती घुटमळणाऱ्या कथा. (त्यांचा आता 'कृषिजन साहित्य' म्हणून वेगळा भेद निर्माण केला जातोय.) ग्रामीण भागात काय फक्त शेतकरीच राहतात काय? इतर जाती, धर्म, व्यवसायाचे लोक राहत नाहीत काय? भटके-विमुक्त, आदिवासी, दलित हेही ग्रामीण भागात राहतात. मग त्यांनी लिहिलेलं साहित्य ग्रामीण का नाही? खेड्यातल्या मुसलमानांवर लिहिलेल्या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हटलं जात नाही. एवढंच कशाला कोकण हा ग्रामीणच भाग आहे, हे आपल्या सगळ्यांना उघडपणे ठाऊक आहे, पण आपण कोकणी साहित्याला ग्रामीण साहित्य आणि त्या लेखकांना ग्रामीण साहित्यिक म्हणत नाही.

'स्त्रीवादी साहित्य' नावाचा एक प्रकार सध्या मराठीत प्रचलनात आहे. त्याच्या विरोधात भेदनीतीनुसार अजून 'पुरुषवादी साहित्य' हा प्रकार का अस्तित्वात आला नाही याचं आश्चर्य वाटतं. माणसांसंबंधी जगात जे जे साहित्य लिहिलं जातं, त्यात अपरिहार्यपणे स्त्री आणि पुरुष या दोन्हींसंदर्भात लिहिलं जातं. त्यात थोडं प्रमाण सोडलं तर स्त्रियांविषयी विकृत, विचित्र लिहिलं जात नाही. असं दिसतं की जगातले बहुतेक गंभीर लेखक स्त्रियांविषयी कळवळ्यानंच लिहितात. मराठी साहित्याचंही ते थोर वैशिष्ट्य आहे. पण त्या तमाम लेखकांच्या साहित्याला कधीही स्त्रीवादी साहित्य म्हटलं गेलेलं नाही.

स्त्रीवादी साहित्य म्हणे स्त्री-पुरुष समतेची मागणी करतं. मला वाटतं, इतर ललित साहित्यातही ती मागणी आवर्जून नोंदवलेली असते. मग स्वतंत्र असा स्त्रीवादी साहित्यप्रकार काय आहे? ते फक्त स्त्रियांनीच लिहावं लागतं का? आणि जगण्याची उच्छृंखल रूपं म्हणजेच स्त्रीवादी साहित्य का? स्त्रीवाद, पुरुषवाद असं करत राहिलो, तर मला नाही वाटत कधी 'समता' येईल म्हणून. (जगातल्या कोणत्याही 'वादा'त समता आणण्याचं बळ अजिबात नसतं.) आणि समता ही गोष्ट कुणा एका वर्गानं दुसऱ्या वर्गाकडं भिकेत मागण्याची असते असं मला नाही वाटत. जगातल्या तमाम समस्या फक्त पुरुषांनीच जन्माला घातलेल्या असतात असंही मला नाही वाटत.

थोडक्यात, कथांच्या प्रकाराचे भेद पाडून कथा लिहिली जाणं हे गैर आहे नं साहित्यसृष्टीच्या एकूण विकासाला आणि संभावित विशालतेला हानिकारक आहे असं मला वाटतं.

कथांची मापं ठरवण्याची एक चुकीची प्रथा आपल्याकडं अस्तित्वात आली आहे. कथा म्हणजे सांगणं, सांगायचा एक विषय पूर्ण करणं किंवा आणलेला एक विषय पूर्ण सांगणं म्हणजे कथा. ते सांगणं किती मापाचं असावं हे कसं सांगणार? अमुक शब्दमर्यादा, अमुक पानमर्यादा आणि त्या मर्यादेवर अवलंबून

कथा, लघुकथा, दीर्घकथा अशी विभागणी करणं हा खेळ फार पुसट आहे.

मला वाटतं, गोष्ट ही सविस्तरच सांगितली पाहिजे. ती संक्षिप्त आणि सांकेतिक असता कामा नये. लेखकाची संक्षिप्तता सगळ्या समाजाला एकाच वेळी कळू शकेल असं नाही. त्या संक्षिप्ततेत आणि सांकेतिकतेत दडलेले जे संदर्भ आहेत, ते सर्वच्या सर्व समाजाला माहीत असतात असं गृहीत धरणंही चूक आहे आणि समजा एका काळातल्या एका समाजाला सगळे संदर्भ माहीत आहेत असं आपण मान्य केलं तरी भावी काळातल्या, भावी पिढ्यांना ते संदर्भ जसेच्या तसे माहीत होतील याची शक्यता काय? काळ, समाज, भाषा यांचे संदर्भ सतत बदलते राहू शकतात, तर मग आजच्या संक्षिप्त आणि सांकेतिक कथेचं नंतरच्या काळात मोल काय?

मध्यंतरी मराठीतले काही महाभाग म्हणाले की, 'कथा' हा मुळात साहित्यप्रकारच नाही. त्यांनी हे मत कुठनं उचललं कळत नाही, कारण त्यांनी केलेली मराठी साहित्याची समीक्षा ही नेहमी परकी आणि परपुष्टतेवर आधारलेलीच असते. त्यांचं हे मतही बाहेरून उचललेलंच असणार. त्या मताचा मराठी कथेवर फारसा परिणाम झाला नाही. थोडा झटका मात्र जरूर बसला. पण त्यांचे अनुयायीसुद्धा कथा लिहीत राहिले, ही एक थोर गोष्ट.

**मानवी समाज हा माणूस आणि निसर्ग यांच्या बाबतीत क्रूरच होता. पण आताच्या जागतिकीकरणामुळं तो अधिक क्रूर, सहानुभूतीशून्य आणि संवेदनाशून्य होत चालला आहे. माणसाच्या आधीच्या क्रौर्यात अल्पसंतुष्टता होती, पण आताच्या क्रौर्यात अधिक हव्यासीपणा आणि अधिक स्पर्धात्मकता आलेली आहे. अशा या काळात मानवी समाजाकडून लेखकांना अधिकाधिक आणि नवनवे विषय मिळण्याची शक्यता वाढणार आहे.**

'कथा हा साहित्यप्रकार नाही' असं म्हणणारांपैकी काहीजण कविता आणि कादंबरी हे प्रकार मात्र हाताळत राहिले. त्यांच्यावर टीका करायची मला इच्छा नाही, पण त्या अनुषंगानं इथं एक गोष्ट सांगायची आहे ती अशी की, कथा काय, कविता काय किंवा कादंबरी काय, (किंवा नाटक, चित्रपट, नृत्य, चित्र इत्यादी कला काय) यातून माणसाला अंतिमत: कथाच सांगायची असते. मांडणीचा प्रकार फक्त वेगळा. कवितेतही कथाच मांडावी लागते, कथेतही कथाच मांडायची असते न् कादंबरीतही कथाच मांडायची असते. त्यामुळं कादंबरी व कविता चांगली न् कथा वाईट असं म्हणता येत नाही. थोडक्यात लयबद्ध सांगितलेली कथा म्हणजे कविता, तर अधिक विस्तारानं मांडलेली कथा म्हणजे कादंबरी.

० ० ०

मराठी कथेच्या आणखी एका प्रचलनाकडं मला आपलं लक्ष वेधायचं आहे. या काळात भाषेच्या बाबतीत मराठी कथा अधिक बाटगी आणि अधिक विकृत होत चालली आहे. इंग्रजी शब्दांचा मुबलक वापर आजच्या मराठी कथेत होतोच आहे, पण तो नुसत्या देवनागरी लिपीतच नाही, तर सरळ सरळ इंग्रजी लिपीतही होतो आहे. हा मला प्रतारणेसारखाच प्रकार वाटतो. महाराष्ट्रात दोन टक्के लोकांनाही अजून धड इंग्रजी येत नाही, तर मग मराठी वाचकांसाठी ही भेसळ भाषेची कथा का लिहिली जाते? 'या लेखकाला इंग्रजीसुद्धा येते न् तो फार शहाणा आहे' हे दर्शवण्यासाठी? की मराठी भाषेतले पर्यायी शब्द त्याला सुचत नाहीत, म्हणजे मराठी भाषेबाबत तो अडाणी आहे हे दर्शवण्यासाठी?

अशी भेसळ कथा लिहिणारे लोक सांगतात की, सध्या समाजात जी भाषा बोलली जाते, तीच आम्ही कथेत वापरतो. पण पहिली गोष्ट म्हणजे, ते लिहितात तशी भेसळ भाषा आख्खा मराठी प्रांत वापरत नाही. मूठभर अर्धवट शहाणे ती वापरतात. दुसरी गोष्ट म्हणजे साहित्य आणि साहित्यिक यांचीच जबाबदारी असते, भाषेतले जुने शब्द टिकवून ठेवण्याची न् समाजाला नवे नवे शब्द पुरवत राहण्याची. लोक भले कोणत्याही भाषेत बोलोत, साहित्यिकानं आपल्या भाषेशी प्रतारणा करण्याची गरज नसते. काही अपवाद वगळता आजचे मराठी कथाकार टणकपणे आपल्याच भाषेत सातत्याने लिहितायंत असं दिसत नाहीत. हे लेखक निर्लज्जपणे सांगतात की, लिहिताना ऐनवेळी, पर्यायी मराठी शब्दच सुचत नाहीत; त्यांच्या भाषादारिद्याची कीव येते. लेखक होण्यासाठी इतर अनेक अभ्यासाबरोबर भाषेचाही दांडगा अभ्यास असावा लागतो, अशी जाणीव आजच्या बहुतांश मराठी लेखकांकडं नाही. किमान मराठीत जे ढिगानं शब्दकोश आहेत, ते बाळगावेत, चाळावेत, याला त्यांची तयारी नसते. वेगवेगळी भाषिक पात्रं कथेत उभी केली तर त्या त्या पात्रांच्या बोलींना प्रामाणिक न्याय द्यावा, हेही त्यांना सुचत नाही.

मराठीत अशा भेसळ भाषेत लिहिणारे तमाम लेखक, त्यांचं छापणारे संपादक व प्रकाशक आणि त्यांना डोक्यावर घेणारे वाचक, हे सर्वच मराठी भाषा व मराठी साहित्य आणि त्यातून घडू पाहणाऱ्या मराठी संस्कृतीचे मारेकरी आहेत असं मला वाटतं. या अशा लेखकांना आताच रोखणं आणि मराठीतच लिहायला बाध्य करणं हे मराठी साहित्य-संस्कृतीच्या भवितव्याच्या दृष्टीनं आवश्यक आहे. कोणतीही एक भाषा दुसऱ्या भाषेवर आक्रमण करत नसते, त्या त्या भाषेतले प्रतारणाखोर सूर्याजी पिसाळच त्या भाषेचा जीव घेतात असं मला वाटतं.

० ० ०

आपल्या मराठी परिप्रेक्ष्यापुरतं बोलायचं तर गेल्या शे-दीडशे वर्षांत भरपूर कथा लिहिली गेली आहे. १९५०च्या आसपास आणि त्यानंतर मराठी कथेला खऱ्या अर्थानं बहर आलेला दिसतो. नुसते 'कथाकार' म्हणून या काळात असंख्य नावं गाजली, पण

इतर साहित्यप्रकारात नावं झालेल्या लेखकांनीही आपापल्या परीनं मराठी कथेत भर घालायचं काम केलेलं आहे. प्रयोगशीलता आणि जीवनानुभवांची वैविध्यपूर्ण मांडणी याबाबतीत आकलनाच्या मर्यादा असल्या तरी आणि कथांच्या मांडण्यांचा मुख्य आधार पाश्चात्त्य साहित्य असला तरी मराठी कथेनं आपल्या मगदुरात समृद्ध होण्याचा प्रयत्न निश्चितच केलेला आहे. कथेची नवी मांडणी, एखादा नवा प्रयोग, मराठी कथेनं अजून जगाला दिलेला नसला तरी गेल्या शे-दीडशे वर्षांतल्या पेरणीवर भविष्यातली मराठी कथा तशी दिशा घेईल अशी आशा वाटते.

गेल्या पन्नास-साठ वर्षांत मराठी कथेत असंख्य नावं दांडगी झाली, गाजली. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडं कथा संक्रमित होत लेखकांची फळी उभी होत राहिली.

माझ्या पिढीनं या न् त्या निमित्तानं गेल्या शंभर वर्षांतली मराठी कथा वाचलेली आहे. या पिढीतले नुसतं मराठी वाचन करणारे जे आजचे कथाकार आहेत, ते गेल्या शंभर वर्षांतल्या आणि विशेषत: १९५० नंतरच्या कथेवरच परिपुष्ट झालेले आहेत. या काळातले लेखक कुठं अनुभव विकत घ्यायला गेले नसले किंवा धुंडाळायला गेले नसले, तरी त्यांनी आपल्याच सभोवतालातून आपली मराठी माती कथेत मांडली आहे. त्या कथेच्या विषय-आशयांना मर्यादा राहिली न् त्या कथेत फार वैविध्य नसलं, वैचित्र्य नसलं तरी मराठीपुरता तरी प्रत्येक कथाकारानं मराठी मातीचा आणि मराठी संस्कृतीचा स्वत:ला जाणवलेला कंगोरा कथेत आणण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि त्यातून प्रत्येक कथाकार स्वतंत्रपणे नाव घेण्या इतपत नावाजला गेलेला आहे. आपण नुसती नावं घेत गेलो तरी त्यांची कथावैशिष्ट्यं आपल्या मनासमोर उभी राहतात. जी.ए.कुलकर्णी, दि.बा.मोकाशी, चिं.वि.जोशी, व्यंकटेश माडगूळकर, श्री.दा.पानवलकर, गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, श्री.ज.जोशी, अण्णाभाऊ साठे, शंकर पाटील, र.वा.दिघे, जयवंत दळवी, चिं.त्र्यं.खानोलकर, वामन चोरघडे, अरविंद गोखले, द.मा.मिरासदार, शं.ना.नवरे, व.पु.काळे, भाऊ पाध्ये, रघू दंडवते, उद्धव शेळके, बी.रघुनाथ, के.ज.पुरोहित, अनिल रघुनाथ कुलकर्णी, शरदचंद्र वासुदेव चिरमुले, रत्नाकर मतकरी, राजेंद्र बनहट्टी, ह.मो.मराठे, ज्योत्स्ना देवधर, गौरी देशपांडे, आशा बगे, आनंद यादव, सानिया, भारत सासणे, रंगनाथ पठारे, वामन होवाळ, विद्याधर पुंडलिक, द.पां.खांबेटे, लक्ष्मण लोंढे, राजन गवस, सुबोध जावडेकर, चारुता सागर, महादेव मोरे, अरुण साधू अशा असंख्य नावांनी गेल्या पन्नास-साठ वर्षांतल्या मराठी कथेला आकार-उकार दिला. या 'आकार-उकारा'च्या आधारावरच येत्या काळातली मराठी कथा आपली उभारणी करणार आहे.

माणसं टोळ्या करून राहू लागली तेव्हापासून जागतिकीकरण चालू आहे, पण सध्याचं जागतिकीकरण हे आधुनिक सुविधा आणि संपर्कसाधनं यामुळं अधिकच वेगवान ठरणार आहे. त्यातून जग आणि मानवी समाजाचे संदर्भही झटापट बदलत चाललेत. मानवी समाज हा माणूस आणि निसर्ग यांच्या बाबतीत क्रूरच होता. पण आताच्या जागतिकीकरणामुळं तो अधिक क्रूर, सहानुभूतीशून्य आणि संवेदनाशून्य होत चालला आहे. माणसाच्या आधीच्या क्रौर्यात अल्पसंतुष्टता होती, पण आताच्या क्रौर्यात अधिक हव्यासीपणा आणि अधिक स्पर्धात्मकता आलेली आहे. अशा या काळात मानवी समाजाकडून लेखकांना अधिकाधिक आणि नवनवे विषय मिळण्याची शक्यता वाढणार आहे. म्हणून लेखकांनी सजग आणि संवेदनशील राहून या काळाचा आपल्या लिहिण्यासाठी लाभ करून घ्यायला हवा. त्यातही मराठी लेखकांसाठी जास्त संधी आहेत. कारण एक तर मराठी प्रांत आणि मराठी समाज हा स्वत:ची धडकी संस्कृती नसलेला किंवा अनेक संस्कृतीची मिळून खिचडी संस्कृती असलेला प्रांत किंवा समाज आहे. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर अशा चारही दिशांनी मराठी प्रांतावर भाषेपासून ते पेहेरावापर्यंत जगण्या-वागण्याच्या प्रत्येक घटकाबाबतीत असंख्य दबाव येत राहिलेले आहेत, आजही येत आहेत. त्यामुळं मराठी संस्कृतीत कायम एक अनिश्चितता, अस्थैर्य आणि विविधता आढळत आलेली आहे. ती गोष्ट लेखनाला नवनवे आशय-विषय मिळायला पूरक आहे. मराठी लेखकांनी आयत्या चालून येणाऱ्या या विषयांचा तटस्थ आणि खुल्या दिलानं, नीट आणि नेमका वेध घेणं आवश्यक आहे. माणूस म्हणून ते जे काही जगतात, त्यातून लेखक म्हणून बाहेर येऊन त्यांनी येत्या आव्हानात्मक काळाला सामोरं जाणं आणि आपली लेखणी कुणा एका बाजूसाठी न झिजवता, संपूर्ण मानवी समाजासाठी, सम्यक् विचार करून झिजवणं आवश्यक आहे. तसं झालं तर भविष्यकाळात मराठी कथा ही आपोआप जागतिक पातळीवर जाईल आणि काळाच्या ओघावर टिकून राहणारी राहील!

**राजन खान**

इंद्रप्रस्थ, सुखसागरनगर, पुणे ४११०४६.

भ्रमणध्वनी : ९४२२००५०६५

## गुरुजींचा जिता जागता वारसा

ज्येष्ठ सेवादल सैनिक श्री.परीट गुरुजी यांना साने गुरुजी कथामालेचा रु.२५०००/- रुपयांचा पुरस्कार वर्धा येथे नुकताच मिळाला. त्यामध्ये स्वत:चे रु.१०००/- घालून त्यांनी १३ संस्थांना प्रत्येकी २०००/- रुपयांची देणगी दिली. त्यात साधना साप्ताहिकाचा समावेश आहे. याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. काही वर्षांपूर्वी परीट गुरुजींना मालेगाव येथे लाखांहून अधिक रुपयांचा गौरवनिधी देण्यात आला. त्यातही त्यांनी स्वत:ची भर घालून तो सार्वजनिक कार्यासाठी दिला. साने गुरुजींच्या प्रेरणांचा हा जिता जागता वारसा आहे.

# संगीत समीक्षक मोहन नाडकर्णी

साधना कामत

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. आमच्या संस्थेने पुण्यात एक संगीतसंमेलन आयोजित केले होते. 'यशवंतराव चव्हाण' सभागृहात अश्विनी भिडे गात होत्या. गाणे ऐन रंगात आले असता, पुढच्या आसनावरील एक बुजुर्ग श्रोते उभे राहिले आणि त्यांनी हात उंचावून मोठ्याने उत्कट अशी दाद दिली. अश्विनीने मान लववून त्याचा स्वीकार केला आणि आभारादाखल दोन शब्द उच्चारलेदेखील. असे प्रकार दिवाणखान्यातील छोट्या मैफलीत दिसून येतात. मोठ्या वातानुकूलित हॉलमध्ये असा प्रतिसाद आम्ही प्रथमच पाहत होतो. पण हे शोभून गेले, इतकेच नव्हे पंच्याऐंशीच्या पुढे. शरीर थकले असले तरी स्मृती तल्लख आणि जुन्या हकीकती सांगण्याची दांडगी हौस. मनमोकळे बोलणे झाले.

'तुम्ही संगीत-समीक्षक कसे झालात?' हा ठेवणीतला प्रश्न विचारताच ते म्हणाले, 'मला संगीताची फार आवड होती, पण तिथे अधिक लक्ष दिल्यास अभ्यासाकडे दुर्लक्ष होईल असे माझ्या आईवडिलांना वाटत होते– आणि त्यांचे बरोबरच होते. म्हणून मी तो व्यवसाय निवडू शकलो नाही, परंतु त्यातील रुची स्वस्थ बसू देईना. मैफली ऐकता ऐकता संगीताचा अभ्यासही होऊ लागला आणि मग मी परीक्षणे लिहू लागलो. पुढे नियमितपणे माझे लेख प्रसिद्ध हंसक्षीरन्यायाने चांगल्याला मुक्तकंठाने दाद देणारे आणि गायकांची प्रगती व्हावी म्हणून शुद्ध हेतूने त्यांच्या कलेतील त्रुटी दाखवून देणारे मोहनरावांसारखे जाणते टीकाकार कलावंतांना हवेहवेसे वाटतात. मोहनरावांनी जितेंद्र अभिषेकींची एक आठवण सांगितली. एकदा त्यांनी अभिषेकींच्या गाण्याचे थोडे कडक परीक्षण लिहिले. काही दिवसांनी जणू काही घडलेच नाही अशा आविर्भावात अभिषेकी देवीचा प्रसाद घेऊन त्यांना भेटायला आले. मोहनरावांनी गंमतीने त्यांना म्हटले, 'मला वाटले तुम्ही माझ्यावर रागावला असाल, रागाचाच हा प्रसाद नाही ना?' अभिषेकी खिलाडूपणे

**श्री. मोहन नाडकर्णी हे वयोवृद्ध संगीत-समीक्षक. (वय ८५ च्या पुढे) अनेक वर्षे इंग्रजी वृत्तपत्रांतून त्यांची अभ्यासपूर्ण समीक्षणे प्रसिद्ध होत असत. गेली काही वर्षे ते पुण्यात विजनवासात पत्नीसह शांतपणे जीवन व्यतीत करीत आहेत. त्यांचा एकुलता एक पुत्र व त्याचे कुटुंबीय न्यूझीलंड येथे स्थायिक आहेत. वडिलांचे वाढते वय आणि अधूनमधून येणारे प्रकृतिअस्वास्थ्य यामुळे त्यांनी आईसह आपणाकडे राहावे असे साहजिकच त्याला वाटते. त्याप्रमाणे आता श्री व सौ. नाडकर्णी फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात न्यूझीलंडला कायम वास्तव्यासाठी जात आहेत, म्हणून त्यांची भेट घेऊन हा लेख लिहिला.**

तर स्मरणीय ठरले. कारण दाद देणारे गृहस्थ म्हणजे जानेमाने संगीत-टीकाकार, श्री.मोहन नाडकर्णी होते.

काही महिन्यांपूर्वी कळले की ते पुण्यात आमच्याच औंध विभागात राहतात आणि आता न्यूझीलंडला वास्तव्य असलेल्या एकुलत्या मुलाकडे कायमचे स्थलांतर करणार आहेत. म्हणून त्यांना मुद्दाम भेटायला गेले. (काही काळापूर्वी आमची गंगूबाई हनगलांशी भेट झाली होती. या ज्येष्ठांकडे ज्ञानाचे भांडारच असते आणि त्यांच्याशी नुसत्या गप्पा करणे हीच मोठी पर्वणी असते.) मोहनरावांचे वय होऊ लागले. पण खरे सांगू का? मी एक परखड टीकाकार असल्यामुळे या क्षेत्रात मी मित्रांपेक्षा शत्रूच जास्त निर्माण करून ठेवले...'

पण यात फारसे तथ्य नसावे. कारण काही वर्षांपूर्वी संगीत क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनीच त्यांचा मोठा सत्कार घडवून आणला होता आणि नियतकालिकातील त्याविषयीच्या वृत्तात म्हटले होते की, 'असे भाग्य फार थोड्या टीकाकारांना लाभते.' हाती लेखणी आहे, म्हणून ती हवी तशी परजणाऱ्या छिद्रान्वेषी म्हणून गणल्या गेलेल्या टीकाकारांमध्ये, म्हणाले, 'अहो, तुम्ही सांगितल्याशिवाय आमचे दोष आम्हाला कळणार कसे?' मग मोहनराव त्यांच्या आठवणीने व्यथित होऊन बोलत राहिले. म्हणाले, 'एवढा ताकदीचा कलावंत, पण प्रकृतीची हेळसांड केली आणि अकाली निघून गेला...'

आपल्या लेखनाच्या सुरुवातीच्या काळातील काही गंमती त्यांनी सांगितल्या. 'मी लिहू लागलो तेव्हा आमच्याच बिल्डिंगमध्ये वरच्या मजल्यावर एक दुसरे ताडमाड उंच मोहन नाडकर्णी राहात होते. त्यांनाही नाट्य, संगीतात रस होता.

लोकांना वाटे की तेच लेख लिहितात. एकदा त्यांनी चौकशी केली, 'हा लिहिणारा कोण?' तेव्हा त्यांच्या मित्राने सांगितले, 'तुमच्याच खाली राहणारा तो मोहन!' ते आश्चर्याने म्हणाले, 'तो गिड्डा?' (मोहनराव उंचीने वामनमूर्तीच आहेत) पुढे एकदा एकाच व्यासपीठावर आम्ही दोघे होतो. तेव्हा मी म्हटले, 'संगीतावरचे लेख लिहिणारे मोहन नाडकर्णी ते नसून मी आहे. 'सो नाऊ यू नो द लाँग अँड शॉर्ट ऑफ इट...' त्यावर श्रोत्यांनी हसून टाळ्या वाजवून मला दाद दिली...''

आमचे व्याही श्री.कर्णिक मोहनरावांचे जिगरी दोस्त. त्यांच्याकडून मोहनरावांच्या विनोदी स्वभावाच्या अनेक कहाण्या ऐकल्या होत्या. एकदा एक गायक सारंग रागातील काही अनवट प्रकार गात होते. त्यांच्या एका फुफ्फुसावर शस्त्रक्रिया झाल्याचे कळले होते. श्रोत्यांमध्ये 'हा कुठला राग' यांवर तर्क चालू होते. मोहनराव गंभीर चेहरा करून म्हणाले, 'हा एकलंगी सारंग!' त्यांच्याशी गप्प करतानाही या विनोदबुद्धीचा प्रत्यय आलाच.

हिंदुस्थानी संगीत आणि कर्नाटक संगीत यातील भेदाचे त्यांनी सुरेख विवेचन केले. अमीर खुस्त्रो यांनी आणलेले अरबी संगीत आणि भारतीय रागदारी संगीत (संदर्भ : संस्कृतमधील 'संगीत रत्नाकर') यांचा फार सुंदर मिलाफ हिंदुस्तानी संगीतात झाला आहे. त्यात सृजनशीलतेला खूप वाव आहे. रागांची चौकट जरी ठराविक असली तरी त्याचे नियम सांभाळून रागाचा एक्सटेम्पोर (आयत्या वेळी) विस्तार करण्यात गायकाचा खरा कस लागतो. ते त्याच्या सृजनशीलतेला आव्हानच असते. कर्नाटक संगीतातील बंदिशी मात्र पाश्चात्त्य संगीतातील रचनांप्रमाणे ठरावीक स्वरात निबद्ध असतात आणि त्या तशाच गायच्या असतात. त्यात क्रिएटिविटीला फारसा वाव नसतो; याचे त्यांनी विवरण केले.

आमच्या विल्सन कॉलेजातील प्राध्यापक डॉ.ऊकरजी हे पाश्चात्त्य संगीतातील दर्दी. त्यांनी एकदा असाच आक्षेप घेतला होता की, हिंदुस्तानी संगीतात शेकडो वर्षे तेच राग गात आहेत. पाश्चात्त्य संगीताप्रमाणे त्यात नवनवीन रचना घडविलेल्या दिसतच नाहीत. त्यांना मी उत्तर देताना, राग तेच असले तरी त्यांचा एक्सटेम्पोर विस्तार करण्यात गायकाचे कौशल्य, त्याची कल्पकता दिसून येते असे सांगितले होते. परंतु मी संगीतातील जाणकार नसल्यामुळे माझे उत्तर कितपत योग्य होते याबद्दल मला शंका होती. आज मोहनरावांशी बोलल्यावर जरा बरे वाटले.

घराण्यांविषयी बोलताना त्यांनी ग्वाल्हेर, आग्रा, अंत्रोली, पतियाळा किराणा इत्यादी अनेक घराण्यांची वैशिष्ट्ये सांगितली. ग्वाल्हेर, आग्रा ही घराणी हिंदुस्तानी संगीतातील अध्वर्यू म्हणवून घेतात. बुद्धीला आवाहन, आक्रमक शैली काहीशा कणखर आवाजाला प्राधान्य हे त्यांचे विशेष म्हणता येतील, तर किराणा घराण्यात भावनेला आवाहन, सौम्य शैली, आवाजातील माधुर्याला प्राधान्य हे विशेष दिसतात. गायकांविषयींच्या आठवणींचा तर त्यांच्याकडे खजिनाच आहे. केसरबाई आणि मोगुबाई यांच्याविषयी सांगताना ते म्हणाले, 'त्यांच्यापैकी अधिक श्रेष्ठ कोण असे मला नेहमी लोक विचारीत, मी त्यांना म्हणे की अशी तुलना अनाठायी आहे. त्या दोघी म्हणजे नाण्याच्या दोन बाजू आहेत.' अंजनीबाई मालपेकर यांचे गायन ऐकण्याचे भाग्य आपल्याला लाभले नाही, पण त्यांची स्वाक्षरी आपल्याकडे असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. खाप्रूजी पर्वतकारांचे तबलावादन ऐकण्याचाही त्यांना कधी योग आला नाही, पण त्यांची कीर्ती मात्र त्यांनी भरपूर ऐकलेली आहे.

किशोरी आमोणकर यांच्या उत्तुंग प्रतिभेविषयी त्यांना पुष्कळ कौतुक आहे. तसेच आजच्या आघाडीच्या गायक-गायिकांपैकी मालिनी राजूरकर, पद्मा तळवलकर, अश्विनी भिडे, आरती अंकलीकर, शौनक अभिषेकी, अजित कडकडे इत्यादींच्याविषयीही त्यांनी स्तुतीपर उद्गार काढले. पण उदयोन्मुख कलाकारांचे गाणे आपण फारसे ऐकलेले नाही, आता आपण संगीतक्षेत्रातून, सार्वजनिक जीवनातून जवळजवळ निवृत्त झालो आहोत असे ते सांगत होते. यातून त्यांची समाधानी वृत्ती प्रत्ययाला आली. तरी मला मात्र थोडे उदास वाटले. कुणाच्याही निवृत्तीच्या वेळी वाटते तसे!

रागांची सरमिसळ करणे ही मोडतोड आहे असे त्यांना वाटते की ते एक कल्पकतेचे प्रतिभेचे लक्षण आहे असे वाटते, याविषयी मला त्यांच्याशी बोलायचे होते. त्याच संदर्भात बालगंधर्वांचा विषय निघाला. एखाद्या रागात ते वेगळाच सूर लावीत, परंतु त्यांची योग्यताच एवढी की ते शोभून जात असे, याबद्दल पु.लं.नी उल्लेख केलेला आहे असे म्हणताच मोहनराव म्हणाले, 'हो, 'स्वकुलतारक सुता' म्हणतात ते भीमपलापात एका ठरावीक जागी शुद्ध 'नी' लावीत असत! असे म्हणतात की अल्लादियाखाँ तेवढेच ऐकायला आवर्जून येत असत आणि गाणे संपले की निघून जात असत...'

– असे अनेक किस्से त्यांच्या सान्निध्यात ऐकायला मिळाले. खरे तर या गप्पा संपूच नयेत असे वाटत होते. मोहनराव आणि त्यांच्या पत्नी सुनीतीबाई आता परदेशात स्थायिक होणार, तर त्यांच्या संगीतविश्वाचे काय होईल अशी आम्हाला हुरहुर वाटली, परंतु ते स्वत: निश्चिंत, कृतार्थ आहेत. वृद्धापकाळी पुत्राजवळ असणेच योग्य असे त्यांना वाटते आणि आम्हीही त्यांच्याशी सहमत आहोत.

आदराने म्हणतो– 'शुभास्ते पंथान:!'

**साधना कामत**
ए/३, आनंदाश्रम, श्यामराव विठ्ठल मार्ग,
मुंबई ४००००७.
फोन : (०२२) २३८६०८१८

# शिक्षणाची वाट बदलायला हवी

**श्रुती पानसे**

गेली साठ वर्षं आपल्या देशात शिक्षणातल्या सुधारणांसाठी प्रयत्न चालले आहेत. पंचवार्षिक योजना झाल्या, विविध समित्या स्थापन झाल्या. त्यांचे अभ्यासपूर्ण अहवाल प्रसिद्ध झाले. ते सरकारसमोर ठेवले गेले. नागरिकांपर्यंत पोचले. त्यावर थोड्याफार चर्चा झडल्या. परंतु शिक्षणात फार बदल झाला नाही.

'शिक्षण मिळणं हा मुलांचा मूलभूत हक्क आहे', या विधानावर भारताने सही देखील केलेली आहे. पण तरीही सर्व मुलांपर्यंत शिक्षण पोचलेले नाही, हे वास्तव आहे. ते आपल्याला माहिती आहेच.

अजूनही समाजाच्या काही घटकांपर्यंत शिक्षण पोचलेले नाही, तर चांगलं शिक्षण देण्याच्या गोष्टी आपण कशा करणार?

मुळात चांगलं शिक्षण म्हणायचं कशाला, इथपासूनचे प्रश्न आपल्यासमोर आहेत.

शाळाप्रवेशासाठी पहाटेपासून रांगा लावल्या जातात, ती शाळा चांगलं शिक्षण देते का? जी शाळा भरपूर फी घेते, ती शाळा चांगलं शिक्षण देते का? कडक शिस्तीची म्हणून प्रसिद्ध असलेली शाळा चांगली असते का? यावरच किमान एकवाक्यता झाली पाहिजे. जी शाळा मुलांना विचारप्रवृत्त करते, मुलांच्यातल्या नैसर्गिक वृत्तींना प्रकट व्हायची संधी देते, ती शाळा चांगली असं आपल्याला म्हणता येतं. मग हा निकष लावला तर चांगल्या शाळा आपल्याकडे आहेत का?

आपल्याकडे शाळांमध्ये वर्तनवादी विचारसरणीवर आधारित शिक्षणपद्धती आहे. म्हणजे काय तर मुलांच्या वर्तनात अपेक्षित बदल करण्याचं काम ही शिक्षणपद्धती घडवून आणते. मुलाचं मन ही कोरी पाटी असते, असं समजून त्यावर आपल्याला हवी ती अक्षरं उमटवण्याचं काम ही शिक्षणपद्धती करत असते. किंवा मग नेहमीचंच लाडकं उदाहरण. मुलं म्हणजे मातीचा गोळा, आकार द्यावा तशी घडत जातात.

**नवशिक्षणात शिक्षकाला स्थान आहे ते मार्गदर्शकाचं. असा मार्गदर्शक; जो मुलांना शिकायला मदत करेल, मुलं आपणहून शिकतील. त्यांनी मोकळ्या वातावरणात शिकावं यासाठी मार्गदर्शक संधी देईल. मुलांच्या मनात उत्सुकता निर्माण होईल असं वातावरण तिथं तयार करील. त्यातूनच मुलं आपल्या गतीनुसार तिथं शिकतील.**

ही दोन्ही उदाहरणं शिक्षणातली साचेबद्धता स्पष्ट करतात. थोडक्यात, मोठ्या माणसांनी सांगायचं आणि मुलांनी ते जसंच्या तसं ऐकायचं. मुलं नाठाळच असतात, मस्तीखोर असतात, त्यांना अभ्यास करायला मुळीच आवडत नाही. मग करा त्यांना शिक्षा. मुलं नीट वठणीवर येतात. आणि गुरुजनांचा- मोठ्या माणसांचा मान वगैरे ठेवतात. मुलांच्या नैसर्गिक वृत्तींना ठाकून-ठोकून आकार दिला की आपलं शिक्षणाचं ध्येय सफल होतं. ही झाली वर्तनवादी विचारसरणी.

'नवशिक्षण' याच्या नेमकं उलट सांगतं. नवशिक्षणात शिक्षकाला स्थान आहे ते मार्गदर्शकाचं. असा मार्गदर्शक; जो मुलांना शिकायला मदत करेल, मुलं आपणहून शिकतील. त्यांनी मोकळ्या वातावरणात शिकावं यासाठी मार्गदर्शक संधी देईल. मुलांच्या मनात उत्सुकता निर्माण होईल असं वातावरण तिथं तयार करील. त्यातूनच मुलं आपल्या गतीनुसार तिथं शिकतील.

प्रत्येक मुलाचा मेंदू शिकण्यासाठी उत्सुक असतोच. मात्र त्यांना अनुभवांच्या संधी मिळायला हव्यात. त्यांना समृद्ध करणारे, बुद्धीला चालना देणारे अनुभव दिले तर मुलं कोणत्याही दडपणाशिवाय शिकतात.

इथे कसोटी असते ती शिक्षकाची. मुलांना शिक्षणाच्या संधी म्हणजेच विविध उपक्रम, या मार्गदर्शकानं पुरवायचे असतात. यातून मुलांचं शिक्षण नीट होतं. त्यांना शिकण्याचं, शिक्षकांचं दडपण येत नाही. त्यांना शंका विचारताना अडचण येत नाही. या पद्धतीत मूल आणि शिक्षकाचं नातं प्रेमाचं असतं. दरारा वाटेल, वचक बसेल अशा शिक्षकाला नवशिक्षणात स्थान नाही. पूर्णपणे बालकेंद्री शिक्षण ही या पद्धतीची खरी ओळख. अन्यथा 'राममूर्ती समिती'च्या अहवालात असं सांगितलं आहे की, १/३ मुलांना शाळा कंटाळवाणी आणि भीतीदायक वाटते. ज्या शाळांबद्दल मुलांच्या मनात अशी भीती आहे, त्या शाळेत जाऊन मुलं शिकण्यासारखी सर्जनशील गोष्ट करणार कशी?

यासाठी मुलांना शाळेत निर्भय वाटलं पाहिजे. यातून मुलाला खऱ्या अर्थानं शिकण्यासाठी प्रेरणा मिळतील.

एरवी मुलं शाळेत जातात, तेव्हा त्यांच्यावर नकळतपणे कितीतरी गोष्टींचं ओझं असतं. 'यशपाल समिती'नं अशा घटकांचा अभ्यास करून ओझ्याविना अध्ययन हवं, असं अहवालात मांडलं. यात त्यांनी अडीच वर्षांच्या मुलाला शाळेत घालणं, हे त्याच्यासाठी एक ओझंच असतं असं सांगितलं. त्याच प्रमाणे निरस अभ्यास, रूक्ष भाषेतली पाठ्यपुस्तकं याचं ओझं मुलांवर असतं, त्यांना परीक्षेची भीती वाटत असते. दिवसभर शाळेत शिकून पुन्हा तेच शिकण्यासाठी क्लासेसना जावं लागतं, तेही एक ओझंच; असं सांगितलं आहे. याशिवाय मुलांना पाठीवर जड दप्तराचं ओझं वाहून न्यावं लागतं. अशी विविध ओझी घेऊन शिकणाऱ्या मुलांचं शिक्षण कसं होईल? असा प्रश्न ते उपस्थित करतात. मात्र हेही तितकंच खरं आहे की हे प्रश्न सुटत नाहीत. ते कसे सोडवायचे? याच्या उत्तराची दिशा नवशिक्षणाकडे जाते.

नवशिक्षणात भर आहे तो आनंदमय शिक्षणावर. मुलांना प्रत्येक कृती करताना आनंद वाटला पाहिजे. हा आनंद नवशिक्षणाच्या विविध पद्धतीतून मुलांना येतो. मुलांना खेळण्यातून आनंद मिळतो. म्हणून त्यांना साधनांद्वारा शिकवायचे. ही शैक्षणिक साधनं त्यांना आवडतील अशी असतात. आकर्षक असतात, मुलांना ती खेळणीच वाटतात. की खेळणी त्यांना काही शिकवताहेत, याची त्यांना जाणीवही नसते. प्रत्यक्षात ही साधनं त्यांची भाषेची तयारी करून घेत असतात, भाषेचे वेगवेगळे नियम सांगत असतात. शब्दसंपत्ती वाढवत असतात. कधी गणित शिकवतात. बेरीज-वजाबाकी , गुणाकार-भागाकार आपण शिकतो आहोत, याची त्यांना कल्पनाही नसते. पुढे त्यांची पूर्ण तयारी झाल्यावर त्यांना मूर्त संकल्पनेकडून अमूर्त संकल्पनेकडे आणलं जातं. एरवी आपल्या पठडीबद्ध शिक्षणपद्धतीत हाच भाग केवळ खडू-फळा यांच्या साहाय्याने शिकवला जातो. शिक्षक हा भाग शिकवून मोकळे होतात. पण आपल्या वर्गातल्या प्रत्येक मुलाला आणि मुलीला तो समजला आहे की नाही, हे शिक्षकाला कधीच कळत नाही. किंवा कळला तरी थेट परीक्षेतच. त्यामुळे या न समजण्यावर काहीच उपाययोजना होत नाही. साधनांवर एखादी संकल्पना सांगितली जाते, तेव्हा शिक्षक-विद्यार्थी परस्परसंबंध निर्माण होतात. यातून प्रत्येक मुलाची अडचण शिक्षकाला अगदी नीट समजते. त्यावर उपाययोजनाही लगेच करता येते. त्यामुळे मूल मागे पडत नाही आणि नापासांची गर्दीही होत नाही.

नवशिक्षणाचं महत्त्वाचं तत्त्व म्हणजे मुलाने स्वत:चं स्वत: शिकत जायचं आहे. शैक्षणिक साधनांवर खेळून त्यांना स्वयं अध्ययनाची संधी मिळते. अशीच संधी प्रकल्प पद्धतीतून मिळते. प्रकल्प पद्धतीत एखादा परिसरातला विषय अभ्यासासाठी निवडला जातो. या विषयाचा सर्वांगीण अभ्यास करायची जबाबदारी मुलांवर असते. इथे शिक्षक केवळ मार्गदर्शकाच्या भूमिकेत असतो. या विषयाच्या अभ्यासासाठी मुलं प्रश्न काढतात. या प्रश्नांची उत्तरं कुठून मिळवायची हे ठरवतात. या विषयाशी संबंधित व्यक्तीला प्रश्न विचारणं, त्यासाठी प्रश्न काढणं, त्याची उत्तरं मिळवून ती लिहून ठेवणं. याशिवाय काही माहिती पुस्तकांतून मिळवणं, त्यासाठी वाचनालयात जाणं या गोष्टी मुलंच करतात. त्यांना स्वयंअध्ययनाची सवय लागते. इथे शिक्षक वरून ज्ञान ओतत नाही, तर मुलांनाच ते मिळवावं लागतं. अशा प्रकारे मिळालेलं ज्ञान कायमस्वरूपी राहतं. पुढचं पाठ आणि मागचं सपाट असा प्रकार होत नाही.

नवशिक्षणाचा गाभा असा की, यात प्रत्येक विद्यार्थ्याला एक भूमिका असते. तो केवळ श्रवणभक्ती करायला शाळेच्या पायऱ्या चढत नाही, तसंच त्याच्या नैसर्गिक वर्तनपद्धतीत कोणी बाहेरचा माणूस बदल करायला इथे नेमलेला नसतो. त्याउलट विद्यार्थ्याचा  कल समजून घेतला जातो. आणि शास्त्रीय पद्धतीनं शिक्षणाची संधी त्यांना दिली जाते.

या शास्त्रीय पद्धतीला बळकट असा पाया आहे. अनेक विचारवंतांचं, संशोधकांचं, शास्त्रज्ञांचं योगदान यामागे आहे. सोळाव्या शतकातील कोमेनिअस यांनी सर्वात प्रथम शास्त्रीय बालशिक्षणाचा पाया रचला. यानंतर रुसो,पेस्टॉलॉजी, फ्रेडरिक फ्रोबेल, मादाम मॉन्टेसरी, जीन पियाजे, गिजुभाई बधेका, ताराबाई मोडक यांच्यापासून ते हॉवर्ड गार्डनरपर्यंत अनेकांनी नवशिक्षणाला सशक्त केलं आहे. मेंदूच्या अभ्यासावर आधारित डॉ. हॉवर्ड गार्डनर यांनी १९८३ साली मांडलेला बहुविध बुद्धिमत्तांचा सिद्धांत देखील नवशिक्षणातला महत्त्वाचा आधार आहे. अशा प्रकारचे शास्त्रीय शिक्षण शाळा-शाळांतून सुरू केले तर सध्याच्या शिक्षणातले अनेक प्रश्न सुटतील.

शाळा आवडत नाही, शिक्षक समजून घेत नाहीत, या कारणांसाठी शाळेपर्यंत आलेली मुलंदेखील शाळेतून गळतात. मुलांना जर चांगलं – त्यांना समजून घेणारं शिक्षण मिळालं तर त्यांच्यासाठी शाळा हे आनंदाचं स्थान होईल.

**– श्रुती पानसे**
१९४, गणेश पेठ, पुणे ४११००२.
मोबाईल : ९८८१५०७०५५.

(२८ फेब्रुवारी ते २ मार्च २००८ या काळात पुणे येथील 'गणेश कला-क्रीडा मंच' येथे 'नवे शिक्षण : नव्या दिशा' या विषयावरील अभिनव प्रदर्शन व चर्चा आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने या आणि पुढील दोन अंकांत या विषयावरील काही लेख आम्ही प्रसिद्ध करणार आहोत. **– संपादक**.)

# विद्यार्थ्यांना विचार करायला लावता येईल...

गीता व्यंकटरामन

पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी अलीकडे असे जाहीर केले की, भारतातील २८ राज्यांत प्रत्येकी एक केंद्रीय विद्यापीठ असावे आणि ६००च्या आसपास असणाऱ्या प्रत्येक जिल्ह्यांत एक महाविद्यालय असावे. तथापि उच्चशिक्षण प्रवेशाच्या कक्षा रुंदावण्याच्या व त्यामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या मुद्यांची (दर्जाविषयी) विद्वान व रोजगार पुरविणारे उद्योजक यांनी व्यक्त केलेल्या काळजी वा धास्तीबरोबर क्वचितच सांगड घातली जाते. ही चिंता उच्चशिक्षणाचा 'दर्जा' उंचावण्याशी संबंधित आहे, कारण उच्च गुणवत्ताच ज्ञानाधिष्ठित समाजाच्या व सळसळणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहे.

भारतात पदवी शिक्षणाचे लक्ष्य कोणते? किंवा ते काय असावे?

सहजपणे विचार केला तरी आपणाला जाणवेल की भारतातील पदवी शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा विकसित राष्ट्रे ज्या तऱ्हेने उच्चशिक्षणाकडे पाहतात त्यापेक्षा वेगळा असला पाहिजे. ढासळतोय, त्याची कारणमीमांसा अशी– शालेय शिक्षणाची वाटचाल अशा मार्गाने होत आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांची क्षमता परीक्षेत मिळणाऱ्या गुणांवर मोजली जाते. ही परीक्षा पद्धती विद्यार्थ्याला विचार करण्याची क्षमता किती आहे हे तपासत नाही, ती केवळ त्याने शिकलेल्या गोष्टींची परीक्षेत अचूक पुनरावृत्ती करण्याची क्षमता तपासते. (दुर्दैवाने विद्यापीठेदेखील याच पद्धतीने पदवी व पदव्युत्तर पातळीवरील परीक्षा घेतात.) अशा परीक्षा सर्वसामान्य होतात तेव्हा आपोआपच परीक्षेत जास्त गुण मिळवून देणारी साधनसामग्री प्राप्त करून, ती इमानदारीने वापरून परीक्षेत जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी सहज मिळतात. सध्या अशाप्रकारे जास्त गुण मिळवून उज्ज्वल यश संपादन करणे, हा प्रवाह शालेय स्तरावर स्थिर झाल्याचे दिसते. दिल्ली विद्यापीठातील काही विषयांच्या बाबतीतदेखील हा प्रकार आढळतो. परीक्षेत यश संपादन करण्यासाठी विद्यार्थी शिकवणी वर्गाचा सर्रास आश्रय

**आपले शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना विचार करायला कसे शिकता येईल यांवर भर न देता, शिकलेले ज्ञान परीक्षेत कसे इमानदारीने लिहिता येईल, यांवर अधिक भर देते. हाच दृष्टिकोन महाविद्यालयीन शिक्षणातदेखील तसाच पुढे चालू राहतो. उच्च शिक्षणातील सुधारणांवरील चर्चा, शिक्षकांची गुणवत्ता व त्यांचे शैक्षणिक दायित्व यांवर केंद्रित झाली पाहिजे. त्याचबरोबर या चर्चेमध्ये शिक्षकांना व विद्यार्थ्यांना विचार करायला उत्तेजित कसे करता येईल, यांवर विचारमंथन अपेक्षित आहे.**

भारतात पदवी शिक्षण हे मूठभर अभिजनांची मक्तेदारी होता कामा नये. बरेचदा असे आढळते की, पदवी संपादन करणे हे सामान्य जनांसाठी अभिजन वर्गाबरोबर समानता साधण्याचे एक साधन आहे. पदवी शिक्षणासाठी शासन निधी पुरविते त्यामुळे देशात पदवी शिक्षण देणाऱ्या संस्थांची कमतरता खरोखरच जाणवते, म्हणून देशातील लोकसंख्येच्या मोठ्या भागाच्या गरजा व आकांक्षा पूर्ण करण्यास ती कमी पडते.

संस्थांची कमतरता मान्य करूनदेखील असे आढळते की, ज्या संस्था उच्च शिक्षण प्रदान करतात, त्यांना एका दुहेरी प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. तो असा- देशातील सर्व थरातील लोकांना प्रवेश उपलब्ध करून देणे, त्याचबरोबर शिक्षणाचा विशिष्ट दर्जा टिकवणे. या दोन उद्दिष्टांमध्ये संघर्ष निर्माण होण्याची अनेक कारणे असतील, पण त्यामध्ये चांगल्या शालेय शिक्षणाचा अभाव हे प्रमुख कारण आहे. याचा अर्थ असा होत नाही की खाजगी शाळेमधील विद्यार्थी सहजपणे इतर शालेय विद्यार्थ्यांपेक्षा गुणवत्तेच्या बाबतीत सरस असतात. शालेय शिक्षणाचा दर्जा का घेतात. या सर्व धडपडीमध्ये एकच उद्देश असतो. शालांत परीक्षेत उत्तम यश मिळविणे (हा प्रयोग विद्यापीठ परीक्षेसाठीदेखील अनुसरला जातो.) या सर्व प्रकारात एकाच गोष्टीचे वाईट वाटते, ती म्हणजे या मार्गाने जाणारे बहुतेक विद्यार्थी परीक्षेत पाठांतर करून यश संपादन करतात. परिणाम स्वरूप आपणाला आज असेही विद्यार्थी भेटतात, ज्यांना गणितामध्ये पैकीच्या पैकी गुण मिळालेले आहेत, परंतु ज्यांना गणितामधील प्रश्नावर विचार करावयाचा असतो हेच नीट कळलेले नसते.

**व्यवस्थेचे अपयश :–**

सध्याच्या शैक्षणिक वातावरणाकडे व परीक्षा पद्धतीकडे वरवर पाहिले तर त्याबद्दल चिंता का करावी, हे आपणाला लगेचच जाणवणार नाही. कारण सध्या जी शालेयप्रणाली आपल्याकडे आहे, त्यामधून दरवर्षी पदवी पातळीपर्यंत जेवढी प्रवेशक्षमता आहे, त्यापेक्षा अधिक संख्येने उत्तीर्ण होणारे शालेय विद्यार्थी सहज आढळतात. त्यांना यथावकाश महाविद्यालयात प्रवेश

मिळतो. ते पदवी प्राप्त करून विद्यापीठातून बाहेर पडतातदेखील. त्यांच्यापैकी अनेकांनी विद्यापीठ परीक्षेत उच्चगुण प्राप्त केलेले असतात. मात्र त्यांच्यापाशी किमान विचार करायला लावणारे प्रश्न सोडविण्याची किंवा तसा प्रयत्न करण्याचीही क्षमता नसते. मग अशी किमान विचार करण्याची क्षमता विकसित न झालेले अनेकजण पदव्युत्तर शिक्षणाकडे वळतात किंवा काहीजण नोकरीसाठी उमेदवार बनतात. या सर्व प्रकारात भविष्यातील प्रशासक, शिक्षक किंवा व्याख्याते दडलेले असतात. कारण या सर्वांनी आयुष्याची तीन वर्षे पदवी परीक्षेत उत्तम यश कसे मिळवावे एवढेच शिकण्यासाठी खर्च केलेली असतात, पण विचार कसा करावा हे शिकलेले नसते. ही परिस्थिती पदव्युत्तर पातळीवर आणखीच खराब होत असते.

ही सर्व परिस्थिती प्रत्यक्षात असली तरी वरवर पाहता, आपल्याकडे कार्यरत असणाऱ्या शैक्षणिक व्यवस्थेमधूनच आपण उच्चगुण मिळविणारे एस.एस.सी.धारक मोठ्या संख्येने निर्माण करतो. त्याचबरोबर याच शिक्षण पद्धतीतून दरवर्षी उत्तम कामगिरी बजावलेले पदवीधर मोठ्या प्रमाणावर विद्यापीठे व महाविद्यालयातून निर्माण करतो. ही जमेची बाजू मान्य केल्यावर अशा विद्यार्थ्यांजवळ विचार करण्याची क्षमता नसणे, किंवा एखाद्या प्रश्नावर तर्कसंगत विचार मांडण्याची क्षमता नसणे याची किंमत आपणाला मोजावी लागते. या क्षमतांच्या अभावाचे दुष्परिणाम कुठेतरी दृश्य होतातच. आपण कोणत्याही ज्ञानशाखेत होणाऱ्या संशोधन प्रकल्पाकडे नजर टाकली तर आपणासमोर उभे राहणारे दृश्य अत्यंत खराब असते. या बाबतीत आपण जर व्यापार व उद्योगक्षेत्राचे मत लक्षात घेतले तर समोर येणारे चित्र उत्साहवर्धक नाही. त्यांच्यामते साधारणपणे शंभर पदवीधारकांत फक्त पंचवीसच बऱ्यापैकी प्रशिक्षण दिल्यावर नोकरी देण्याच्या लायकीचे ठरतात.

भारत कसा शायनिंग, इमरजिंग व आर्थिक क्षेत्रात भरारी मारणारा देश आहे, तो जगात सुपर पॉवर म्हणून कसे स्थान प्राप्त करील, त्यासंबंधी बरेच लेख प्रसिद्ध होत आहेत. त्याचबरोबर पुढारी व विचारवंतदेखील अशा प्रकारचा आशावाद जाहीर भाषणांतून व्यक्त करीत आहेत, हे आपण अनुभवीत आहोत. परंतु हा दावा सूक्ष्म पातळीवर काळजीपूर्वक तपासला तर भारत चमकणारा देश आहे, हा दावा अगदी कमीत कमी वाईट बोलायचे ठरवले तरी हास्यास्पद दिसू लागतो. जो कोणी उच्च शिक्षणासाठी जोडलेला आहे त्याने जर पदवी शिक्षणाचे वास्तव नीट न्याहाळले तर त्याला सत्य परिस्थिती किती खराब आहे हे कळून येईल व त्याला जागे होऊन त्याचे अवलोकन करण्याचा संकेत मिळेल. याच्याही पलीकडे ज्यांना उच्च शिक्षणाचा आशय व दिशा यामध्ये रस आहे त्यांनासुद्धाही परिस्थिती जागे होऊन विचार करायला लावणारी ठरेल.

**आपण कोणत्याही ज्ञानशाखेत होणाऱ्या संशोधन प्रकल्पाकडे नजर टाकली तर आपणासमोर उभे राहणारे दृश्य अत्यंत खराब असते. या बाबतीत आपण जर व्यापार व उद्योगक्षेत्राचे मत लक्षात घेतले तर समोर येणारे चित्र उत्साहवर्धक नाही. त्यांच्यामते साधारणपणे शंभर पदवीधारकांत फक्त पंचवीसच बऱ्यापैकी प्रशिक्षण दिल्यावर नोकरी देण्याच्या लायकीचे ठरतात.**

शालेय शिक्षणासंबंधी चर्चा किंवा वाद होतो, तसा वाद वा चर्चा महाविद्यालयीन शिक्षणाबाबत होणे ही असामान्य घटना म्हटली पाहिजे. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण परस्परांशी अतूटपणे जोडले गेले आहे. विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी जे विद्यार्थी येतात त्या सर्वांनी शालेय शिक्षण पूर्ण केलेले असते. शाळेत शिकवणारे शिक्षकदेखील विद्यापीठाने निर्माण केलेल्या पदवीधरांपैकीच असतात. महाविद्यालयात पदवी शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्याने बारा वर्षांचा शिक्षणक्रम पूर्ण केलेला असतो, त्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणाचा अंतर्भाव असतो.

अशा प्रकारे तीन स्तरावर शिक्षण पूर्ण करून विद्यार्थी पदवी शिक्षणासाठी महाविद्यालयात येतात, तेव्हा त्यांची विचार करण्याची किंवा प्रश्न न विचारण्याची मानसिकता पक्की तयार झालेली असते. अशी मानसिकता तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात बदलणे हे सोपे कार्य नाही आणि यातच पदवी शिक्षणाच्या अपयशाची गोम दडलेली आहे. जर तीन वर्षांच्या शिक्षणानंतर विचार करणारे पदवीधर, ज्यांना संवादकौशल्य बऱ्यापैकी अवगत झाले आहे आणि ज्यांना आपण निवडलेल्या विषयात खरोखरच रस आहे, असे विद्यार्थी तयार करण्यात यश आले नाही तर या व्यवस्थेतून जे शिक्षक तरुण मनाच्या नवीन पिढीला आकार देणारे म्हणून कार्यरत होतील. त्यांच्याकडे सध्याची शालेय स्तरावरील किंवा विद्यापीठ स्तरावरील शिक्षणप्रणाली बदलण्याची क्षमता नसेल.

या परिस्थितीमध्ये सुधारणा सुचवायच्या असतील तर आपणाला शालेय शिक्षणपद्धती व विद्यापीठीय शिक्षणपद्धतींचा एकाचवेळी विचार करावा लागेल. शालेय शिक्षणाच्या बाबतीत गेल्या काही वर्षांत चांगल्या गोष्टी घडलेल्या आढळतात, त्यामध्ये या दोन गोष्टी प्रमुख आहेत.

१. राष्ट्रीय स्तरावर अभ्यासक्रमांची पुनर्रचना, २. आवडीने वाचण्यासारखी, सामान्यांच्या खिशाला परवडणाऱ्या किंमतीच्या नवीन पाठ्यपुस्तकांची निर्मिती. (शालेय मुलांसाठी) शालेय स्तरावर अलीकडे जो सुधारणा कार्यक्रम राबवला जात आहे, त्यामागे एक विशिष्ट तत्त्वज्ञान किंवा तत्त्वप्रणाली आहे. ती म्हणजे या सुधारणा प्रक्रियेतून प्रश्न विचारण्यास न घाबरणारे व विचारलेल्या प्रश्नाविषयी सखोल विचार करून नावीन्यपूर्ण उत्तर देणारे विद्यार्थी घडवायचे आहेत.

या सुधारणांना व्यावहारिक स्वरूप देण्यासाठी काही उपक्रम सुरू झाले आहेत. उदा. प्रकल्प तयार करणे, प्रयोगशाळेत

विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे, वाद-विवाद व चर्चेसाठी वेगवेगळे विषय ठेवणे या गोष्टी येतात, हे उपक्रम अभ्यासक्रमांचा एक भाग म्हणून स्वीकारण्यात आले आहते व त्यांचा समावेशदेखील पाठ्यपुस्तकात झाला आहे. या सर्व नवीन प्रयत्नांचा उद्देश एवढाच आहे की त्यामुळे विचारक्षम व समर्थ विद्यार्थी निर्माण करण्याच्या प्रयत्नांना उत्तेजन मिळेल.

शालेय स्तरावरील हे प्रयत्न महत्त्वपूर्ण आहेत, त्यांना उत्तेजन मिळाले पाहिजे हेही खरे आहे, मात्र ही प्रक्रिया सातत्याने चालू राहणारी असावी. पाच वर्षातून एकदा घडणारी नसावी. या प्रयत्नांना यश कितपत मिळते ते पाहण्यासाठी काही काळ वाट पहावी लागेल. कारण सध्याची विचारक्षम विद्यार्थ्यांचा बळी घेणारी माध्यमिक स्तरावरील परीक्षापद्धती प्रभावी ठरेल, तसेच जर घडले तर या सुधारणा करण्याच्या प्रयत्नांना मृत्यूकडे वाटचाल करावी लागेल.

परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणा करण्याच्या प्रश्नामध्ये अनेक अनुत्तरित मुद्दे आहेत. बोर्ड परीक्षेमध्ये सुधारणा करण्याचा सध्याचा जो प्रवाह आहे. त्याचा हेतू विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण व परीक्षेची धास्ती कमी करणे असा आहे. एक किंवा अर्धा मार्क जास्त मिळवण्याकरता जी खेदजनक धडपड करावी लागते ती कमी व्हावी म्हणून मार्कांच्याऐवजी ग्रेड देण्याची कल्पना पुढे येत आहे. तसेच बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्याला मिळणाऱ्या गुणांपैकी काही टक्के गुण शाळेतर्फे अंतर्गत मूल्यमापनातून मिळावेत ही कल्पना मांडली जात आहे.

**सध्याची माध्यमिक शालांत परीक्षा अशाप्रकारे घेतली जाते की त्यामधून एकाच वेळी दोन उद्दिष्टे साध्य व्हावीत ती अशी, किमान गुणवत्ता तपासणे आणि विद्यार्थ्यांची ज्ञान मिळविण्याची नैसर्गिक क्षमतासुद्धा तपासणे. परंतु ही दोन्ही उद्दिष्टे परस्परांपासून इतकी भिन्न आहेत की, त्यांचे मूल्यमापन एकाच परीक्षेद्वारे करणे अवघड आहे.**

सध्याची माध्यमिक शालांत परीक्षा अशाप्रकारे घेतली जाते की त्यामधून एकाच वेळी दोन उद्दिष्टे साध्य व्हावीत ती अशी, किमान गुणवत्ता तपासणे आणि विद्यार्थ्यांची ज्ञान मिळविण्याची नैसर्गिक क्षमतासुद्धा तपासणे. परंतु ही दोन्ही उद्दिष्टे परस्परांपासून इतकी भिन्न आहेत की, त्यांचे मूल्यमापन एकाच परीक्षेद्वारे करणे अवघड आहे. यावर पुढील काळात एक वेगळा मार्ग पुढे येऊ शकतो तो असा, बोर्डाने किमान दर्जा ठरविणारी परीक्षा घ्यावी आणि विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या ज्ञान मिळविण्याच्या नैसर्गिक क्षमतेची परीक्षा घ्यावी. यासाठी विद्यापीठाला परीक्षेचे वेगळे प्रारूप तयार करावे लागेल. हे जर मान्य झाले तर महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी एका परीक्षेला सामोरे जावे लागेल आणि हाच मुद्दा असा आहे की, ज्यावर अभ्यासपूर्ण सर्वसमावेशक चर्चा/वाद होणे आवश्यक आहे.

**शिक्षकांचे नियमन :–**

शालेय शिक्षणाच्या संदर्भात अध्यापन शास्त्राच्या दृष्टिकोनातून बरीच चर्चा वाद-विवाद झालेले आपण पाहिलेले आहेत, त्याचबरोबर त्यात सुधारणा करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यवाही झालेली आपण पाहतो. उच्चशिक्षण कसे सुधारावे हे सुचविण्यासाठी सरकारतर्फे आयोगांची नेमणूक झालेली आहे हे आपणाला ज्ञात आहे. परंतु या सर्व प्रयत्नांमध्ये पदवी पातळीवरील शिक्षणाची गुणवत्ता कशी सुधारावी, यावर पुरेसे लक्ष केंद्रित झालेले आढळत नाही.

पदवी स्तरावरील शिक्षणात सुधारणा करण्याचा कोणताही कार्यक्रम हाती घ्यावयाचा असेल तर त्यांची सांगड पुढील प्रश्नांच्या उत्तराशी घातली पाहिजे.

१. शिक्षकांना नोकरीची पुरेशी सुरक्षितता प्रदान करून त्यांच्यावर आपण शैक्षणिक दायित्व कसे निश्चित करू शकतो?

२. आपल्याकडील बुद्धिमान लोकांना या क्षेत्रात कसे आकर्षित करू शकतो व त्यांना शिक्षणक्षेत्रात राहण्यास कसे प्रवृत्त करू शकतो.

३. पदवी पातळीवर आज जे प्राध्यापक कार्यरत आहेत, त्यांच्या गुणवत्तेमध्ये व कौशल्यात आपण सुधारणा कशी करणार? (तांत्रिकदृष्ट्या पदवी वर्गांना शिकविण्यासाठी प्राध्यापकांकडे पदव्युत्तर पदवी असणे पुरेसे आहे. त्यापेक्षा अधिकाची गरज नाही.)

४. सध्या सेवेत असणाऱ्या प्राध्यापकाने आपले ज्ञान सुधारावे व अद्ययावत ठेवावे, यासाठी आपण कोणते उत्तेजनात्मक उपाय योजणार आहोत? याचबरोबर त्यांनी त्याविरुद्ध वागू नये म्हणून कोणते प्रतिबंध लादणार आहोत?

५. सध्याची परीक्षापद्धती परिश्रमपूर्वक पाठ केलेली उत्तरे परीक्षेत अचूक लिहिण्याच्या क्षमतेला बक्षीस देते, त्याऐवजी ही परीक्षा विचारक्षम व बुद्धिमान विद्यार्थ्यांना उत्तम कामगिरी बजावण्यास मदत करणारी कशी होईल, याचा विचार आपण करणार आहोत का?

सध्याची शैक्षणिक व्यवस्था वर उल्लेख केलेल्या ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करण्याचा तोंडदेखला प्रयत्नही करत नाही.

शिक्षकांच्यावर शैक्षणिक दायित्व नाहीच, उलट त्यांना समयबद्ध पद्धतीने आपोआप बढती मिळण्याची व्यवस्था आहे. अगदी सौम्य शब्द वापरायचे झाले तरी या बढतीलाच गुणवत्तेवर आधारित बढती संबोधले जाते. अशी बढती मिळविण्यासाठी शिक्षकांना तीन आठवड्याच्या प्रशिक्षणात सहभाग नोंदवावा लागतो. यामागे गृहीत एवढेच आहे की, असा प्रशिक्षण वर्ग केला की शिक्षकाचे ज्ञान विस्तारते आणि गुणवत्तेची पातळी उंचावते. अनेक शिक्षकांना (गणित शिक्षकसुद्धा गृहीत धरून) वाचनालयाला भेट देऊन आपल्या विषयातील उत्तम पुस्तके शोधावीशी वाटत नाही. त्याचबरोबर ज्या पदवीच्या आधारे

शिक्षणक्षेत्रात प्रवेश मिळविला, त्या ज्ञानात स्वप्रयत्नाने वाढ करून आपली गुणवत्ता वाढवावी असेही वाटत नाही.

याही परिस्थितीमध्ये पदवी पातळीपर्यंतच्या एखाद्या शिक्षकाला आपण उत्तम कामगिरी करावी असे वाटले व त्याने अध्यापन शास्त्रातील संकल्पनेप्रमाणे काही प्रयोग केले. उदा. स्वत: संशोधन करणे, परीक्षेत न विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचा विचार करण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे, त्यांना स्वत:च्या विषयावरील व्याख्यानांना जाण्यासाठी उत्तेजन देणे, घटक परीक्षेसाठी विचार करायला लावणारे प्रश्न काढणे, जर शक्य असेल तर विद्यापीठाच्या परीक्षेत तसे प्रश्न विचारणे असे उपक्रम त्याने सध्याच्या परिस्थितीमध्ये राबविण्याचा प्रयत्न केला तर त्याला बऱ्याच धोक्यांना सामोरे जावे लागेल.

सध्या शालेय शिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयोग सुरू असला तरी आपण पदवी अभ्यासक्रमातील उणीवा दूर केल्या नाहीत तर त्याचे नकारात्मक परिणाम शालेय पद्धतीमध्ये अनुभवास येतील. देशातील प्रत्येक मुलाला शिक्षणाच्या कक्षेत आणण्याच्या प्रयत्नात सुधारणा कशी करता येईल व शालेय अभ्यासक्रम पूर्ण करून उच्च शिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मुलांपैकी बहुसंख्य मुलांना महाविद्यालयात प्रवेश कसा मिळेल, याकडे आपण नीट लक्ष पुरविले नाही तर भविष्यकाळात आपला सर्वनाश होऊ शकेल. परंतु याच्याही पुढे जाऊन जवळपास कोणतेही कौशल्य नसणारे व ज्यांना विचार करणे, विश्लेषण करणे, अभिव्यक्त होणे या संकल्पना परकीय वाटतात असे पदवीधर जर आपण निर्माण करीत राहिलो तर आपला सर्वनाश दुप्पट वेगाने होईल, म्हणून सरकारने शिक्षणाबद्दल कोणतेही धोरण ठरवून ते राबवण्याचा विचार केला तर त्यामध्ये या दोन्ही प्रश्नावर उपाययोजना एकाचवेळी असली पाहिजे. (ते दोन प्रश्न म्हणजे संख्यात्मकवाढ व दर्जा उंचावणे) यापैकी एका प्रश्नाचा दुसऱ्याशिवाय विचार करण्यात काहीच अर्थ नाही.

**याही परिस्थितीमध्ये पदवी पातळीपर्यंतच्या एखाद्या शिक्षकाला आपण उत्तम कामगिरी करावी असे वाटले व त्याने अध्यापन शास्त्रातील संकल्पनेप्रमाणे काही प्रयोग केले. उदा. स्वत: संशोधन करणे, परीक्षेत न विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचा विचार करण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे, त्यांना स्वत:च्या विषयावरील व्याख्यानांना जाण्यासाठी उत्तेजन देणे, घटक परीक्षेसाठी विचार करायला लावणारे प्रश्न काढणे, जर शक्य असेल तर विद्यापीठाच्या परीक्षेत तसे प्रश्न विचारणे असे उपक्रम त्याने सध्याच्या परिस्थितीमध्ये राबविण्याचा प्रयत्न केला तर त्याला बऱ्याच धोक्यांना सामोरे जावे लागेल.**

शिक्षण प्रवाहामध्ये अधिकाधिक लोकांना प्रवेश कसा मिळेल या मुद्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या सरकारी धोरणावर बरीच जाहीर चर्चा होताना आपणाला दिसते. हे खरे असले तरी शिक्षणाची गुणवत्ता कशी वाढवता येईल, यासंबंधी चर्चा किंवा वाद-विवाद होताना सहसा दिसत नाहीत. गुणवत्ता कशी वाढवता येईल. विशेषत: महाविद्यालयातील शिक्षणाची यावर जाहीर चर्चा व्हावी असे वाटत असेल तर, त्याची पूर्वअट अशी आहे की सध्या कार्यरत असणाऱ्या विद्यापीठाने व महाविद्यालयाने देत असलेल्या शिक्षणाच्या दर्जाविषयी समस्या किंवा प्रश्नचिन्ह आहे, हे एकदा जाहीरपणे मान्य केले पाहिजे.

राखीव जागांच्या विरोधात युक्तिवाद करताना बऱ्याच वेळा असे म्हटले जाते की, टक्केवारीने कमी गुण मिळविणाऱ्यांना महाविद्यालयात प्रवेश द्यावा लागतो म्हणून गुणवत्ता घसरते, परंतु माझ्यामते विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण करण्याची नैसर्गिक क्षमता नसणारे विद्यार्थी जेव्हा आपण त्या विषयाला घेत राहू तेव्हा दर्जामध्ये घसरण आपल्याला नक्की दिसेल. (शालांत परीक्षेत मिळणाऱ्या गुणांमध्ये अशी नैसर्गिक क्षमता प्रतिबिंबित निश्चितपणे होत नाही.)

आपण फक्त एका विद्यार्थ्यावर लक्ष केंद्रित केले तरी आपणाला असे जाणवेल की त्या विद्यार्थ्याची नैसर्गिक क्षमता, बुद्धिमत्ता आणि मानसिकता हे तीनच घटक तो विद्यार्थी निवडलेल्या शाखेच्या चौकटीत विश्लेषण कौशल्य, तर्कशुद्ध विचारसरणी आणि संवादकौशल्य विकसित करण्यात यशस्वी होईल अथवा नाही. असे यश त्याने महाविद्यालयात सामान्य वर्गातून किंवा राखीव जागातून प्रवेश मिळवला यावर ती अवलंबून नाही.

जर पदवीपर्यंत विद्यार्थ्याला त्यांनी निवडलेला विद्याशाखेच्या अभ्यासाचा विशाल दृष्टिकोन न देता आपण अर्थहीन परीक्षेत उत्तम कामगिरी कशी बजावता येईल, यावर लक्ष केंद्रित करणारी संकुचित पद्धती राबविली तर शैक्षणिक परिस्थिती आणखीनच बिघडेल. अशी बिघडलेली परिस्थिती सामान्य किंवा राखीव स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सारखीच असेल.

आता वेळ अशी आली आहे की, जेव्हा लोकांचे लक्ष्य भारतातील शिक्षणव्यवस्थेला ग्रासणाऱ्या दिखाऊ समस्येवरून खऱ्या समस्येकडे वेधले पाहिजे, त्यावर जाहीर चर्चा वाद-विवाद झाला पाहिजे. अशा चर्चेची सुरुवात करण्यासाठी पदवी महाविद्यालयाशिवाय दुसरी योग्य जागा नाही. शिक्षणात सुधारणा करण्याचे सर्व मार्ग शेवटी पदवी शिक्षणाकडे वळतात. सध्याच्या परिस्थितीचे खरेखुरे व मोकळे मूल्यमापन केले तर असे दिसते की, पुढचा रस्ता आपणाला कोठेच पोहोचवत नाही.

*('इकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली'च्या २५ ते ३१ ऑगस्ट २००७च्या अंकात "Teaching students to think" या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या लेखाचा स्वैर अनुवाद...)*

**अनुवाद– प्रा. वि. म. पटवर्धन (निवृत्त)**
५, यश अपार्टमेंट, समर्थनगर, नाशिक.

# साधना शिफारस

संतोष शेणई

छायानट ❀ उत्तुंग आणि एकाकी संशोधक ❀ पाकिस्तान : लष्करी सत्तेचे अर्थरंग ❀ कोरा कागद... निळी शाई ❀ शाळा आहे – शिक्षण नाही ❀ शारदाबाई गोविंदराव पवार

## छायानट : लोभस लेखन

आनंद अंतरकर यांच्या ललितलेखनाच्या मी नेहमीच प्रेमात असतो. त्यांची 'रत्नकीळ' (व्यक्तिचित्रे), 'झुंजुरवेळ' (स्तंभलेखसंग्रह) आणि 'जळ-मृगजळ' (प्रवासानुभव) ही पुस्तके अधूनमधून उघडून मी वाचत असतो. आता त्यात 'छायानट' या त्यांच्या नव्या पुस्तकाची भर पडली आहे. हे पुस्तक वाचायच्या आधीच मी त्याच्या प्रेमात पडलो होतो. मोठा चौरस आकार, आर्ट पेपरवरची अत्यंत देखणी, बहुरंगी निर्मिती यातून पुस्तकाची 'श्रीमंती' नेत्रसुख देते.

आनंद अंतरकर मला पहिल्यांदा भेटले ते संपादकाच्या भूमिकेत. नव्या लेखकांना उभारी देणारे अंतरकर मी पाहिले. नंतर त्यांनी लेखणी हाती घेतली आणि आपल्या ललितलेखनासाठी स्वतःचा चाहतावर्ग तयार केला. 'छायानट'मध्ये त्यांचे लोभस लेखन व देखणे छायाचित्रण वाचकाला आनंद देईल.

हा एक स्वतःलाच निसर्गात शोधण्याचा प्रयत्न आहे. लेखनातून व छायचित्रणातून, एका अर्थी हे 'चित्र-लेख' आहेत. पण ते ठरवून लिहायला घेतलेले नव्हते. निसर्गात एखादी देखणी चित्रचौकट दिसली की त्यांच्याकडून कॅमेऱ्याची कळ जितक्या सहज दाबली जाते, तितक्याच सहजतेने मनातली कळ दाबली जाऊन हे लेखन कागदावर उतरले आहे. यात अंजुनाचा सूर्यास्त आहे, वेंगुर्ले बंदरावरची चमचम आहे, मुनारचा घाटमार्ग आहे, हंपीच्या कलासक्त छिन्न्या आहेत, पाचगणी-महाबळेश्वरचं आकाश आहे, आंबोलीचं मंदचरण धुकं आहे आणि तरीही हे प्रवासवर्णन नाही. हा सगळा प्रवास 'आऊट ऑफ फोकस' आहे. त्या प्रवासातील धुंदी, मस्ती, एखादा देखणा क्षण, सुंदर अनुभव एवढ्यावरच 'शार्प फोकस' आहे. साहजिकच या संग्रहातील दृश्ये आणि हे लेखन एकमेकांत लपेटून गेले आहे. यात प्रवासासाठी 'गाईड' म्हणून उपयोगी पडावे असे वेळापत्रक, मार्ग सापडणार नाही. किंबहुना 'धोपटमार्ग सोडू नको' हा विचार अंतरकरांना सुचला नाही, त्यामुळे किलोमीटरच्या व खर्चाच्या बेरजेत बसणारे प्रवास त्यांना जमले नाहीत. म्हणून हे पुस्तक केवळ पर्यटकांच्या नजरेने निसर्गाकडे पाहणाऱ्यांसाठी उपयोगी पडणार नाही. येथे निसर्गात हरवलेला कवी सापडेल, निसर्गाचा अनुवाद करू पाहणारा छायाचित्र-लेखक सापडेल, एखाद्या रानवेलीवरून जुन्या साहित्यातील, चित्रातील, चित्रपटातील अवतरण उतरवून घेणारा रसिक सापडेल.

चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी हे पुस्तक अधिक सुंदर करून हाती ठेवले आहे. लेखन व मांडणी दोन्ही पाहता-पाहता अभिमान वाटू लागतो या पुस्तकाचा.

**छायानट : आनंद अंतरकर**
**ब्लू बर्ड (इंडिया) लिमिटेड, पुणे.**
**पाने २००, किंमत रु. ६००/-**

■■■

## उत्तुंग आणि एकाकी संशोधक : कोसंबींची ओळख

दामोदर धर्मानंद कोसंबी यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून लिहिलेला भारतीय इतिहास आपल्याला माहीत असतो; पण त्यांच्यातील गणिती, वैज्ञानिक कुठे ठाऊक असतो? सुधीर पानसे यांनी 'उत्तुंग आणि एकाकी संशोधक : दामोदर कोसंबी' या पुस्तकात ही ओळख करून दिली आहे. डी.डी. कोसंबी यांनी विशुद्ध गणित, सांख्यिकी, नाणकशास्त्र, अनुवंशशास्त्र अशा विविध विषयांत स्वतंत्र व मौलिक संशोधन केले आहे, त्याची माहिती येथे होते.

दामोदर कोसंबी यांच्यावर त्यांच्या वडिलांचा, धर्मानंद कोसंबी यांचा विलक्षण प्रभाव होता. आपल्या वडिलांप्रमाणेच समाजवादी विचारसरणीचा, बौद्ध विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. पण त्याच वेळी अगदी घडणीच्या वयात (वय ११ ते २१) त्यांचे अमेरिकेत वास्तव्य व शिक्षण झाले, त्यामुळे एका मुक्त संस्कृतीचाही त्यांच्यावर परिणाम झाला होता. शिक्षण मध्येच थांबवून ते दीड

साधना शिफारस

वर्षे भारतात राहून गेले. त्यामुळे इथली त्यांची मुळे घट्ट झाली आणि जागतिक परिप्रेक्ष्यात विचार करण्याचीही क्षमता त्यांच्यामध्ये आली. इतरांपेक्षा वेगळा विचार करण्याची, प्रस्थापितांना धक्का देण्याची कुशलता त्यांनी प्राप्त केली.

'वैज्ञानिक कोसंबी' हा या पुस्तकाचा केन्द्रबिंदू आहे. इतिहासाचे एक अभ्यासक ही कोसंबींची आपल्यासाठी ओळख आहेच; पण त्यांनी केलेले वैज्ञानिक संशोधनही तेवढेच महत्त्वाचे आहे. स्वतंत्र भारतात वैज्ञानिक संशोधनाची पायाभरणी सुरू असतानाच्या काळात कोसंबी कार्यरत होते. 'टाटा मूलभूत संशोधन संस्थे'सारख्या एका अग्रगण्य संशोधन संस्थेच्या उभारणीत त्यांचा वाटा होता. हे लक्षात घेता, या काळात विज्ञान संशोधनाच्या संदर्भात अवलंबली गेलेली धोरणे व त्या काळातील घटना आधुनिक भारताच्या इतिहासाचा भाग आहेत. त्यामुळे त्यावेळची कोसंबींची भूमिका तपासण्याचा प्रयत्न लेखकाने या पुस्तकात केला आहे.

कोसंबींच्या लेखनातील आजही महत्त्वाचे ठरू शकतील असे मूलभूत मुद्दे कोणते आहेत, त्यांनी वर्तवलेली कोणती भाकिते खरी ठरली, हे जाणून घ्यायला हे पुस्तक उपयुक्त ठरेल. त्यांचे विज्ञानाच्या क्षेत्रातील किचकट संशोधन शक्य तेवढे सुबोध करण्याचा प्रयत्न येथे करण्यात आलेला आहे. कोसंबींच्या व्यक्तिमत्त्वाची व त्यांच्या संशोधनाची श्री. पानसे यांनी करून दिलेली ही ओळख मोलाची आहे.

**उत्तुंग आणि एकाकी संशोधक : दामोदर कोसंबी**
**लेखक : सुधीर पानसे**
**लोकवाङ्मय गृह, मुंबई.**
**पाने १२८, किंमत रु. ७५/-**

## पाकिस्तान : लष्करी सत्तेचे अंतरंग
## पाकिस्तानची लष्करीसत्ता

बेनझीर भुत्तो स्फोटात ठार झाल्या आणि पाकिस्तानमधील लोकशाहीची सुरू होऊ घातलेली प्रक्रिया पुन्हा खंडित झाली. बेनझीर यांचे खुनी कोण, याचे उत्तर सापडेल, न सापडेल. पण पाकिस्तानमधील लोकशाहीचे मारेकरी कोण, याचे उत्तर स्पष्ट आहे. भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे एकाच वेळी जगाच्या नकाशावर एका देशाचे दोन भाग होऊन उदयास आली. पण एका देशात लोकशाही रुजते, तर दुसऱ्या देशात लोकशाही नेस्तनाबूत होते, याचे कारण काय? पाकिस्तानात लोकशाही न रुजण्याचे तेथील विचारवंतांनी दिलेले एक कारण 'गरिबी, निरक्षरता व धर्मश्रद्धा यांमुळे पाकिस्तानात लोकशाही रुजत नाही.' पण भारतात याहून वेगळी परिस्थिती कुठे होती? या गोष्टी भारतात असूनही येथे लोकशाही रुजली आहे. मग त्याचे काहीतरी वेगळे, महत्त्वाचे कारण असायला हवे.

आयशा सिद्दिका यांच्या अभ्यासातून हे कारण पूर्ण स्पष्ट होते. हा अभ्यास 'पाकिस्तान : मिलिटरी आय.एन.सी.' या इंग्रजी पुस्तकात शब्दबद्ध झाला आहे. या पुस्तकाचा मराठी अनुवाद 'पाकिस्तान : लष्करी सत्तेचे अर्थरंग' या नावाने संजय आवटे यांनी केला आहे. पाकिस्तानच्या अभ्यासासाठी हा एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ आहे. पाकिस्तानात लोकशाही रुजणे हे तेथील लष्करालाच अमान्य आहे. देशाचे शत्रूपासून संरक्षण करणे एवढीच जबाबदारी आहे, असे तेथील लष्कर मानत नाही. त्या देशाची सत्ता आपल्या हाती राहावी असा त्या लष्कराचा पहिल्यापासून सतत प्रयत्न आहे. प्रारंभी सत्ताधाऱ्यांनी लष्कराच्या क्षमतेचा व सत्ताकांक्षेचा अंदाज न घेता, लष्कराची मदत घेतली आणि नंतर लष्कराचीच सर्वंकष सत्ता आली. लोकशाही रुजविण्याचे प्रयत्न फोल ठरले.

बेनझीरचे वडील झुल्फिकार अली भुत्तो यांनी लोकशाही आणण्याचा एक प्रयत्न केला होता. पण त्यांनी स्वतःकडे सत्ता एकवटू पाहताना, आपल्या डाव्या विचारसरणीच्या मित्रांनाही दूर केले. अंतर्गत स्पर्धा संपविण्याच्या नादात त्यांनी लष्कराला बलवान केले. त्याची फळे त्यांना भोगावी लागली.

पाकिस्तानी लष्कराला सत्ता का हवी, असा प्रश्न पडेल. या पुस्तकात पूर्ण लक्ष त्यावरच केंद्रित केले आहे. 'मिलिटरी बिझनेस' (मिलबस)साठी तेथील लष्करी दलांची राजकीय महत्त्वाकांक्षा आहे. सत्तेतील सहभागातून प्रशासनावर पकड मिळवता येते, त्याचा लाभ व्यक्तिगत आर्थिक सहभागातून घेऊन उद्योग उभारता येतात. लष्करातील अधिकारी श्रेणीतील व्यक्तींच्या लाभासाठी लष्कराची राजकीय सत्ता उपयोगी पडते. म्हणजे लष्करातील अधिकाऱ्यांचे राजकीय अर्थकारण हे तेथील लष्कराच्या राजकीय महत्त्वाकांक्षेला कारणीभूत आहे.

आयशा सिद्दिका यांनी हे खूप तपशीलवार मांडले आहे. तेथील सैन्यदलाचा राजकीय प्रभाव कसा वाढत गेला व लोकशाही कशी नामशेष झाली हे या पुस्तकामुळे चांगले समजून घेता येते. त्यामुळेच कारगील युद्ध, मुशर्रफ यांचा अट्टहास, तेथील औद्योगिक व आर्थिक विकासाच्या दिशा या गोष्टींवरही प्रकाश पडतो.

संजय आवटे यांनी हे पुस्तक खूप जलदगतीने मराठीत आणले आणि मराठी वाचकांची सोय केली. हे पुस्तक खूप किचकट व गुंतागुंतीचे आहे. त्या मानाने ते अधिक सुबोध करण्याचा प्रयत्न आवटे यांनी केलेला आहे. मात्र वाक्यरचना मराठी वळणाची न करता,

इंग्रजी वळणानेच बहुतेक ठिकाणी केली आहे. त्यामुळे भाषा प्रवाही वाटत नाही. दुसरी गोष्ट जाणवते, ती म्हणजे हे वर्तमानपत्री भाषांतर वाटते. भाषांतरात शब्दाला शब्द, वाक्याला वाक्य दुसऱ्या भाषेत पर्याय म्हणून दिले जातात. पुस्तकाच्या अनुवादात त्याहून अधिक अपेक्षा असते. पुस्तकाचा अनुवाद आपण एक स्वतंत्र निर्मिती करीत आहोत या जाणिवेने करायला हवा. त्यात अनुवादाच्या भाषेची लय, प्रवाह आणायला हवा. अन्यथा अनुवाद शुष्क होतो. पण एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ म्हणून हे पुस्तक नक्कीच मोलाचे आहे.

**पाकिस्तान : लष्करी सत्तेचे अर्थरंग**
**– आयशा सिद्दिका**
**अनुवाद : संजय आवटे**
**कॉन्सेप्ट बुक्स, पुणे.**
**पाने २३६, किंमत रु. २९५/-**

■■■

## कोरा कागद... निळी शाई अनवाणी शब्द निघाले

मनोज बोरगावकर यांचा 'कोरा कागद... निळीशाई' हा कवितासंग्रह आशा जागविणारा आहे. यातील 'माझ्या मुलीचं प्रगतिपुस्तक : इयत्ता पहिली' ही कविता मी पूर्वीच वाचली होती. संग्रहातील ही सर्वांत चांगली कविता आहे. सध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेवरचे भाष्य त्यात आहे. 'कवीची बायको' व 'ऑपरेशन थिएटर' या कविताही चांगल्या आहेत. पण या कवितांची तीव्रता संपूर्ण संग्रहभर टिकत नाही.

बोरगावकरांच्या कवितांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या बहुतेक कवितांमध्ये एक गोष्ट असते. गुरुनाथ धुरींच्या कवितेत असायची तशी. धुरींची कविता अधिक आत्ममग्न असायची. त्यामुळे ती गोष्ट एकप्रकारे आत्मचरित्राचा तुकडा असायची. येथे तसे घडत नाही. कवी आत्ममग्नता व सामाजिक भान यांच्या सीमेवर रेंगाळतो. दोन्हींची तीव्रता पूर्ण ताकदीने शोषत नाही. तरीही त्याच्या या गोष्ट सांगण्याच्या शैलीने कवितांना वेगळेपण दिले आहे.

एक चांगली क्षमता असलेला हा कवी कवितेच्या वाटेवर ठाम खडा का राहात नाही, हे कळत नाही. प्रतिमा नेमक्या का असल्या पाहिजेत, याचाही पुरेसा विचार होत नाही. उदाहरणार्थ, 'तुला पांढरा कावळा शिवला' या कवितेची सुरुवात पहा :

*'वाळत चाललेल्या पानाचा देठ*
*फांदीपास्नं अलगद तुटून पडावा*
*एवढ्या सहजी पोरगी भररस्त्यात*
*मैत्रिणीला म्हणून गेली...*
*बाई गंऽऽ तुला पांढरा कावळा*
*जरा लवकरच शिवला...'*

'कावळा शिवण्या'ची घटना स्त्रीच्या जीवनात महत्त्वाची आहे. ती आतून उमलून येण्याचा, नवी होण्याचा तो क्षण आहे. पण त्या घटनेसाठी वापरलेली प्रतिमा ही 'संपण्या'च्या प्रक्रियेतील आहे. म्हणजे एकदम उलट. विरोधी प्रतिमांतूनही काव्य शोधता येते, पण येथे तसेही घडत नाही. या कवितेत काही काव्यपणाची शक्यता होतीही; पण ही कविता साध्या विधानांवरच रेंगाळते. 'पुनरागमनाय च' या कवितेत असाच गोंधळ आहे –

*'तिरडी बांधतानाची ब्लेड*
*बरोबर नेमक्या जागी*
*खोचून ठेवावी – म्हणजे तिरडी*
*घाटावर मोकळी करताना कामी येते;*
*जगण्यावर एवढं मरेस्तोवर प्रेम*
*केलंय आपणही पण*
*सकाळी घराबाहेर पडलेलं*
*माणूस संध्याकाळी जितंजागतं*
*सहीसलामत परतेलच खात्री*
*नाहीच देता येत*
*एवढं असुरक्षित कसं जगावं?*

येथे अर्धविरामापूर्वीचा पूर्वार्ध व नंतरचा उत्तरार्ध यांची सांगड कशी घालायची हे मला उमगले नाही. पूर्वार्धातून उत्तरार्धात काही अर्थांतरण होतेय का, हे शोधायचा माझा प्रयत्न विफल झाला.

कवी मधूनच इंग्रजी शब्द वापरतो. पण त्या संपूर्ण कवितेची शैली म्हणून हा इंग्रजी शब्द येत नाही. मग अचानक येणारा शब्द बोचतो. काही ओळी – कल्पना सुरेख आहेत, पण ती तरलता संपूर्ण कवितेला तोलून धरायला तोकडी पडते. त्यासाठी रियाझ हवाच.

काही कवितांमध्ये षंढत्वाचा उल्लेख येतो. 'आत्महत्येपूर्वीचं स्वगत', 'काडेपेटीच्या डब्बीत', 'आताशा मी फार खुडूक बसलेला असतो', 'थोडंसं रुपा हत्तिणीविषयी', 'ऑपरेशन थिएटर', 'पुनरायमनाय च' या कविता पाहता येतील. आधुनिक कवितेत नपुंसकत्वाची भावना कित्येकांनी व्यक्त केलीय. 'गांडुंची पिढी' ही साठोत्तरी काळातील कवींना 'उपाधी'च होती. पण कवितांमधील भावना सामाजिक होत नाहीत; वैयक्तिक पातळीवर लैंगिकतेचा ध्यास एवढे मर्यादित स्वरूप राहते. त्यामुळे कवितेला उंची मिळण्याची संधी गमावली जाते. आत्ममग्न की सामाजिक, या पेचात कवी अडकलेला दिसतो.

**कोरा कागद... निळी शाई**
**– मनोज बोरगावकर**
**राजहंस प्रकाशन, पुणे.**
**पाने ९६, किंमत रु. ७५/-**

■■■

## शाळा आहे - शिक्षण नाही : मोलाचं पुस्तक

हेरंब कुलकर्णी यांचं 'शाळा आहे, शिक्षण नाही' हे पुस्तक खूप मोलाचं आहे. हेरंबची शिक्षक, पत्रकार, कवी

**साधना शिफारस**

ही सगळी रूपे अतिशय संवेदनशीलतेने या छोटेखानी पुस्तकात दिसतात. गडचिरोली, चंद्रपूर, मेळघाट, नंदुरबार, नांदेड, यवतमाळ या भागांतील आदिवासी पाड्यांमधून हजारो किलोमीटर वणवण करून हा 'शाळा' शोधत राहिला. शाळेच्या इमारती त्याला पाहायला मिळाल्या, पण त्यात शिक्षण देणाऱ्या शाळा सापडल्या नाहीत. या परिसरातील विद्यार्थी, शिक्षक, पालक, अधिकारी या सगळ्यांबरोबरचे संवाद, पाहणीचे निष्कर्ष येथे आहेत. अत्यंत संयमित शब्दांत, साध्यासोप्या निवेदन रूपाने हे सारे आपल्यासमोर येते. छायाचित्रे, चौकटी, आकडेवारी यामुळे मूळ मजकूर अधिकच बोलका होतो.

यातील माहिती आपल्यापर्यंत शैक्षणिक अवस्थेचे कटू सत्य घेऊन येते. निष्कर्ष थरकाप उडावा इतके भीषण आहेत. यातील शब्द संयमित असले तरी त्या आडून मनाची तडफड स्पष्ट दिसते आणि आपणही अस्वस्थ होतो. दोनशे आदिवासी गावांचा शिक्षणासाठी 'टाहो' आपल्याला ऐकू येत नाही याची शरम वाटते. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत स्वातंत्र्यानंतर साठ वर्षांनीही शिक्षण पोहोचविणे आपल्याला जमत नाही. या व्यवस्थेतील दोष लक्षात येत नाहीत की, ते अजूनही आपल्याला दूर करायचे नाहीत हा प्रश्न पडतो. एका संवेदनशील माणसाने ही शोधयात्रा केल्याने किमान आपल्याला परिस्थितीची जाणीव तरी झाली.

**शाळा आहे – शिक्षण नाही**
**– हेरंब कुलकर्णी**
**ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.**
**पाने १००, किंमत रु. १००/-**

## शारदाबाई गोविंदराव पवार : प्रेरक चरित्र

'शारदाबाई गोविंदराव पवार' हा चरित्रग्रंथ नुकताच यु.एस. लायब्ररी ऑफ काँग्रेस (वॉशिंग्टन) या जगातील अतिशय जुन्या व मोठ्या ग्रंथालयाने आपल्या संग्रहासाठी निवडला आहे. सरोजिनी नितीन चव्हाण यांनी हे चरित्र लिहिले आहे. शारदाबाईंच्या आयुष्याचा सारा पटच भारावून टाकणारा आहे. महिला सबलीकरणाची चळवळ सुरू झालेली असताना हे चरित्र प्रेरक ठरेल.

कोल्हापूर जिल्ह्यात एका छोट्या गावातली शारदा कोवळ्या वयातच आई-वडिलांचे छत्र हरवून बसली होती. मोठ्या बहिणीकडे पुण्यात आल्यावर सेवासदनमध्ये शिक्षण झाले. नंतरचे तिचे सारे आयुष्य म्हणजे 'झुंज आणि झेप' यांचाच इतिहास आहे. एक विलक्षण जिद्दी, करारी व बुद्धिमान स्त्री असे दर्शन या काळात घडते.

या स्त्रीने शेती केली. टांगा जुंपून शेतावर जाणे त्याकाळी सोपे नव्हते. या शेतमालाच्या विक्रीवरही त्यांचे लक्ष असे. अकरा मुलांचा डोळसपणे सांभाळ केला. शरद पवार हे राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळवणारे त्यांचे पुत्र सर्वांना माहीत असतात; पण इतर मुलेही तेवढीच कर्तबगार निघाली, घरात तशी पार्श्वभूमी नसताना उद्योजक बनली. त्याचे धडे बाईंनीच दिले होते हे जाणवते. मुलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव त्यांनी करून दिलेली दिसते.

या बाई राजकारणातही उतरल्या. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी पुणे जिल्हा लोकल बोर्डात निवडून गेल्या. चौदा वर्षे तेथे काम केले. त्यांनी विविध समित्यांमध्ये अभ्यासपूर्ण योजना मांडल्या आणि कामे मार्गी लावली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यात सहभागी झाल्या.

रोमांचकारक असे हे चरित्र आहे. मात्र वाङ्मयीनदृष्ट्याही हे पुस्तक उंचीवर पोहोचविण्यात लेखिका यशस्वी झाली नाही. काही प्रकरणांची शालेय निबंधासारखी सुरुवात, द्विरुक्ती, बाळबोध प्रतिमा, काही वेळा चुकीची रूपके हे दोष या लेखनात आहेत. चरित्र हा वाङ्मयप्रकार इतिहास व ललित या दोन गुणांनी बनतो. त्याचा विसर पडला की ते लेखन तोकडे बनते. असे असले तरी चरित्रनायिकेच्या अंगभूत गुणांनी हा इतिहास वाचनीय ठरतो.

**शारदाबाई गोविंदराव पवार**
**– सरोजिनी नितीन चव्हाण**
**सकाळ प्रकाशन, पुणे.**
**पाने १९६, किंमत रु. १५०/-**

**– संतोष शेणई**
ए-१/३, सुंदर रचना, विठ्ठलनगर,
वडगाव बुद्रुक, पुणे ४११०५१.
मोबाईल : ९८८१०९९०१६.

## प्रकाशकांना आवाहन :

प्रत्येक महिन्यातील पहिल्या अंकात आम्ही सहा नवीन पुस्तकांची थोडक्यात ओळख करून देणार आहोत आणि त्यांची मुखपृष्ठे 'साधना' अंकाच्या मलपृष्ठावर छापणार आहोत. 'वेगळा विषय' आणि 'दर्जेदार लेखन' या दोनच निकषांवर **'साधना शिफारस'**साठी पुस्तके निवडणार आहोत. म्हणून मराठीतील प्रकाशकांना आम्ही आवाहन करतो, आपल्या प्रकाशनसंस्थेने अलीकडच्या दोन-तीन महिन्यांत प्रकाशित केलेल्या वेगळ्या विषयावरील, दर्जेदार पुस्तकाची एक प्रत 'साधना'कडे अवश्य पाठवावी.

**– संपादक, साधना.**

## माझ्या मनाला खटकले...

गेल्या महिन्यात ‘सह्याद्री’ वाहिनीवर साधना साप्ताहिकाच्या संपादकांची मुलाखत पाहिली. त्यात प्रथमपासून शेवटपर्यंत कोठेच साधना प्रेसचा उल्लेखही नसावा हे माझ्या मनाला खटकले आणि म्हणून या पत्राचा प्रपंच!

सुरुवातीपासून साधना ट्रस्टच्या (प्रेस, प्रकाशन, साप्ताहिक) या तीन शाखा मानल्या जात होत्या. मुंबईत आर्थिकदृष्ट्या साधना प्रेस चालविणे अशक्य झाले, म्हणून तो प्रेस पुण्यात हलविण्याचा निर्णय झाला.

साधना प्रेस मुंबईहून पुण्यात आला त्यावेळी मशिनरी उतरवून घेऊन ती चालू होईपर्यंतची जबाबदारी यदुनाथ थत्ते यांनी श्री.हरिभाऊ गद्रे यांच्या संमतीने माझ्यावर टाकली होती. पुण्यात शनिवार पेठेत पुरंदरे वाड्यात साधना प्रेस नियमित सुरू झाल्यानंतर माझी जबाबदारी मी पूर्ण केली.

त्यानंतर साधना प्रेसच्या नियुक्त व्यवस्थापकांनी त्यांच्या कारकिर्दीत साधना प्रेसला उर्जितावस्था प्राप्त करून दिली आणि नंतर प्रेस पुरंदरे वाड्यातून शनवारातच सरदार बिवलकर यांच्या वास्तूत स्थलांतरित झाला. त्यामुळे प्रेस, प्रकाशन, साप्ताहिक या तिन्हीला भरपूर जागा उपलब्ध झाली.

१२ जुलै १९६१ रोजी साधना ट्रस्टची मिटींग मुंबईत होती, त्यासाठी प्रेस व्यवस्थापक, प्रकाशन व्यवस्थापक, साधना ट्रस्ट सेक्रेटरी व साधना साप्ताहिकाचे संपादक श्री.यदुनाथ थत्ते सर्वजण मुंबईत होते.

तो दिवस पुणेकरांच्या दृष्टीने घातक ठरला! अचानक पानशेत धरण फुटल्याने पाण्याने रौद्ररूप धारण करून पुण्यात हाहाकार उडवून दिला.

साधना प्रेसच्या आवारात पुराचे पाणी यायला लागल्याने, तेथील कामगारांनी जनवाणी प्रेसमध्ये मदतीसाठी निरोप पाठविला, म्हणून मी तेथील तीन-चार  लोकांना घेऊन साधनात मदतीसाठी गेलो.

मशीनखात्यात असलेली कागदाची रिमे आम्ही पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये नेऊन ठेवेपर्यंत, साधनाच्या चौकात घोटाभर पाणी झाले. प्रत्येकालाच घराची चिंता लागल्याने व क्षणाक्षणाला पाणी वाढत असल्याचे पाहून सर्वांनी तेथून काढता पाय घेतला. शेवटी मी एकटाच राहिलो. मशीनखात्याच्या दरवाजाला कडी लावेपर्यंत गुडघ्यापर्यंत पाणी वाढले. तशा परिस्थितीत रस्त्यावर येणे पाण्याच्या ओढीने शक्य न झाल्याने, पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये जाऊन थांबलो. दुपारी ४ वाजेपर्यंत पहिल्या मजल्यापर्यंत पाण्याची पातळी वाढल्याने मला मशीनखात्याच्या पत्र्यावर चढून बसावे लागले. त्यानंतर संपूर्ण रात्रभर मला एकट्याने पत्र्यावर काढावी लागली.

सकाळी उजाडल्यानंतर पुरामुळे झालेल्या परिस्थितीची खरी कल्पना आली. माझ्या दृष्टीने तेथील दुसरा दिवस हा माझा पुनर्जन्माचा ठरला! दुसऱ्या दिवशी सकाळी चिखलातून बाहेर पडून घरी जाईपर्यंत दुपारचे दोन वाजले!

पुरानंतर जवळजवळ तीन-चार महिने साधना प्रेस चालू होण्यात गेले. पुरानंतर साधना प्रेसच्या व्यवस्थापकांनी राजीनामा दिल्या कारणाने यदुनाथ थत्ते यांनी साधना प्रेसच्या व्यवस्थापकपदी माझी नियुक्ती केली. पुरानंतर १९६१ साल अखेरपर्यंत आम्ही अहोरात्र कष्ट करून साधना प्रेस पुन्हा प्रगतीपथावर आणण्यात यशस्वी झालो. माझ्या बरोबरीने त्यावेळी साधना प्रेसमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कामगाराचे प्रयत्न कारणीभूत ठरले. साधना प्रेसला आणि साप्ताहिकाला महाराष्ट्र राज्यातर्फे प्रथम क्रमांकाची पारितोषिके प्राप्त झाली, या पाठीमागेसुद्धा साधना प्रेसच्या कामगारांचा सिंहाचा वाटा आहे.

**विद्याभाऊ पटवर्धन**, ७०५ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.

## अत्यंत निराशा झाली!

यंदाचा ‘साधना’चा अंक विशेष असेल असे पाहताक्षणी वाटले होते, परंतु अत्यंत निराशा झाली. ‘विषमता आणि वैरभाव मिटविणे’ हे जीवनध्येय असलेल्या साने गुरुजींच्या ‘साधना’ला तुम्ही कुठेही न्याय दिला नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा एवढा विषय आज सर्वसमाजाला अस्वस्थ करत आहे. त्यावर आपल्या ‘साधना’ दिवाळी अंकात फक्त एक कविता ‘प्रतिक्रिया’ नावाची आहे. आपल्याला ह्या प्रश्नाने काहीच अस्वस्थ केले नाही, असे समजावे काय? साने गुरुजींनी सामाजिक वेदना मांडण्यासाठी निर्माण केलेले व्यासपीठ आपण अत्यंत फालतू विषयांसाठी वापरत आहात, हे दिवाळी अंकाची अनुक्रमणिका पाहताच कळून चुकते. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपल्याकडून परिसंवाद, लेख; मार्गदर्शन होईल असा अंक अपेक्षित होता.

**उत्तम चव्हाण**, अष्टविनायकनगर, हिंगोली.

## दुष्ट प्रवृत्तींशी लढणे आवश्यक आहे म्हणून...

कल्याणच्या राष्ट्रसेवा दलातील सैनिक प्रभाकर गोडसे यांनी सांताक्रूझच्या साने गुरुजी आरोग्य मंदिरास दिलेल्या देणगीतून 'पुष्पा गोडसे पुरस्कार' रु. ५०००/- सिद्ध झाला आहे. प्रभाकर गोडसे यांचे म्हणणे असे की माझ्या आडनावाच्या एका व्यक्तीने महात्मा गांधींचा खून करून, भारताला जगापुढे आपली मान खाली करायला लावली. परंतु मोठेपणी वाटू लागले की, ह्या दुष्ट प्रवृत्तीशी सतत लढणे आवश्यक आहे. ह्यासाठी विधायक कार्य आणि संघर्ष करून सतत ह्या दुष्ट प्रवृत्तीविरुद्ध उभ्या राहणाऱ्या कार्यकर्त्याला आपल्या दिवंगत पत्नीच्या नावे, दरवर्षी पुरस्कार देऊन त्या कार्यकर्त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी.

हा पुरस्कार यंदा पुण्याचे रहिवासी राष्ट्र सेवादलाचे महामंत्री श्री.सुरेश देशमुख यांना साने गुरुजी आरोग्य मंदिराने जाहीर केला. प्रजासत्ताक दिनाला सकाळी झेंडावंदनाच्या वेळी सागे गुरुजी आरोग्य मंदिराच्या प्रांगणात ह्या पुरस्काराचे वितरण शिरोळच्या दत्त सहकारी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व साधनाचे कार्यकारी विश्वस्त श्री.आप्पासाहेब सा.रे.पाटील यांच्या हस्ते देण्यात आला.

श्री.सुरेश देशमुख पुणे महानगपालिकेत बालगंधर्व रंगमंदिराचे व्यवस्थापक म्हणून अनेक वर्षे कार्यरत होते. त्यांनी स्वखुशीने निवृत्ती स्वीकारली आणि राष्ट्र सेवादलाचे सर्ववेळ सेवक झाले. राष्ट्र सेवादलाने त्यांच्यावर पुण्याच्या 'साने गुरुजी स्मारका'चे व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सोपविली होती. त्यांनी ह्या कामाचे सोने केले. ह्या स्मारकासाठी एक कोटी रुपये जमवून एक वेगळाच आदर्श निर्माण केला. त्यांनी साने गुरुजी स्मारक दृष्ट लागेल इतके सुंदर केले आहे.

(सविस्तर वृत्तांत पुढील अंकात)

**– लीलाधर हेगडे**

## उगाच हमी देऊ नये!

अलीकडे साधना साप्ताहिकात श्री.गोविंद तळवलकर सी.आय.ए.च्या फायलींमधील माहितीच्या आधारे भारतीय कम्युनिस्ट चळवळ, सोव्हिएत कम्युनिस्ट पार्टीची कशी गुलाम होती; हे अधिकारवाणीने सांगत आहेत व 'साधना'चे भोळेभाबडे वाचक आपल्याला ब्रह्मज्ञान दिल्याबद्दल त्यांचे आभार मानत आहेत.

वास्तविक, भारतातील समाजवाद्यांनी हे सत्य ६० वर्षांपूर्वीच मांडले होते. आपल्या वाचकांना आपण श्री.अशोक मेहता, मधु लिमये, केशव गोरे आदींची पुस्तके वाचावयास सांगावे; म्हणजे हे सत्य समजण्यास अमेरिकन गुप्तहेरखात्याची आवश्यकता नाही हे त्यांना कळेल. तसेच एक विनंती. आपण श्री.तळवलकरांना सी.आय.ए.च्या ग्वायना, ग्वाटेमाला, निकाराग्वा, क्युबा, चिली आदी दक्षिण अमेरिकन देशांतील कारवायांवरही प्रकाश पाडण्यास सांगावे.

श्री.दत्ता वांद्रे यांचे अजित अभ्यंकरांना उद्देशून लिहिलेले पत्र वाचले. 'तळी उचलणे' हा शब्दप्रयोग एखाद्याच्या गैरकृत्याचे समर्थन केल्यास वापरतात हे श्री.वांद्रे यांच्या लक्षात नसावे. तसेच सध्याच्या जागतिकीकरणाचा अर्थ अमेरिकी व पाश्चात्त्य देशांच्या नेतृत्वाखालील जागतिकीकरण होय. पाश्चात्त्य राष्ट्रातील नेतृत्वाच्या डोक्यात एकोणिसाव्या शतकातील व विसाव्या शतकाच्या सुरुवातीस रशियन क्रांती होईपर्यंत असलेले "White Mans Burden"चे भूत आहे. श्री.वांद्रे यांनी २८ एप्रिल २००२ च्या 'जनता' या इंग्रजी साप्ताहिकातील The New Liberal Imperialism हा लेख वाचला नसल्यास अवश्य वाचावा.

पं.नेहरूंनी अलिप्त राष्ट्र संघटना उभी केली हे खरे; परंतु त्याच नेहरूंच्या वारसदारांनी या संघटनेच्या एका संस्थापक राष्ट्राचे– युगोस्लाव्हियाचे (पश्चिम जर्मनी, अमेरिका व अन्य पश्चिम युरोपीय देशांच्या चिथावणीवरून) तुकडे झालेले मखखपणे पाहिले. काँग्रेस पक्षाच्या सरकारातील नेते व आर्थिक धोरण ठरविणारे अहलुवालियांसारखे वर्ल्ड बँकेच्या व इंटरनॅशनल मोनेटरी फंडात काम करीत होते. त्यांना अजूनही डॉलरमध्ये निवृत्तीवेतन मिळत असेल. अशा नेतृत्वाकडून स्वतंत्र बाण्याची अपेक्षा करणे कठीणच. तरी श्री.वांद्रे यांना विनंती की, सोनिया गांधी, सज्जन डॉ.मनमोहनसिंग अमेरिकेच्या दबावाला बळी पडणार नाहीत, याची उगाच हमी त्यांनी देऊ नये. अजूनही इराणबरोबरचा नैसर्गिक वायुसंबंधीचा करार आपण करीत नाही, उलट पाकिस्तान व इराणची बोलणी शेवटच्या टप्प्यात आहेत. याबाबतीत कोणाचा दबाव येत आहे, हे सांगण्याची गरज नाही.

**भालचंद्र राजे**
'गंगाधाम', पुणे ४११०३७.

## सर्व वर्गणीदारांना विनम्र आवाहन

साधना साप्ताहिकाच्या वर्गणीदारांशी वर्गणीच्या नूतनीकरणासाठी अधिक सुलभपणे संपर्क साधता यावा, म्हणून वर्गणीदारांच्या फोन नंबरची यादी तयार करण्याचे काम चालू आहे. तरी कृपया कार्डावर आपले लँडलाईन व मोबाईल नंबर, फोन नंबर, पूर्ण नाव, पत्ता व ग्राहक क्रमांक यांसह साधना कार्यालयाकडे पाठवून सहकार्य करावे ही विनंती.

**– संपादक, साधना**

## सेलूसारख्या छोट्या गावात...

आम्ही चालवलेल्या वाचन संस्कृती अभियानाचा अहवाल देत आहोत.

महिलांमध्ये वाचनाची आवड निर्माण केल्यास वाचन संस्कृती खऱ्या अर्थाने विकसित होईल, असा विचार करून सेलू शहरात वेगवेगळ्या भागात चालणाऱ्या ज्ञानोदय, अंत्योदय, मुक्तद्वार, स्वाध्याय या ग्रंथालयाच्या शाखांवर महिला ग्रंथपालांची नेमणूक करून त्यांच्या सहकार्याने घरोघर जाऊन, महिलावाचक सभासदांची नोंदणी केली. पुस्तके घरपोच मिळतील अशी व्यवस्था केल्यामुळे प्रत्येक शाखेवर ३० ते ३५ महिला वर्गणीदार झाल्या. काय वाचावे, कसे वाचावे या संदर्भात वाचकांना दिशा मिळावी, म्हणून मुख्य ग्रंथालयात महिन्यातून एक कार्यक्रम घेण्याचे ठरले.

११ नोव्हेंबर २००६ रोजी वाचन संस्कृती अभियानाची रितसर सुरुवात करण्यात आली. अभियानाचे उद्घाटन ज्येष्ठ सर्वोदय नेते गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या हस्ते झाले. 'लेखक तुमच्या भेटीला' या कार्यक्रमांतर्गत विनोदी लेखक डॉ.आनंद देशपांडे, बाल नाटककार रेणु पाचपोर, कवी अविनाश साळापुरीकर या लेखकांचा 'लेखनामागील माझी भूमिका' या विषयांवर संवाद रंगला.

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या 'अग्निपंख' व 'भारत २०२०' या बहुचर्चित पुस्तकांवर झालेल्या चर्चेत युवक-युवतींचा सहभाग अधिक होता. 'व.पु.काळे यांच्या कथा' या विषयावर महिला वाचकांनी मांडलेली मते अंतर्मुख करणारी होती. 'प्राचार्य वासुदेव मुलाटे' यांच्या साहित्यावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी स्वत: लेखक श्री.मुलाटे यांनी लेखकांच्या जाणीवांच्या संदर्भात केलेले विवेचन मार्मिक होते.

वाचन संस्कृती अभियानाचे सहावे पुष्प 'आजची वृत्तपत्रे' या विषयावर गुंफण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार डी.व्ही.मुळे यांनी आजची वृत्तपत्रे ध्येयवादापेक्षा व्यावसायिकतेकडे कशी झुकत चालली आहेत, हे सोदाहरण स्पष्ट केले.

'माझा साक्षात्कारी हृदयरोग' या पुस्तकाचे लेखक डॉ.अभय बंग यांच्या ध्वनिमुद्रित व्याख्यानाची कॅसेट वाचकांना ऐकवण्यात आली.

आठवे पुष्प 'माझे आवडते नियतकालिक' या विषयावर गुंफले गेले. प्राचार्य डी.आर.कुलकर्णीसरांनी 'साधना' या नियतकालिकाची ध्येयवादी वाटचाल विशद केली. इतर वाचकांनी आपापल्या आवडत्या साप्ताहिकाची वैशिष्ट्ये सांगितली. वाचन संस्कृती अभियानाचे, नववे पुष्प युवकांच्या आग्रहावरून शिव खेरा यांच्या प्रेरणादायी पुस्तकावर आयोजित करण्यात आले होते. 'आजादीसे जीओ' ही सीडी वाचकांना दाखविण्यात आली. नाट्यकलाकार श्री.अनिल कुलकर्णी व सौ.रोहिणी कुलकर्णी यांनी सादर केलेले साभियन नाट्यवाचन सर्वांची मने जिंकणारे ठरले.

अकरावे पुष्प होते 'पुस्तक प्रदर्शनाचे', ग्रंथालयात नव्याने दाखल झालेली पुस्तके हाताळण्याची संधी जिज्ञासू वाचकांना मिळाली. वाचन संस्कृती अभियानामुळे पुस्तकांकडे वाचक अधिक शोधक नजरेने पाहात असल्याचे दिसून आले. बारावे पुष्प 'दिवाळी अंका'वर गुंफण्यात आले. वाचकांनी 'मला आवडलेला दिवाळी अंक' या विषयावर आपले विचार मांडले.

अशा प्रकारे वाचन संस्कृती अभियानांतर्गत प्रत्येक महिन्यात एक असे एकूण बारा कार्यक्रम वर्षभरात झाले. यात अगदी पहिल्यांदाच एखाद्या विषयावर व्यासपीठावरून बोलण्याची संधी लाभलेल्या वाचकांची संख्या अधिक आहे. साधनाने प्रकाशित केले की वाचन संस्कृती अभियान विशेषांक यासाठी दिशादर्शक ठरले.

या प्रत्येक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे अध्यक्ष सेलूभूषण ॲड्. वसंतराव खारकर होते. त्यांनी प्रत्येक वेळी यथोचित समारोप करून, वाचकांना अधिक चांगल्या पुस्तकांचे वाचन करण्यासाठी आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहचिटणीस व संयोजक प्रा.डॉ.गंगाधर गळगे यांना ग्रंथपाल श्री.महादेव आगजाळ, साहाय्यक श्री.पंडित जगाडे, लिपिक श्री.विलास शिंदे व सेवक श्री.संतोष काष्टे या सर्वांचे बहुमोल सहकार्य लाभले.

ग्रंथालयाचे चिटणीस प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, सल्लागार डी.आर.कुलकर्णीसर यांचे मागदर्शन उपयुक्त ठरले. या वर्षभरात अनेक लेखक, कवी, समीक्षक, कथाकार व कलाकारांनी वाचन संस्कृती अभियानात उपस्थिती लावून जो सहभाग नोंदविला, तो सेलूसारख्या छोट्या गावात अभूतपूर्व होता.

**प्रा. डॉ.गंगाधर गळगे**
सहसचिव/संयोजक, वाचन संस्कृती अभियान.

### अभिनंदनीय व अनुकरणीय

साधना परिवारात असलेल्या ज्येष्ठ साहित्यिक श्रीमती सरिता पदकी यांनी रु.६१००/- ची देणगी साधना हीरकमहोत्सव निधीसाठी दिली आहे. त्यांना मन:पूर्वक धन्यवाद.

**– संपादक, साधना**



पृष्ठ २ वरून)
बसले. म्हणाले– ‘लेकी! गावाला न्हावी नाही. मग गाव कुठं जाईल? आता तूच बळ जमा कर आणि गावाची सेवा कर. तुझ्या घरात बळ एकवटेल.’ कडुकर साहेबांचा शब्द शांताबाईने खाली पडू दिला नाही. त्यांची दाढीडोई केली आणि मग सगळे गाव शांताबाईच्या गुडघ्यावर डोके ठेवून दाढीडोई करू लागले. गावच्या बैत्यावर शांताबाईने दोन मुलींचे विवाह केले. घरात कधीच काही कमी पडले नाही.

शहराच्या आक्रमणाने गाव हळूहळू बदलू लागले. नव्या शिकणाऱ्या पोरांना सिनेमातल्या हिरोंच्या हेअरस्टाईलची भुरळ पडू लागली. अशातच गावात टीव्हीचे आगमन झाले आणि मग सगळा बट्ट्याबोळ झाला.

शांताबाईकडे केस कापणे, ‘जीन पँटवाल्या’ जमातीला कमीपणाचे वाटू लागले. बाईने केस कापणे हास्यास्पद ठरू लागले. शांताबाईकडील गिऱ्हाईकांचा राबता कमी होत गेला, तिच्या जगण्यापुढे नवे प्रश्नचिन्ह उभे ठाकले. बाया-बापड्या आपल्या घरातील पोराबाळांना समजून सांगू लागल्या, पण त्यांचे ऐकणार कोण? व्यवसाय न करता गावातल्या लोकांकडून ‘बैते’ गोळा करणे, शांताबाईला नकोसे वाटू लागले. मग यावर गावातल्याच आयाबायांनी मार्ग शोधला. त्यांनी शांताबाईसमोर नवा पर्याय ठेवला. गावातल्या प्रत्येक गोठ्यात एकतरी म्हैस-रेडकू असतेच. गावकरी महिन्या दोन महिन्यातून शांताबाईला बोलावून गोठ्यातील म्हैस, रेडकू भादरून घेऊ लागले. यातूनच शांताबाई आजूबाजूच्या गावात जाऊन रेडा-म्हैस, रेडकू भादरण्याचा व्यवसाय करू लागली. त्यामुळे पंचक्रोशीत तिच्या वस्तऱ्याची ख्याती पसरत गेली.

आज वयाच्या साठाव्या वर्षीही शांताबाई काखोटीला धोपटी मारून ‘खर्डायची का म्हैस’ अशी आरोळी देत, आसपासच्या खेड्यापाड्यांतून फिरत असते. संसाराचा गाडा तिने स्वत:च्या हिंमतीवर काठापर्यंत आणला. हे शक्य झाले ते फक्त, कृषीजन संस्कृतीतील ‘सहानुभव आणि समूहभाव’ यामुळेच.

गावगाडा बदलतोय. ‘तशी टाकावूच होती गावगाड्याची व्यवस्था’ अशा आशयाची विधाने आपण सतत ऐकत असतो. शिक्षणामुळे नवी जीवनदृष्टी येते, हे खरे; पण ‘या नव्या जीवनदृष्टीतच सारे सत्व आहे,’ असे ठाम मानून खेड्यातल्या सर्वव्यापी जीवनाला हद्दपार करण्याचा चंग भारतातील नवसाक्षरांनी बांधला आहे. मेकॅलेप्रणित शिक्षणातील पिलावळ यात अग्रेसर आहे. यातूनच खेड्याविषयी, खेड्यातील जीवन व्यवहाराविषयी तुच्छतादर्शक शब्दांची उधळण सर्वत्र होत आहे.

गावगाड्यातील जातीच्या भिंती, अंधश्रद्धा वगैरे बऱ्याच गोष्टी टाकावू आहेत हे मान्य. त्या गावगाड्यातून हद्दपार झाल्या पाहिजेत, याविषयीही दुमत असण्याचे काहीच कारण नाही. पण गावगाड्यातील सगळे जगणेच टाकावू आहे, असे मानणे कितपत योग्य आहे? येथेही जगण्याचे ज्ञान लोकांनी पिढ्यानुपिढ्याच्या धडपडीतून जमवलेले आहे. पण याचा आपणास सोईस्कर विसर पडला आहे. त्यामुळे अनेक घोटाळे निर्माण झाले आहेत. निसर्गालाच हद्दपार करण्याचा नागरी सोस, खेड्यापाड्यांत पाझरू लागला आहे. यातूनच खेड्यातल्या ‘सहानुभाव’ आणि ‘समूहभाव’ यांच्या चिरेबंदी गढीला भेगा पडू लागल्या आहेत. पण सहानुभाव आणि समूहभाव थोडाफार शिल्लक असल्याची साक्ष शांताबाईसारखे काहीजण देतात. स्त्री-मुक्तीचे झेंडे घेऊन आकाशव्यापी गर्जना करणाऱ्या स्त्री-मुक्तिवाल्या बायका आणि स्त्री उद्धाराच्या आरोळ्या राज्यभर मारत फिरणारे राजकारणी व प्रशासक यांना शांताबाईसारखा विचार करता येईल का?

**राजन गवस**
मु.पो.गारगोटी, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.
मोबा. : ९४२२५८०५१७

## ‘साधना’च्या वर्गणीत वाढ

प्रिय वाचकहो,

गेल्या पाच वर्षांत एक पैशाचीही वाढ झाली नाही, अशी एखादी गोष्ट आपणास आठवते का? आठवणार नाहीच, कारण सद्य:परिस्थितीत तसे काही नाहीच. परंतु एक अपवाद आहे, तो म्हणजे ‘साधना’ साप्ताहिकाचा.

साधना साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी गेल्या पाच वर्षांत अजिबात वाढवलेली नाही. साधना साप्ताहिक दर आठवड्याला ३२ पानांचा अंक; असे वर्षभर आणि ३ विशेषांक एवढे सगळे फक्त अवघ्या रु.३००/- (व्यक्तीसाठी) व रु.४००/- (संस्थेसाठी) या दराने देते. वर्षभरात या सर्व अंकांची मिळून पृष्ठसंख्या होते : जवळपास १६००. साधना साप्ताहिकाच्या एका पानात नेहमीच्या आकाराच्या पुस्तकांच्या दोन पानांइतका मजकूर बसतो. याचा अर्थ पुस्तकाच्या ३२०० पानांचा मजकूर साधना साप्ताहिक दरवर्षी आपणास देते. सोपा हिशेब करावयाचा तर प्रत्येकी १०० पानांचे एक, अशी ३२ पुस्तकेच जणू काही साधना आपणास घरपोच देते. अगदी कमी धरली तरी १०० पानी पुस्तकाची किंमत असते किमान रु.५०/-. म्हणजे अत्यंत किफायतशीर बाजारभावानेही साधना साप्ताहिक देत असलेल्या मजकुराचे आर्थिक मूल्य आहे रु.१६००/-.

ही प्रचंड तूट प्रतिवर्षी दिवाळी अंकातील जाहिरातींद्वारे भरून काढणे चालू आहे. परंतु त्यातील अडचणी सर्वजण जाणतातच. म्हणून १ एप्रिल २००८ पासून साधनाची वर्गणी व्यक्तीसाठी रु.४००/- व संस्थेसाठी रु.५००/- करण्यात येत आहे. साधनावरील लोभ यापुढेही असाच चालू ठेवावा ही विनंती.

**– संपादक ‘साधना’**

साधना साप्ताहिक : ९ फेब्रुवारी २००८

एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७,
रजि. क्र.:
एल-२/आर.एन.पी./पी.एन.डब्ल्यू./डब्ल्यू/६८/२००६-२००८
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं. ७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केटयार्ड पी.एस.ओ. सॉर्टिंग ऑफिसमधून

## ग्रंथाची किंमत वसूल झाली

मी 'पीपल्स कॉलेज' नांदेड येथे इ.स. १९६३ साली प्राध्यापक म्हणून नोकरीस लागलो. त्या वर्षीची एक गोष्ट आहे. आमच्या संस्थेचे अध्यक्ष पू. स्वामी रामानंदतीर्थ कॉलेज पाहावयास आले होते. माझी व त्यांची जुनी ओळख. फक्त नव्यानं प्राध्यापक झालो होतो. त्याच वेळी एक पुस्तकविक्रेता आला होता. त्याच्याजवळ विल ड्यूराँटने लिहिलेला संस्कृतीचा इतिहास होता. अनेक दिवस मी त्या ग्रंथाचे नाव ऐकत होतो. टॉयन्बीचा इतिहासविश्लेषण करणारा महाग्रंथ आणि ड्यूराँटचा हा ग्रंथ (मूळ नाव स्टोरी ऑफ सिव्हिलायझेशन, एकूण खंड १०) वाचण्याची मला जिज्ञासा होती आणि नांदेडला हे खंड उपलब्ध नव्हते. अनपेक्षितपणे हवा असणारा ग्रंथ घरात-दारात येऊन उभा ठाकला. मी पू. स्वामीजींना म्हटले, ''हा फार प्रसिद्ध ग्रंथ आहे. आपल्या महाविद्यालयासाठी विकत घ्या.'' स्वामीजी म्हणाले, ''ग्रंथ पूर्ण नाहीत. (आमच्या विक्रेत्याकडे पहिले सात खंडच होते.) दुसरे कुणीतरी वाचून तो चांगला आहे, असे म्हटले पाहिजे. न वाचता चांगले म्हणणाऱ्याला महत्त्व कोण देणार? तिसरे म्हणजे इथे तरी हा ग्रंथ वाचणार कोण? शेवटचे म्हणजे किमतीचे काय?''

मी म्हणालो, ''स्वामीजी, किमतीचे तुम्ही पहा. संपूर्ण ग्रंथ वाचण्याची जबाबदारी माझी. वाचून झाल्यानंतर मी तुम्हांला माझे मत सांगतो.' स्वामीजींनी हे मान्य केले आणि प्राचार्यांना 'ग्रंथ खरेदी करा', म्हणून सांगितले. पुस्तक विकत घ्या म्हणून सांगणे सोपे असते. सुमारे पाच हजार पाने वाचण्याची जबाबदारी घेणे कठीण असते. ग्रंथ अतिशय चांगला, माहितीपूर्ण, रेखीव इ. मी ऐकून होतो. पण वाचनीयतेचे काय? माझा महाविद्यालयीन उद्योग सांभाळून मी तीन महिन्यांत सातही खंड वाचून संपविले, निदान मला तरी ते सारे लिखाण कादंबरीप्रमाणे मनोरंजक व मन भारून टाकणारे वाटले. प्रत्येक खंडाबाबतची टाचणे तयार केली. आणि पुन्हा स्वामीजी नांदेडला येताच त्यांच्याकडे जाऊन मी ग्रंथ वाचला याची खात्री पटवली. त्यांना अर्थातच आनंद झाला. थट्टेवारी सारे न्यावे तसे ते म्हणाले, ''कुरुंदकर, असे वाचायचे नसते. फक्त वाचतो म्हणून आश्वासन द्यायचे असते.''

मी पू. स्वामीजींना एक शंका विचारली. मी म्हटले, ''समजा, सारे खंड वाचून हा ग्रंथ सामान्य आहे असे माझे मत झाले असते, तर मग हे पैसे वायाच गेले असते की नाही?'' स्वामीजी म्हणाले, ''विचारातील मुख्य चूक इथे आहे. पुस्तके पूर्णपणे वाचून ती वाईट, असे जेव्हा तुम्ही ठरवता, तेव्हा तुमची समृद्धी वाढलेली असते. त्यात ग्रंथाची किंमत वसूल झाली. मात्र हा नियम ज्याच्या जिज्ञासूपणावर माझा विश्वास आहे त्याच्यापुरता समजायचा.''

**– नरहर कुरुंदकर**

(संदर्भ : वाटचाल, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.)

## साधना शिफारस













